मेहता मराठी ग्रंथजगत

ऑगस्ट, २०१७ • पृष्ठे १०० • किंमत १५ रुपये
• वर्ष सतरावे • अंक आठवा

ऑगस्ट 15 स्वातंत्र्य दिन

हे राष्ट्र देवतांचे, हे राष्ट्र प्रेषितांचे
आ चंद्र-सूर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे

आवर्जून वाचावे

प्रकाशन समारंभ...

दिलखुलास... मनमोकळ्या गप्पा... दीप्ती नवलशी **'द मॅड तिबेटियन'**चा रंगतदार प्रकाशन सोहळा

दीप्ती नवल यांच्या 'द मॅड तिबेटियन' या पुस्तकाचं प्रकाशन राष्ट्रीय फिल्म संग्रहालयात एका रंगतदार सोहळ्यात पार पडलं. प्रकाशक सुनील मेहता, लेखिका, अभिनेत्री दीप्ती नवल, या पुस्तकाच्या अनुवादक सुनंदा आमरापूरकर, ज्येष्ठ लेखिका वीणा देव, अभिनेत्री अमृता सुभाष, एफटीआयआयचे अध्यक्ष प्रकाश मगदूम यावेळी उपस्थित होते. सुरुवातीला सुनील मेहता यांनी मनोगत व्यक्त केलं. वीणा देव यांनी या पुस्तकाचा परिचय करून दिला. सुनंदा आमरापूरकर यांनीही पुस्तकाबद्दल आपले विचार मांडले. अमृता सुभाष यांनी दीप्ती नवल यांची घेतलेली प्रकट मुलाखत आणि नवल यांचा 'दो आने की धूप, चार आने की बारिश' हा अप्रदर्शित चित्रपट बघण्याची संधी ही या कार्यक्रमाची खास वैशिष्ट्यं ठरली. महाराष्ट्र टाइम्स कल्चरल क्लबचा या सोहळ्यात संयुक्त सहभाग होता. सूत्रसंचालन राजेश दामले यांनी केले.

मेहता मराठी ग्रंथजगत

। ऑगस्ट २०१७ । वर्ष सतरावे । अंक आठवा ।

मांडणी-अक्षरजुळणी

मेहता पब्लिशिंग हाऊस

संपादक-मुद्रक-प्रकाशक
सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर,
पुणे - ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४
२४४७५४६२

E-mail : info@mehtapublishinghouse.com

संपादक
सुनील मेहता

कार्यकारी संपादक
शंकर सारडा

संपादन सहाय्य
अंजली पटवर्धन

अंकाची किंमत १५ रु.

वर्गणी
मनीऑर्डरने अथवा
ऑनलाईन पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा ११ तारखेस

अनुक्रमणिका

संपादकीय	४
लेखक परिचय	१०
सन्मान	१६
उपक्रम	२०
स्वातंत्र्यदिन विशेष	२८
आत्मचरित्र	४२
पुस्तक परिचय	५०
व्यक्तिरेखा	६०
भेट दीप्ती नवलशी...	७४
शब्द शब्द जपून ठेव...	८०
संध्या-छाया	८४
स्मरण	८८
अभिप्राय	९६

संपादकीय

उघडा दार मनाचे...

भारताला ब्रिटिशांच्या जोखडातून सोडवण्यात भारताला यश मिळालं; कारण स्वातंत्र्यवीर सावरकर, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्यासारखे नेते, झाशीची राणी, तात्या टोपे, भगतसिंग, राजगुरू यांच्यासारखे क्रांतिकारक यांनी त्यांच्या मनाची 'स्व-तंत्रता' जपली होती. त्याही काळात सरकारी नोकरीत चिटकून उदरभरण करणारे लोक होते. देशाच्या स्वातंत्र्याशी त्यांना काही देणं-घेणं नव्हतं; पण नेत्यांनी, स्वातंत्र्यसेनानींनी क्रांतिकारकांनी मळलेल्या पायवाटेवरून जाणं जाणीवपूर्वक टाळलं आणि स्वातंत्र्य लढ्यात उडी घेतली. काहींना देश स्वतंत्र झालेला पाहण्याचं भाग्य लाभलं, तर काहींना ते लाभलं नाही; पण हा विचार या देशभक्तांनी कधीच केला नाही. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी जो यज्ञ चालू होता त्या यज्ञात ते आहुती देत राहिले.

या क्रांतिकारकांच्या, देशभक्तांच्या त्यागामुळे आज आम्ही स्वतंत्र भारतात जगतो आहोत; पण मनाने आम्ही खरंच स्वतंत्र आहोत का, याबद्दल विचार करायला आम्हाला वेळ नाही. लाखो, कोट्यवधी लोक भौतिक सुखांच्या मागे धावत आहेत, म्हणून आम्ही धावत आहोत. टीव्ही, मोबाईल, कॉम्प्युटर आले म्हणजे

विकास झाला, प्रगती झाली. बायका शिक्षण घेऊ लागल्या, नोकरी करू लागल्या म्हणजे आम्ही पुरोगामी झालो; पण आमची आत्मिक उन्नती किती झाली, याचा विचार फार कमी होताना दिसतो. कारण असा विचार करण्यासाठी आम्ही मनाने स्वतंत्र असणं गरजेचं आहे.

आज आम्ही भौतिक सुखांची गुलामी पत्करली आहे. त्याचे परिणाम आज आवासून समोर उभे आहेत. तरुण वयात रक्तदाब, मधुमेह यांसारखे आजार जडत आहेत, कौटुंबिक स्वास्थ्य हरवलं आहे, घटस्फोटांचं प्रमाण वाढतं आहे, व्यसनाधीनता वाढते आहे, मनोविकारांचं प्रमाण वाढतं आहे, पर्यावरणाचं आणि मनाचंही प्रदूषण वाढतं आहे, मूल्यांचा आग्रह संपला आहे. हे सगळे परिणाम का झाले, तर स्वातंत्र्याचा अर्थ जाणून घेण्याचा प्रयत्न आम्ही केला नाही.

रोजगारांच्या बाबतीत तरी आम्ही मनाने स्वतंत्र आहोत का, याचंही उत्तर दुर्दैवाने 'नाही' असंच द्यावं लागेल. देशाच्या भौतिक विकासात योगदान देणाऱ्या तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात जाण्याची बहुतेक युवकांची धडपड असते. कारण तिथे भरपूर पैसा मिळतो. कला, साहित्य, भाषा, शिक्षण यांसारख्या देशाचं सांस्कृतिक संचित घडविणाऱ्या क्षेत्रांमध्ये जायला युवा पिढी उत्सुक नाही; कारण या क्षेत्रांमध्ये पैसाही नाही आणि प्रतिष्ठाही नाही. त्यामुळे आता आम्ही फक्त तंत्रज्ञानाची भाषा जाणतो. आमच्या 'मनाची' भाषा आम्ही जाणत नाही. तीनशे-साडेतीनशे वर्षांपूर्वी रामदासांनी 'मनाच्या श्लोकां'मधून मनाशी जसा संवाद साधला तसा संवाद साधण्याची वेळ आज येऊन ठेपली आहे. आज ब्रह्मकुमारीज, हॅपी थॉट्स, चिन्मय मिशन, जीवनविद्या मिशन सारख्या संस्थाही मनाशी संवाद साधायला सांगतात. अशा संस्थांमध्ये काही लोक जातातही; पण दैनंदिन जीवनात परत मनाची 'स्वतंत्रता' जपणं, मनाशी संवाद साधणं त्यांना जमत नाही.

मनाशी संवाद साधणं, म्हणजे मनाची स्वतंत्रता जपणं, असं आपण म्हणू शकतो; पण आपल्याच अंतर्मनापर्यंत पोचण्यासाठी आपल्याला झगडावं लागतं. हा झगडा जेव्हा अहर्निश चालू राहतो, तेव्हाच अंतर्मनापर्यंत पोहोचून त्याच्याशी संवाद साधता येतो आणि हा

संवाद सुरळीतपणे चालू झाला, की तुम्ही मनाने स्वतंत्र होता आणि जेव्हा तुम्ही मनाने स्वतंत्र होता, तेव्हा चांगल्या गोष्टी तुम्हाला दिसायला लागतात. जाणवायला लागतात. थोडक्यात, मनाची दारं उघडून तुम्हाला स्वतंत्र व्हावं लागतं. ही अशी स्वतंत्रताही मिळवायला लागते. अशी स्वतंत्रता मिळवण्याचा प्रयत्न सगळ्यांनी, विशेषत: तरुण पिढीने केला पाहिजे. म्हणजे मोबाईल आणि कॉम्प्युटरच्या पलीकडे एक सचेतन विश्व असतं, ही जाणीव त्यांना होईल.

आणि जेव्हा त्यांना ही जाणीव होईल तेव्हा 'कर चले हम फिदा जान-ओ-तन साथियों...'सारखं देशभक्तिपर गीत त्यांना हलवून टाकेल. कैफी आझमींच्या शब्दकळेचं, मदनमोहन यांच्या स्वररचनेचं, महंमद रफी यांच्या गायकीचं आणि चेतन आनंद यांच्या दिग्दर्शनाचं सामर्थ्य तर त्यांना कळेलच; पण आतापर्यंत ज्या जवानांनी देशासाठी बलिदान दिलं आणि आज जे जवान देशाच्या रक्षणासाठी सज्ज आहेत, त्यांच्याविषयीची कृतज्ञताही युवा पिढीच्या मनात दाटून येईल. या गाण्याचं हे फक्त एक उदाहरण झालं. अनेक चांगल्या गोष्टींचं आकलन या मनाच्या स्वतंत्रतेमुळे होईल.

तेव्हा मनाने स्वतंत्र व्हा आणि मग स्वातंत्र्याची चव पाहा!

मेहता मराठी ग्रंथजगत

नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.

आमच्या छापील अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ३५०रुपये

पंचवार्षिक वर्गणी ५००रुपये

डिजिटल अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ३००रुपये

पंचवार्षिक वर्गणी ४००रुपये

आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी

सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाईल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्स अप नंबरवर कळवावी.

९४२०५९४६६५

वाचकांसाठी सुवर्णसंधी!

WORDPOWER

Books | Toys | Stationery | Music | Movies | Games

बेळगाव / कोल्हापूर / औरंगाबाद

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक, मूव्ही, गेम्स अन्यही
बरेच काही आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे.
सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

बेळगाव, कोल्हापूर, औरंगाबाद येथील वर्डपॉवरचा पत्ता पुढीलप्रमाणे
पहिला मजला, भंडारी कॅपिटल, कॉसमॉस बँकेच्या वर, खानापूर रोड,
टिळकवाडी, बेळगाव-५९०००६. टेलिफोन क्र. (०८३१)-४२००६७६
शॉप नं १, ग्राऊंड फ्लोअर, अथर्व एम्पायर, ताराबाई पार्क,
कोल्हापूर-४१६००३. टेलिफोन क्र.(०२३१)-६६१७६२५/२६
शॉप नं. - जी/१५, प्रोझन मॉल, चिखलठाणा, एमआयडीसी,
औरंगाबाद - ४३१००६.
संपर्क. ९८९०३९७१९८ / ९९६०३०९८०८

अधिक माहितीसाठी संपर्क
www.wordpowerbookshop@gmail.com

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, युपीएसी, एमपीएसी, सेट-नेट, इंजीनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ. विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर

मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२.
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ **(शनिवारी बंद)**
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१

Email : mehtabooksellers@gmail.com

amazon dailyhunt GET IT ON Google Play

यांच्या संयुक्त विद्यमाने

नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी,
सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि ॲन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

इथे मिळतील ई-बुक्स...

www.amazon.com

m.dailyhunt.in

play.google.com

eBooks

Online पुस्तके खरेदी करा **www.mehtapublishinghouse.com**

लेखक परिचय

सुधा मूर्ती

विख्यात सामाजिक कार्यकर्त्या, लेखिका, टेल्को कंपनीत निवडल्या गेलेल्या पहिल्या स्त्री अभियंता, कर्नाटकातल्या सर्व सरकारी शाळांना संगणक आणि ग्रंथालय सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या चळवळीच्या प्रणेत्या, 'इन्फोसिस फाउंडेशन'च्या अध्यक्ष आणि 'इन्फोसिस'चे संस्थापक नारायण मूर्ती यांच्या पत्नी अशी सुधा मूर्ती यांची बहुरंगी ओळख आहे. सामाजिक कार्य आणि साहित्य सेवेसाठी त्यांना सहा डॉक्टरेट्स मिळाल्या. २००६मध्ये त्यांना भारत सरकारतर्फे पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

मेहता पब्लिशिंग हाऊसने सुधा मूर्ती यांची १६ पुस्तकं मराठीत प्रकाशित केली आहेत. त्यात सात कादंबऱ्या, पाच कथासंग्रह (एक संपादित), तीन अनुभवकथनं आणि एका व्यक्तिचित्रणात्मक पुस्तकाचा समावेश आहे.

'बकुळा' ही त्यांची कादंबरी श्रीकांत आणि श्रीमती या दांपत्याच्या मानसिक संघर्षाची कहाणी आहे. हे दोघंही बुद्धिमान आहेत; पण श्रीकांत करियरच्या आणि पर्यायाने पैशाच्या नादात माणूसपण हरवून बसला आहे. श्रीकांतचा पुरुषी अहंकार, पदाची आणि पैशाची त्याला चढलेली नशा, श्रीमतीच्या स्त्रीसुलभ भावनांचा कोंडमारा, तिची स्व-अस्तित्वासाठीची धडपड या सगळ्याचं प्रभावी चित्रण सुधाताईंनी या कादंबरीतून केलं आहे.

'हरवलेल्या मंदिराचं रहस्य' ही त्यांनी लहान मुलांसाठी लिहिलेली कादंबरी आहे. छोटी अनुष्का मे महिन्याच्या सुट्टीत गावाला तिच्या आजी-आजोबांकडे जाते. तिथे सुट्टीची धमाल अनुभवत असताना तिला एका पुरातन विहिरीचा शोध लागतो आणि मग उत्खननानंतर तिथे एक

मंदिर आढळतं, असं या कादंबरीचं कथानक आहे. लहानांबरोबर मोठ्यांनाही आवडेल अशी ही कादंबरी आहे. लग्नानंतर अंगावर अचानक कोडाचा डाग उमटलेल्या अनुपमाची कहाणी 'महाश्वेता' या कादंबरीत सांगितली आहे. अनुपमा गरीब घरातली मुलगी असते; पण तिच्या रूप-गुणांवर भाळून डॉक्टर असलेला दीपक तिच्याशी लग्न करतो; त्यानंतर तिच्या पायावर अचानक कोडाचा डाग उमटतो. कोडाविषयी समजल्यानंतर दीपकचे कुटुंबीय तिला वाळीत टाकतात. दीपक लांब असला तरी त्याच्याकडून मानसिक आधाराची तिला अपेक्षा असते; पण तोही तिला मिळत नाही आणि ती दीपकपासून विभक्त होते.

'डॉलर बहू' या कादंबरीतून सुधाताईंनी गौरम्मांच्या विनिता आणि जमुना या दोन सुनांमधील फरक दाखवला आहे. विनिता ही आदर्श, परंपरांना धरून राहणारी सून आहे; तर जमुना अमेरिकेत राहणारी. तिने पाठवलेल्या डॉलर्समुळे गौरम्मा तिच्यावर खूश असतात आणि विनिताचा मात्र तिरस्कार करतात; पण जमुनाच्या बाळंतपणासाठी त्या अमेरिकेला जातात आणि वर्षभर तिथे राहतात तेव्हा जमुनाचं खरं रूप त्यांना कळतं. शिवाय 'डॉलर्स'मध्ये सगळं काही नसतं, हेही त्यांना उमगतं.

'परीघ' ही त्यांची कादंबरी डॉ. संजय आणि शिक्षिका असलेली मृदुला या जोडप्याभोवती फिरते. काळा पैसा कमावण्यात संजयला काही गैर वाटत नाही. मूल्यांचा आग्रह धरणाऱ्या मृदुलाला ही बाब खटकते. त्यावरून तिच्यात आणि संजयमध्ये मतभेद असतात. या मतभेदाची ही कहाणी आहे.

मुकेश या तरुणाचं जीवन एका बिंदूपाशी येऊन कसं वादळात सापडतं आणि तो त्याला कसं तोंड देतो, याचं चित्रण या कादंबरीत केलं आहे. मुकेशचा जन्म एका रेड इंडियन दांपत्याच्या पोटी होतो; पण त्या दांपत्याचा अपघाती मृत्यू होतो आणि रूपिंदर ही पंजाबी स्त्री त्याला आपला मुलगा मानते. काही कारणाने रूपिंदर तिच्या सुमती नावाच्या मैत्रिणीच्या ओटीत मुकेशला घालते. सुमती आणि रावसाहेबांचा मुलगा म्हणून मोठा होतो. रावसाहेबांच्या मृत्यूनंतर तो त्यांचा मुलगा नाही, हे त्याला समजतं. त्यानंतरचा मुकेशचा जीवनप्रवास आणि त्याचं पूर्वायुष्य 'अस्तित्व'मध्ये साकारलं आहे.

'पितृऋण' ही कथा आहे व्यंकटेशांची. व्यंकटेश हे बँकेत नोकरी करणारे गृहस्थ. बायको शांता, मुलगा रवी आणि मुलगी गौरी असं त्यांचं कुटुंबं. व्यंकटेशांची बदली हुबळीला होते आणि तिथे अगदी त्यांच्यासारख्याच दिसणाऱ्या माणसाशी त्यांची भेट होते. त्याचं नाव शंकर.

काही गोष्टींवरून शंकर हा त्यांचा भाऊ आहे, हे त्यांना समजतं. शंकरची आई भागव्वा. तिची जीवनकहाणी व्यंकटेशांना समजते. सेतूशी भागव्वाचं लग्न होतं आणि लगेच तिला दिवस राहतात. मूलही तिला सातव्या महिन्यातच झाल्यामुळे तिची सासू तिच्या चारित्र्यावर संशय घेते. त्यामुळे सेतू तिचा त्याग करतो. दरम्यान, एका रेल्वे अपघातात सेतूचा मृत्यू झाल्याचं भागव्वाला समजतं. भागव्वा आपल्या मुलाचं नाव शंकर ठेवते. शंकरसह तिला खूप हालअपेष्टांत दिवस कंठावे लागतात. व्यंकटेश त्यांना भेटतात तेव्हाही, शंकर आपल्या तीन तरुण मुलींसह, भागव्वासह गरिबीतच जगत असतो. शंकर आणि व्यंकटेश भाऊ-भाऊ असून, परस्परांना ओळखत का नसतात, शंकर आणि भागव्वाला गरिबीत जगताना पाहून व्यंकटेशांना अपराधी का वाटतं, ते त्यांचं पितृऋण कसं फेडतात आणि त्यांची मुलगी गौरी तिचं पितृऋण कसं फेडते, हे जाणून घेण्यासाठी वाचावी, अशी ही हृद्य कादंबरी आहे.

'थैलीभर गोष्टी' या त्यांच्या कथासंग्रहातील कथा त्यांनी किशोर वयोगटासाठी लिहिल्या आहेत. वास्तवाची जाणीव या वयोगटातील मुलांना असावी, हा त्यांचा या कथा लिहिण्यामागचा उद्देश आहे. 'सुकेशिनी', 'आजीच्या पोतडीतल्या गोष्टी,' हे त्यांचे कथासंग्रहही लहान मुलांसाठी आहेत. 'आयुष्याचे धडे गिरवताना' या कथासंग्रहातील कथा त्यांना आलेल्या सत्य अनुभवांवर आधारित आहेत. 'स्वर्गाच्या वाटेवर काहीतरी घडलं...' हा त्यांनी संपादित केलेला कथासंग्रह आहे. 'वाइज अदरवाइज' 'गोष्टी माणसांच्या,' 'पुण्यभूमी भारत' या पुस्तकांत सुधाताईंनी त्यांच्या सत्य अनुभवांचं कथन केलं आहे. 'सामान्यातले असामान्य' हे त्यांचं व्यक्तिचित्रणात्मक पुस्तक आहे. त्यांना भेटलेल्या सामान्य व्यक्तींमधील त्यांना भावलेलं असामान्यत्व त्यांनी या संग्रहातून अधोरेखित केलं आहे.

सुधाताईंच्या कादंबऱ्यांमध्ये सत्-असत्चा झगडा दिसतो. त्यांच्या कादंबऱ्यांतील नायिकांना खूप दुःख भोगावं लागतं; पण त्यांच्या नायिका परंपरेबरोबरच स्व-अस्तित्वही जपताना दिसतात. 'अस्तित्व'सारखी त्यांची कादंबरी देश, धर्म, जात याच्यापलीकडे असणाऱ्या प्रेम आणि वात्सल्य या भावनांचं उदात्त दर्शन घडवते. उदात्ततेची ही ओढत्यांच्या कादंबऱ्यांमधून जाणवत राहते.

सुधाताईंच्या कथांतून त्यांच्या संवेदनशीलतेचं दर्शन घडत राहतं. त्यांच्या अनुभवपर लेखनातून त्यांचं अफाट अनुभवविश्व प्रत्ययाला येतं. त्यांची सहृदयता, माणसांबद्दलची अपार सहानुभूती अधोरेखित होते. त्यांच्या

सामाजिक बांधिलकीचाही या अनुभवांतून प्रत्यय येतो.

तर सुधाताईंचं हे साहित्य जीवनमूल्यांचं मनोज्ञ दर्शन घडविणारं आहे.

बहुआयामी व्यक्तिमत्त्वाच्या सुधाताईंना नारायण मूर्तींसारख्या महत्त्वाकांक्षी आणि बुद्धिमान व्यक्तीची साथ लाभली आहे. नारायण मूर्तींचं 'अ बेटर इंडिया, अ बेटर वर्ल्ड' हे पुस्तक मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केलं आहे. आर्थिक सुधारणा, लोकसंख्या,भारतीय राजकारण, नोकरशाही,शहरीकरण, ग्रामीण अर्थव्यवस्था आदी विषयांवर नारायण मूर्तींनी वेळोवेळी दिलेल्या व्याख्यानांचं हे संकलन आहे. या संकलनांतून त्यांचा वर्ण्य विषयांवरचा अभ्यास आणि त्यांचा आशावादी दृष्टिकोन दिसून येतो. तंत्रज्ञानाच्या महत्त्वा-बरोबरच ते मानवी मूल्यांचंही महत्त्व जाणतात. त्यांनी स्थापन केलेल्या 'इन्फोसिस'मध्ये सुधाताईंचंही मोलाचं योगदान आहे.

तेव्हा या उभयतांना मेहता पब्लिशिंग हाऊस आणि मेहता बुक सेलर्सतर्फे लाख लाख शुभेच्छा!

❖ ❖ ❖

२१ वर्षांपूर्वी घेतली शेवटची साडी

श्रीमंत व्यक्तींनी महागडे डिझायनर कपडे वापरणे हे ओघाने आलेच; पण भारतातील श्रीमंत महिलांपैकी एक असलेल्या सुधा मूर्ती यांनी तब्बल २१ वर्षे नवीन साडीच विकत घेतली नाही, असे कोणी सांगितले तर खरे वाटणार नाही; मात्र स्वत: मूर्ती यांनीच आपण खरेदीला रामराम केल्याचे म्हटले आहे.

इन्फोसिस फाउंडेशनच्या अध्यक्ष असलेल्या सुधा मूर्ती २१ वर्षांपूर्वी काशी येथे गेल्या होत्या. काशीला गेल्यावर एखाद्या आवडत्या गोष्टीचा त्याग करावा लागतो. मूर्ती यांनी खरेदीचा व त्यातही साडीखरेदीचा त्याग केला. आता केवळ अत्यावश्यक वस्तूच त्या विकत घेतात, असे त्यांनी नमूद केले. या निर्णयामुळे खूप आनंदी व मोकळे वाटते असेही त्या म्हणाल्या.

अनावश्यक खर्चावरील कात्रीतून जमा होणारे पैसे समाजकार्यासाठी उपयोगी पडतात. अशाच पैशांतून पूरग्रस्तांसाठी दोन हजार ३०० घरे बांधली गेली व गुजरातमधील भूकंपग्रस्तांनाही मदत केली गेली, असे मूर्ती यांनी सांगितले.

पुस्तकांवर प्रेम

मूर्ती यांनी साडीखरेदीचा त्याग केला असला तरी त्या व त्यांचे पती नारायण मूर्ती पुस्तके आवर्जून खरेदी करतात. दोन ग्रंथालयांमध्ये

शिस्तबद्धरीत्या ठेवलेली २० हजारांहून अधिक पुस्तके त्यांच्या संग्रही आहेत. नवीन पुस्तके सहज विकत घेण्याची ऐपत असूनही आपल्याकडील पुस्तके दुसऱ्याला देणे मूर्ती यांना आवडत नाही. त्यांनी नारायण मूर्ती यांनाही तशी ताकीद दिली आहे. प्रत्येकाने अशी पुस्तके वाचून दुसऱ्याला दिली तर लेखकांनी उदरनिर्वाह कसा करायचा, असा सवाल त्या करतात.

मैत्रीआड श्रीमंती

श्रीमंती आणि प्रसिद्धीमुळे सुधा मूर्ती यांना अनेक जुने मित्र गमवावे लागल्याची खंत त्या बोलून दाखवतात. जेव्हा कधी मित्र भेटतात, तेव्हा त्यांनी काहीतरी डोक्यात ठरवलेले असते. त्यांना त्यांच्यासाठी किंवा अन्य कुणासाठी काहीतरी हवे असते. यामुळे अनेक चांगले मित्र गमावले असून, या गोष्टीचे खूप वाईट वाटते, असे त्या सांगतात.

❖

सुधा मूर्ती यांची साहित्यसंपदा

पुस्तकाचे नाव	अनुवाद	किंमत
वाइज अँड अदरवाइज	लीना सोहोनी	१५०
गोष्टी माणसांच्या	लीना सोहोनी	१५०
पुण्यभूमी भारत	लीना सोहोनी	१४०
थैलीभर गोष्टी	लीना सोहोनी	१७०
सुकेशिनी	लीना सोहोनी	१५०
बकुळा	लीना सोहोनी	१३०
आयुष्याचे धडे गिरवताना	लीना सोहोनी	१५०
आजीच्या पोतडीतल्या गोष्टी	लीना सोहोनी	१४०
स्वर्गाच्या वाटेवर काहीतरी घडलं...	लीना सोहोनी	१५०
हरवलेल्या मंदिराचे रहस्य	लीना सोहोनी	१६०
महाश्वेता	उमा कुलकर्णी	१५०
डॉलर बहू	उमा कुलकर्णी	१५०
सामान्यांतले असामान्य	उमा कुलकर्णी	१६०
परीघ	उमा कुलकर्णी	२२०
अस्तित्व	ए. आर. यार्दी	१००
पितृऋण	मंदाकिनी कट्टी	९०

२ री आवृत्ती

मांजराची सावली

लेखक
जयश्री कुलकर्णी



किंमत : १८०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.

अवाक् होऊन तिच्याकडे पाहता पाहताच त्याचे लक्ष भिंतीवर पडलेल्या तिच्या सावलीकडे गेले आणि तो पुन्हा एकदा विलक्षण दचकला. भिंतीवर पडलेली सावली एका मांजराची होती. दोन पाय पुढे ठेवून मागचे पाय दुमडून कॉटवर बसलेले एक मांजर त्या सावलीत स्पष्ट दिसत होते. या कथासंग्रहातील प्रत्येक कथेतला थरार आणि भयनाट्य काळजाचा ठोका चुकवणारे आहे. अतिंद्रिय, अनाकलनीय प्रसंगाच्या रोमांचकारी घटना जेव्हा आपल्यासमोर साकार होऊ लागतात तेव्हा त्या त्या व्यक्तींच्या मनातीलताणाचे आणि भयाचे प्रक्षेप आपल्याही मनावर येऊन आदळतात. शब्दाशब्दांतून अघोरी वासनांच्या क्रौर्याची धग आपल्यापर्यंत पोहोचून आपल्या अंतर्मनाला अस्वस्थ, घामाघूम करते.

...आणि मग या शब्दभ्रमाच्या मायाजालातून वेगळे होऊन आपण जेव्हा पुन्हा आपल्या नित्याच्या वास्तव जगात परत येतो, तेव्हा आपल्याच सावलीकडे पाहतानाही आपल्याला क्षणभर विलक्षण भीती वाटते.

सन्मान

साहित्य अकादमी पुरस्कार

केंद्र सरकारच्या साहित्य अकादमी या स्वायत्त संस्थेची स्थापना १९५४मध्ये झाली. दरवर्षी बावीस भारतीय भाषांमधील उत्कृष्ट साहित्यकृतींना साहित्य अकादमीचा पुरस्कार दिला जातो. या पुरस्कारासाठी लेखकांकडून अथवा प्रकाशकांकडून पुस्तके मागविली जात नाहीत. विविध वाङ्मय प्रकारांतील उत्कृष्ट अशा पुस्तकांचा विचार तज्ज्ञ समितीमार्फत करून पुरस्काराविषयीचा अंतिम निर्णय घेतला जातो. १९५५मध्ये साहित्य अकादमीचा मराठी भाषेतील पहिला पुरस्कार, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या इतिहासविषयक 'वैदिक संस्कृतीचा विकास' या ग्रंथाला जाहीर झाला. तेव्हापासून आतापर्यंत अजिबात खंड न पडता, सुमारे साठ ग्रंथांना साहित्य अकादमीचे पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

साहित्य अकादमीचा पुरस्कार कोल्हापूरला प्रथम प्राप्त करून देणारे साहित्यिक... खांडेकर. वि. स. खांडेकर यांच्या 'ययाति' या कादंबरीला १९६०मध्ये तो जाहीर झाला. खरं तर इथे एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे, की कोणत्याही मोठ्या लेखकाला भौगोलिक सीमांच्या मर्यादेत अडकवून ठेवणे, हे त्या लेखकावर अन्याय करण्यासारखे आहे. प्रस्तुत स्तंभलेखाचा हेतू कोल्हापूरची साहित्य परंपरा समजून घेणे असा मर्यादित असल्याने अशी भौगोलक सीमारेषेची मर्यादा घालणे अपरिहार्य आहे. नाही तर साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळालेल्यांपैकी तर्कतीर्थांपासून पु. ल. देशपांडे, व्यंकटेश माडगूळकर, लक्ष्मण माने, इंदिरा संत, विजया

राजाध्यक्ष, गो. मा. पवार, जयंत नारळीकर अशा अनेक लेखकांचा कोल्हापूरशी असलेला घनिष्ट संबंध आणि कोल्हापूर परिसरात झालेली त्यांची वाङ्मयीन जडणघडण आपणास नाकारता येणार नाही, हे स्पष्टच आहे.

खांडेकरांच्या 'ययाति' या कादंबरीला पुढे साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च असा ज्ञानपीठ पुरस्कारही प्राप्त झाला आणि कोल्हापूरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला. 'ययाति' ही पुराणकथेतील व्यक्तिरेखा असली तरी खांडेकरांनी तिला वर्तमानाशी जोडून घेतलेले आहे. 'ययाति' हा आजच्या सर्वसामान्य मनुष्याचा पुराणकाळातील प्रतिष्ठित प्रतिनिधी आहे. क्षणिक मिळणारे शरीरसुख हेच चिरंतन सुख मानून, ते सतत कसे मिळेल यासाठी ययातिची धडपड सुरू आहे; पण निव्वळ भोग घेऊन वासना कधीही तृप्त होत नाही, हे लक्षात न आल्याने तो सुखी होत नाही. 'ययाति' प्रकाशित होऊन जवळ जवळ साठेक वर्षे होत आली तरी, या कादंबरीची लोकप्रियता काही कमी झालेली नाही. मराठी भाषेत खूप मोठ्या संख्येने वाचक ही कादंबरी वाचतच आहेत. रणजित देसाई यांच्या 'स्वामी' या कादंबरीला ययातिप्रमाणेच अमाप लोकप्रियता मिळाली. 'स्वामी'ला १९६४ मध्ये साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त झाला. 'स्वामी' कादंबरीचा केंद्रबिंदू माधवराव पेशवे असल्याने त्यांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटना, प्रसंगांना कादंबरीत स्थान मिळाले आहे. माधवरावांच्या जीवनातील या ऐतिहासिक घटनांना कलात्मकतेची बेमालूम जोड दिल्याने त्या प्रसंगांमध्ये नाट्यमयता, चित्रमयता आलेली आहे. माधवरावांना समजून घेणाऱ्या सर्वार्थाने समर्थ अर्धांगी, सहधर्मचारिणी अशा रमाबाईंचे भावविश्व या कादंबरीतून फारच उत्कटपणे प्रकट झाले आहे. मराठी ऐतिहासिक कादंबऱ्यांच्या परंपरेतील एक महत्त्वाचा मानदंड ठरावी, अशी 'स्वामी' कादंबरी आहे.

१९६४नंतर बऱ्याच वर्षांचा खंड पडल्यानंतर १९९०मध्ये आनंद

यादव यांच्या 'झोंबी' या आत्मचरित्रात्मक कादंबरीच्या निमित्ताने साहित्य अकादमीचा पुरस्कार परत एकदा कोल्हापूरकडे आला. 'झोंबी' मध्ये यादवांचा मॅट्रिक परीक्षेपर्यंतचा शैक्षणिक आणि कौटुंबिक पातळीवरचा संघर्ष प्रकट झाला आहे. आनंद यादव हे कागलचे. यादवांनी स्वत: ग्रामीण जीवन अनुभवलेले असल्यामुळे 'झोंबी' कादंबरीमध्ये ग्रामीण जीवनाचे वास्तव दर्शन घडविण्यात ते यशस्वी ठरले आहेत. ग्रामीण पर्यावरणातूनच पुढे आलेल्या विश्वास पाटील आणि राजन गवस या दोन लेखकांना साहित्य अकादमीचे पुरस्कार प्राप्त झाले. विश्वास पाटील हे 'पानिपत', 'संभाजी' अशा काही कादंबऱ्यांमुळे लोकप्रिय लेखक ठरले असले तरी त्यांच्या 'झाडाझडती' आणि 'पांगिरा' या दोन अत्यंत महत्त्वाच्या कादंबऱ्या त्या तुलनेत दुर्लक्षितच राहिल्या.

'झाडाझडती'ला १९९२चा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त झाला. धरणग्रस्तांच्या विस्थापित आणि दयनीय स्थितीचे जीवनचित्रण 'झाडाझडती' मधून प्रत्ययकारीपणे रेखाटले गेले आहे. २००१चा साहित्य अकादमी पुरस्कार मिळालेली राजन गवस यांची 'तणकट' ही नव्या वळणाची, व्यापक समृद्ध जाणिवेची दिशा दाखविणारी महत्त्वाची साहित्यकृती. 'तणकट' कादंबरी बदलत्या ग्रामव्यवस्थेचे सूक्ष्म तपशिलासह प्रभावी चित्रण मांडत जाते. प्रस्तुत वास्तव टिपत असतानाच राजन गवस यांनी परंपरेतील आधुनिकतेचा अत्यंत गांभीर्याने विचार केलेला आहे.

एकंदरीत साहित्य अकादमीचा पुरस्कार कोल्हापूरच्या वि. स. खांडेकर, रणजित देसाई, आनंद यादव, विश्वास पाटील आणि राजन गवस या पाच लेखकांच्या निव्वळ कादंबरी लेखनालाच प्राप्त झालेला आहे; पण नुकताच साहित्य अकादमीचा युवा गौरव पुरस्कार राहुल कोसंबी या कोल्हापूरच्या नव्या दमाच्या लेखकाच्या वैचारिक लेखनासाठी जाहीर झाला, हे विशेष उल्लेखनीय म्हटले पाहिजे.

– रफीक सूरज

२ री आवृत्ती

विषवल्ली

लेखक
जयश्री कुलकर्णी



किंमत : १६०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.

सगळेजण त्याला त्वेषाने मारू लागले. त्याला फरफटत, मारतच सगळे वाड्याकडे आले आणि पायरीवर टाकून निघून गेले. शुद्धीवर आल्यावर 'पाणी पाणी' करत दिगूनं प्राण सोडला. मरताना त्याच्या मनात एकच भावना थैमान घालत होती.

सूड! सूड! गावाचा सूड...

...इतकी वर्ष मला तुम्ही एकटं ठेवलंत, तळमळत ठेवलंत.

आता मला रक्त हवंय.

मी माझी सोय केलीय.

कायमची.

डॉक्टरचा भयानक चेहरा आणि ओठांबाहेर येणारे तीक्ष्ण सुळे ती बघतच राहिली.

उपक्रम दिनविशेष

दिसामाजि काहीतरी ते लिहावे।
प्रसंगी अखंडित वाचित जावे।।

श्री समर्थ रामदास स्वामी

✳ वाचकांसाठी सुवर्णसंधी ✳
करा मैत्री पुस्तकांशी
'मेहता पब्लिशिंग हाऊस'चा
नवीन उपक्रम

१६ ऑगस्ट २०१७ ते १५ सप्टेंबर २०१७
दरम्यानचा दिनविशेष

आपल्या लाडक्या लेखकांना वा अनुवादकांना शुभेच्छा
या ईमेलवर पाठवा.

authors@mehtapublishinghouse.com

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर ५०टक्क्यांपर्यंत सूट

१७ ऑगस्ट - अभिनेता सचिन पिळगांवकर यांचा जन्मदिन

सचिन पिळगांवकर लिखित 'हाच माझा मार्ग' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत - ५४०/-

१७ ऑगस्ट ते २० ऑगस्टपर्यंत

सवलत किंमत ३५९/-

१८ ऑगस्ट - कवी गुलज़ार यांचा जन्मदिन

'त्रिवेणी, रावीपार, गुलजार पटकथा संच' या अनुवादित पुस्तक संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - १७३५/-

१८ ऑगस्ट ते १९ ऑगस्टपर्यंत

सवलत किंमत १०७७/-

१९ ऑगस्ट - ज्येष्ठ समाजसेविका सुधा मूर्ती यांचा जन्मदिन

सुधा मूर्ती लिखित **१६** अनुवादित पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - २३६०/-

१९ ऑगस्ट ते २३ ऑगस्टपर्यंत

सवलत किंमत १९४९/-

१९ ऑगस्ट - जॅक कॅनफिल्ड यांचा जन्मदिन

चिकन सूप मालिकेतील **३९** अनुवादित पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - ७७०५/-

१९ ऑगस्ट ते २३ ऑगस्टपर्यंत

सवलत किंमत ४४६६/-

२० ऑगस्ट – नारायण मूर्ती यांचा जन्मदिन

'नारायण मूर्ती : मूल्यं जपणारं एक अद्वितीय आयुष्य, अ बेटर इंडिया अ बेटर वर्ल्ड' या पुस्तकसंचावर विशेष सवलत

सवलत किंमत २४९/-

संचाची मूळ किंमत - ३८०/-

२० ऑगस्ट ते २२ ऑगस्टपर्यंत

२५ ऑगस्ट – तसलिमा नासरिन यांचा जन्मदिन

तसलिमा नासरिन लिखित 'लज्जा, फेरा, निर्बाचित कलाम, नष्ट मेयेर नष्ट गद्य, निर्बाचित कविता, आमार मेयेबेला, उधाण वारा, द्विखंडित, फरासि प्रेमिक' या अनुवादित पुस्तकसंचावर विशेष सवलत

सवलत किंमत १२४९/-

संचाची मूळ किंमत - २०७५/-

२५ ऑगस्ट ते २७ ऑगस्टपर्यंत

२५ ऑगस्ट – फ्रेडरिक फॉर्सिथ यांचा जन्मदिन

फ्रेडरिक फॉर्सिथ लिखित 'नो कम बॅक्स, द अफगाण, द फिस्ट ऑफ गॉड, मध्यस्थ' या अनुवादित पुस्तकसंचावर विशेष सवलत

सवलत किंमत ८४९/-

संचाची मूळ किंमत - १४९५/-

२५ ऑगस्ट ते २८ ऑगस्टपर्यंत

३१ ऑगस्ट – शिवाजी सावंत यांची जयंती

शिवाजी सावंत लिखित 'छावा, मोरावळा, मृत्युंजय, शेलका साज, युगंधर, अशी मने असे नमुने, कांचनकण' या पुस्तकसंचावर विशेष सवलत

सवलत किंमत १२४९/-

संचाची मूळ किंमत - २००५/-

३१ ऑगस्ट ते ४ सप्टेंबरपर्यंत

२ सप्टेंबर – नसीमा हुरजूक यांचा जन्मदिन

नसीमा हुरजूक लिखित 'चाकाची खुर्ची' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत - २३०/-

२ सप्टेंबर ते ५ सप्टेंबरपर्यंत

सवलत किंमत १३९/-

५ सप्टेंबर - शिक्षक दिन

'टू सर विथ लव्ह, चिकन सूप फॉर द सोल इंडियन टीचर्स' या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - ४४०/-

५ सप्टेंबर ते ६ सप्टेंबरपर्यंत

सवलत किंमत २७९/-

८ सप्टेंबर - लीना सोहोनी यांचा जन्मदिन

लीना सोहोनी यांच्या **३०** अनुवादित पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत – ७९२५/-

८सप्टेंबर ते ९ सप्टेंबरपर्यंत

सवलत किंमत ४६००/-

८ सप्टेंबर - जागतिक साक्षरता दिन

'स्टोन इनटू स्कूल, मी मलाला, थ्री कप ऑफ टी' या अनुवादित पुस्तकसंचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत – ९९५/-

८सप्टेंबर ते ९ सप्टेंबरपर्यंत

सवलत किंमत ५९९/-

१४ सप्टेंबर - कांचन घाणेकर यांचा जन्मदिन

कांचन घाणेकर लिखित 'नाथ हा माझा' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत – ३००/-

१४ सप्टेंबर ते १५ सप्टेंबरपर्यंत

सवलत किंमत १५०/-

१५ सप्टेंबर – जागतिक लोकशाही दिन

'फ्रीडम ॲट मिडनाईट, वादळ माथा ते १९६५ भारत-पाक युद्ध, पहिली फेरी?, मोहनदास, महात्मा गांधी आणि तीन माकडे, लढा लोकपालचा : उद्रेक आम आदमीचा, मराठेशाहीतील मनस्विनी, क्रांतियोगिनी भगिनी निवेदिता' या पुस्तकसंचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत - २७७५/-

१५ सप्टेंबर ते १८ सप्टेंबरपर्यंत

सवलत किंमत १३९९/-

जानेवारी असो वा असो डिसेंबर
बारा महिने अनुभवा पुस्तकांचा बहर
महिन्यांच्या नावातलं निवडा आद्याक्षर
बारा महिने मिळवा दमदार ऑफर

AUGUST महिना विशेष

'A' आद्याक्षरापासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - २२,२००/-

१ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट

सवलत किंमत ११,१००/-

'U' आद्याक्षरापासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - ३,६१५/-

१ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट

सवलत किंमत २,३५०/-

'G' आद्याक्षरापासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - ८,८००/-

१ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट

सवलत किंमत ४,८९९/-

'S' आद्याक्षरापासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.
संचाची मूळ किंमत - ३१,७६४/-
१ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट

सवलत किंमत
१७,४७०/-

'T' आद्याक्षरापासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.
संचाची मूळ किंमत - ३५,८१४/-
१ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट

सवलत किंमत
११,६९८/-

S E P T E M B E R महिना विशेष

'S' आद्याक्षरापासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.
संचाची मूळ किंमत - ३१,७६४/-
१ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर

सवलत किंमत
१७,४७०/-

'E' आद्याक्षरापासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.
संचाची मूळ किंमत - ५,९८०/-
१ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर

सवलत किंमत
२,०९३/-

'P' आद्याक्षरापासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.
संचाची मूळ किंमत - १६,९२५/-
१ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर

सवलत किंमत
८,४६३/-

'T' आद्याक्षरापासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.
संचाची मूळ किंमत - ३५,८१४/-
१ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर

सवलत किंमत
१९,६९८/-

'M' आद्याक्षरापासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.
संचाची मूळ किंमत - २४,०८०/-
१ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर

सवलत किंमत
१२,०४०/-

'B' आद्याक्षरापासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - ९,७७०/-

१ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर

सवलत किंमत ५,१२९/-

'R' आद्याक्षरापासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - ५,२५५/-

१ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर

सवलत किंमत ३,१५३/-

आमचे लेखक-अनुवादक यांचा जन्मदिन, तसेच दिनविशेष आणि महिन्यांची आद्याक्षरे यांवर आधारित पुस्तकसंचावर विशेष सवलत.

❖ किमतींमध्ये बदलाची शक्यता ❖

अधिक माहितीसाठी संपर्क :

फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२

website : www.mehtapublishinghouse.com



५वी आवृत्ती

स्वप्न आणि सत्य

लेखक

वि. स. खांडेकर

किंमत : ८०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.

वि. स. खांडेकरांचे आजवरचे कथासंग्रह हे विशिष्ट काळात लिहिलेल्या कथांचे आहेत. १९३० ते १९७० अशा तब्बल चार दशकांतील असंकलित कथा 'स्वप्न आणि सत्य'च्या माध्यमातून वाचकांस प्रथमच एकत्र वाचावयास मिळत आहेत. त्यामुळे खांडेकर कथालेखक म्हणून कसे विकसित झाले याचा एक सुस्पष्ट आलेख आपसूकच वाचकांपुढे उभा राहतो. बृहत् कालखंडातील विषय, शिल्प, शैली इत्यादींच्या दृष्टींनी वैविध्यपूर्ण अशा या संग्रहातील खांडेकरांच्या गाजलेल्या 'चकोर नि चातक' या रूपक कथेचा मूळ खर्डा 'स्वप्नातले स्वप्न' वाचताना लक्षात येते की, खांडेकरांच्या कलात्मक कथांच्या मुळाशीही सामाजिक संदर्भ असायचे. खांडेकरांना स्वप्नाळू कथाकार म्हणणाऱ्यांना 'भिंती'सारखी प्रतिकात्मक कथा जमिनीवर आणील. 'स्वप्न आणि सत्य' म्हणजे कल्पनेकडून वास्तवाकडे मार्गक्रमण केलेल्या मराठीतील कथासम्राटाचा कलात्मक विकासपटच. रंग, स्वाद, आकार, प्रकारांचं हे अनोखं कथा संमेलनच... स्वप्नांचा चकवा नि सत्याचा शोध यांचा प्रत्यय देणाऱ्या या कथा म्हणजे जीवनातील ऊन-सावलीचा खेळच!

अखेरचे पर्व

(वि. स. वाळिंबे यांच्या 'नेताजी' या पुस्तकातून)

भारताला स्वतंत्र करण्यासाठी अनेक देशभक्तांनी आपलं रक्त सांडलं, जीवन समर्पित केलं. या देशभक्तांमध्ये अग्रभागी तेजाने झळकणारं नाव म्हणजे नेताजी सुभाषचंद्र बोस. नेताजींचं कर्तृत्व विशेषत्वाने नजरेत भरतं ते आझाद हिंद फौजेच्या स्थापनेमुळे आणि त्या फौजेत स्त्रियांनाही सामील केल्यामुळे. जपान, ब्रह्मदेशसारख्या देशांसह अन्य देशांतही त्यांनी केलेला प्रवास हाही त्यांच्या देशभक्तीच्या प्रवासातील महत्त्वाचा टप्पा. स्वातंत्र्य लढ्याच्या चळवळीतील नेताजींचं कार्य फार व्यापक आहे. अशा या लोकोत्तर नेत्याचा जीवनप्रवास 'नेताजी' या कादंबरीद्वारे मेहता पब्लिशिंग हाऊसने वाचकांसमोर आणला. त्या कादंबरीतील शेवटच्या प्रकरणातील हा काही अंश...

सुभाषबाबूंनी पूर्व आशियातल्या भारतीय नागरिकांचे अगत्यपूर्वक आभार मानले– त्यांनी केलेल्या भरघोस सहाय्याबद्दल.

रात्री दहा वाजता आझाद हिंद मंत्रिमंडळाची अखेरची बैठक भरली.

ती पहाटे तीन वाजता संपली.

या पाच तासांत सुभाषबाबूंचा प्रत्येक सहकारी त्यांना एकच विनंती करीत होता, ''आता विलंब करू नका. सिंगापूरमधून बाहेर पडा. कुठंही जा; पण इथं राहू नका. शत्रू केव्हा येऊन पोहोचेल याचा नेम उरलेला नाही.''

दुसऱ्या दिवशी सकाळी त्याचाच विचार सुरू झाला.

कोठे जायचे– थायलंड, इंडोचीन, जपान का रशिया?

एक गोष्ट स्पष्ट होती– मलायाबाहेर कोठेही.

जमले तर रशियात. नाही तर रशियन सीमेजवळ कोठे तरी.

जो धोका मलायात होता तोच आज ना उद्या थायलंड आणि इंडोचीन येथेही उद्‌भवण्याची शक्यता नाकारता येईना. इंग्रज सैन्य तेथेही येऊन धडकणार होतेच.

जपानने शरणगती पत्करलेली असल्यामुळे तेथे जाण्यातही अर्थ उरला नव्हता.

सुभाषबाबूंनी प्रथम मांचुरियात आसरा घ्यावा आणि मग पुढचे पक्के करावे, असे सर्वानुमते ठरले.

मलाया ते मांचुरिया म्हणजे अज्ञाताच्या दिशेने करावयाचे प्रयाण.

तेथवर पोहोचायचे कसे?

जपानला विमानाची व्यवस्था करायला सांगावे.

''नेताजी, आता आपण जपानी विमानातून जाण्यात धोका नाही का?''

''सगळ्याच गोष्टी माणसाच्या हातात नसतात. काही दैवावर सोपवाव्या लागतात.''

''जपान तयार होईल का?''

''आजपर्यंतचा अनुभव लक्षात घेता, तो 'नाही' म्हणणार नाही, असे वाटते.''

पहाटेचे तीन वाजले.

मेजर जनरल झमन किआनी, मेजर जनरल अलगप्पन, कर्नल हबिबुर रेहमान, ए. एन. सरकार आणि एस. ए. अय्यर एवढेच उरले.

सुभाषबाबू आझाद हिंद सरकारची राजधानी सोडायच्या तयारीला लागले– खेद आणि खंत यांचे पाथेय घेऊन.

ते म्हणाले, ''किआनी, तुम्ही आता इथले प्रमुख. अलगप्पन आणि ए. एन. सरकार तुमच्यासमवेत इथं राहतील.''

सुभाषबाबूंबरोबर कोण जाणार?''

''हबिबुर रेहमान, तुम्ही येणार ना माझ्याबरोबर?''

''यस सर.''

''कर्नल प्रीतमसिंग इथंच आहेत. मेजर स्वामी लवकरच इथं येऊन पोहोचतील. अबिद हसन आणि देवनाथ दास बँकॉकला आहेत. वाटेत त्यांना घेऊ. अय्यरसाहेब, तुमचं वय काय?''

''अठ्ठेचाळीस.''

‘‘म्हणजे माझ्यापेक्षा एका वर्षाने लहानच आहात की! तुम्ही काय ठरवता?’’

‘‘मला काय, मलाया आणि मांचुरिया– सगळं सारखंच. जिथं तुम्ही तिथं मी.’’

‘‘मग हरकत नाही.’’

लवकर निघायचं होतं. कोणीच झोपलं नाही.

सकाळी साडेनऊ वाजता सुभाषबाबूंचे विमान सुटले. वैमानिकांच्या मागेच सुभाषबाबू बसले होते. त्यांच्या मागच्या बाजूला हबिबुर रेहमान आणि अय्यर. सर्वात मागे प्रीतमसिंग आणि निगेशी नावाचे एक जपानी अधिकारी.

किआनी आणि अलगप्पन विमानतळावर आले होते.

पाणावलेल्या डोळ्यांनी सुभाषबाबूंनी त्यांचा निरोप घेतला.

पाच मिनिटांत विमान पुन्हा तळावर परतले.

‘‘काय झालं?’’

‘‘लँडिंग गीअरचा ब्रेक लागत नाही.’’

दहा वाजता विमान पुन्हा आभाळात झेपावले.

पेट्रोलची टाकी गळू लागली.

सगळे चिंताक्रांत होऊन गेले.

निगेशी यांनी टाकीचा स्क्रू घट्ट करताच गळती थांबली.

दुपारी साडेतीन वाजता बँकॉक आले. तेथे मुक्काम करायचा होता. सुभाषबाबू तेथे येणार आहेत, हे कोणालाच माहीत नव्हते. सुभाषबाबूंनी विमानतळावरच्या कचेरीत जाऊन जगन्नाथराव भोसले यांना फोन केला. दोन तासांत ते मोटार घेऊन आले.

सुभाषबाबू आल्याची बातमी गावात पसरली. त्यांना भेटण्यासाठी लोकांची रीघ लागली.

प्रत्येकाचा प्रश्न एकच, ‘‘नेताजी, इथून तुम्ही कुठं जाणार आहात?’’

‘‘काय सांगू? ते मलाही माहीत नाही.’’

हे असे पहाटे पाच वाजेपर्यंत चालले होते. मग कोठे सुभाषबाबूंना तासभर विश्रांती घेता आली.

सातच्या सुमाराला ते विमानतळाकडे जायला निघाले. हबिबुर रेहमान, प्रीतमसिंग, अबिद हसन, गुलझारसिंग, एस. ए. अय्यर आणि देवनाथ दास या प्रत्येकापाशी पिस्तूल होते– सुभाषबाबूंना मध्येच कोणी गाठले तर त्यांची सुटका करता यावी म्हणून. परमानंद, इशरसिंग, पंडित रघुनाथशास्त्री, पी. ए. पिल्ले, भास्करन आणि कॅप्टन रिझवी यांनी सुभाषबाबूंना विमानापर्यंत

१५ वी आवृत्ती

Program for Reversing
Heart Disease चा भारतीय आविष्कार

डॉ. डीन ऑर्निश यांच्या

हृदयविकार निवारण

(डॉ. जगदीश हिरेमठ उपक्रम)

लेखक

शुभदा गोगटे



किंमत : २७०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.

Heart Attack!! हार्ट अटॅक– हृदयझटका म्हणजे यमदूतानं दारावर केलेली टकटक्, अशी समजूत आजपर्यंत होती; आणि ती फारशी चुकीचीही नव्हती. वेगवेगळ्या दुखण्यांनी किंवा आजारांनी दरवर्षी घडणाऱ्या एकूण मृत्यूंमध्ये हृदयविकारानं मृत्यू पावणाऱ्यांची संख्या सर्वांत जास्त असते. पण आता या यमदूताला दारातच थोपवणं, एवढंच नव्हे, तर चार पावलं मागं पाठवणंही शक्य आहे, असं सांगणारं हे पुस्तक आहे. हृदयविकार कमी करण्यासाठी काय करावं, हृदयरुग्णांची जीवनशैली कशी असावी, हे तर यात आहेच, त्याच्या जोडीला हृदयाला पथ्यकर अशा अनेक पाककृतीही दिलेल्या आहेत. हृदयविकार कमी होऊ शकतो, हे प्रथम अमेरिकन हृदयतज्ज्ञ डॉ.डीन ऑर्निश यांनी प्रयोगांनी सिद्ध केलं. त्यांच्या कार्यक्रमाशी मिळताजुळता पण भारतीय परिस्थितीत उपयुक्त ठरणारा उपक्रम पुण्यात डॉ. जगदीश हिरेमठ चालवत आहेत. अनेक हृदयरुग्णांनी त्यांच्या या कार्यक्रमाचा लाभ घेतलेला आहे. या दोन्ही तज्ज्ञ डॉक्टरांच्या कार्यक्रमाची माहिती पुस्तकात आहे.

सोबत केली.

बँकॉकला दोन विमाने तयार होती. एकामध्ये सुभाषबाबू, हबिबूर रेहमान, प्रीतमसिंग, अय्यर आणि निगेशी बसले. दुसऱ्या विमानात जनरल इसोदा, हाचिया, गुलझारसिंग, अबिद हसन आणि देवनाथ दास हे पाचजण.

सतरा ऑगस्टला सकाळी आठच्या सुमाराला सुभाषबाबू सायगावकडे मार्गस्थ झाले. दहा वाजता सायगाव आले.

आता कोठे जायचे यासंबंधी सुभाषबाबू इसोदा आणि हाचिया यांच्याशी बोलणे करू लागले. ते फील्ड मार्शल तेराउचि यांनी ठरवायचे होते. तेराउचि त्या वेळी दालात येथे होते. म्हणून इसोदा आणि हाचिया यांनी तेथे जाऊन यावे असे ठरले.

सुभाषबाबूंची उतरण्याची सोय नारायणदास यांच्या घरी करण्यात आली. सुभाषबाबूंनी दाढी-अंघोळ केली आणि ते झोपी गेले.

अर्धा तास झाला नसेल तोच किआनो हा जपानी अधिकारी तेथे आला आणि 'चंद्र बोस यांना मी ताबडतोब भेटू इच्छित आहे' असे म्हणू लागला.

अबिद हसन यांनी सांगितले, ''नेताजी आताच झोपले आहेत. काम तसंच महत्त्वाचं असेल तर त्यांना उठवतो.''

''हो, काम तातडीचं आहे.''

सुभाषबाबू खाली आले. किआनो निरोप पोहोचता करू लागला, ''विमान तयार आहे. ते इथून लागलीच निघणार आहे. मात्र त्यात एकच जागा शिल्लक आहे.''

''हे विमान कुठं जाणार आहे?''

''ते मला माहीत नाही.''

''मग ज्याला ते ठाऊक आहे त्याला पाठवून दे. बरं, इसादो आणि हाचिया दालातहून परत आले का?''

तेही किआनोला कळलेले नव्हते.

तो तसाच परतला.

अर्ध्या तासाने स्वत: इसोदा आणि हाचिया हेच तेथे आले.

हस्तांदोलन झाले आणि सुभाषबाबूंनी त्यांना आतल्या खोलीत नेले.

इसोदा म्हणाले, ''चंद्र बोस, तुमच्या इच्छेप्रमाणे तुम्हाला मांचुरियापर्यंत पोहोचवायला तेराउचि तयार झाले आहेत. त्यांनी हे विमान धाडलं आहे ते त्यासाठीच. मात्र ताबडतोब निघायला हवं.''

म्हणजे मनासारखेच होणार होते तर!

हा निर्णय तेराउचि यांचा एकट्याचा.

ते इसोदा यांना म्हणाले होते, ''स्वदेशाच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या आपल्या या मित्राची अंतिम इच्छा जपाननं प्रमाण मानलीच पाहिजे. ते आपलं कर्तव्यच आहे.''

सुभाषबाबू दुसऱ्या खोलीत गेले आणि त्यांनी तेथे हबिबुर रेहमान, अय्यर, प्रीतमसिंग, गुलझारसिंग, अबिद हसन आणि देवनाथ दास यांना बोलावून घेतले.

सगळे जण आल्यावर दरवाजा आतून लावून घेण्यात आला.

सुभाषबाबू मध्ये उभे राहिले. त्यांच्याभोवती ते सहाजण.

सुभाषबाबू सांगू लागले, ''हे बघा, विमान सुटायच्या मार्गावर आहे. त्यामुळे आपल्याला जे ठरवायचं आहे ते आताच्या आता. इसोदा म्हणतात की हे बॉंबफेकी विमान असल्यामुळे वैमानिक सोडून फक्त सहा जणच बसू शकतात. त्यांची पाच माणसं आहेत. म्हणजे आपल्यासाठी एकच जागा शिल्लक आहे. आमच्यापैकी आणखी किमान एकाची तरी सोय व्हायला हवी, असं मी त्यांना म्हटलं आहे. पण ती शक्यता फारच कमी आहे. म्हणून मी एकटा गेलो तर चालेल ना?''

''तुम्ही एकट्यानं जाऊ नये असं आम्हाला वाटतं. आमच्यापैकी निदान एकाला तरी बरोबर घेऊन जा. तुम्ही एकट्यानं हा सारा प्रवास करायचा ही कल्पनाच आम्हाला सहन होत नाही. वेळ कोणती आहे? सगळीकडे भीतीचं, असुरक्षिततेचं वातावरण पसरलं आहे. अमेरिकेची विमानं केव्हाही येऊ शकतील अशी परिस्थिती आहे. नाही, नेताजी, तुम्ही एकट्यानं कुठंही जाता कामा नये.''

''मला माझ्या प्रश्नाचं उत्तर हवं आहे– मी एकट्यानं जावं का नाही.''

''तुम्ही इथं राहणं धोक्याचं आहे. म्हणून जायला तर हवंच. पण तरीही आणखी एका जणाची सोय होते का, हे पाहावं.''

सुभाषबाबूंनी हे सारे इसोदा यांना सांगितले.

ते कसेबसे आणखी एकाची सोय करायला तयार झाले.

बाहेर येऊन सुभाषबाबूंनी सहकाऱ्यांना सांगितले, ''ते आणखी एकासाठी जागा करायला तयार आहेत. मग तर झालं?''

''आता आमची काहीही हरकत नाही.''

''माझ्याबरोबर कोण येणार आहे?''

''नेताजी, ते तुमचं तुम्हीच ठरवावं, हे बरं. आमच्यापैकी प्रत्येकजणच तयार आहे.''

विचार करायला वेळ नव्हता.

''मी हबिबुर रेहमान यांना बरोबर नेतो.''

''चालेल.''

''गुलझारसिंग आणि अय्यर, तुम्हीही सामान घेऊन निघा. आणखी दोन जागा मिळाल्या तर पाहू. मात्र ते तिथं गेल्यावरच कळेल.''

इसोदा यांनी दोन मोटारी आणल्या होत्या. पहिल्या मोटारीत सुभाषबाबू, हबिबुर रेहमान आणि अय्यर बसले. मागच्या मोटारीत गुलझारसिंग, प्रीतमसिंग, अबिद हसन आणि देवनाथ दास निघाले. सुभाषबाबूंची मोटार विमानतळावर येऊन अर्धा तास झाला तरी मागची मोटार आलेली नव्हती.

मांचुरियापर्यंत सुभाषबाबूंसमवेत लेफ्टनंट जनरल शिदोई प्रवास करणार होते.

आणि ते तर पाच मिनिटेही थांबायला तयार होईनात. प्रसंगच तसा होता.

विमान येथे येऊन पोहोचल्याला दोन तास होऊन गेले होते.

मागच्या मोटारीत आझाद हिंद सरकारच्या काही मौल्यवान वस्तू होत्या. त्यामुळे मोटारीची वाट पाहणे क्रमप्राप्त झाले. ती मोटार येताच हबिबूर रेहमान यांनी त्या मोटारीतील सामान धावत जाऊन विमानात ठेवले.

विमानात बसण्यापूर्वी सुभाषबाबूंनी इसोदा आणि हाचिया यांचा निरोप घेतला.

सुभाषबाबूंशी हस्तांदोलन करताना गुलझारसिंग, प्रीतमसिंग, अबिद हसन, एस. ए. अय्यर आणि देवनाथ दास यांना बोलणे अशक्य होऊन गेले.

सुभाषबाबूंच्या पाठोपाठ हबिबुर रेहमान यांनी विमानात प्रवेश केला आणि लागलीच विमानाचे पंखे फिरू लागले.

सुभाषबाबूंनी १७ ऑगस्टला संध्याकाळी सव्वा पाच वाजता अज्ञाताच्या रोखाने झेप घेतली.

तेराउचि यांनी सुभाषबाबूंबरोबर लेफ्टनंट जनरल शिदोई यांना मुद्दामच दिले होते. या जपानी सेनानीला इंग्रजी, फ्रेंच आणि जर्मन भाषाही अवगत होत्या. शिवाय त्यांनी आंतरराष्ट्रीय कायद्याचाही अभ्यास केला होता. त्या आधारे ते रशियन अधिकाऱ्यांशी, सुभाषबाबूंना आसरा देण्याबाबत बोलू शकणार होते.

आधीच्या बँकॉक ते सायगाव या प्रवासात जनरल इसोदा सुभाषबाबूंबरोबर होते.

बोलण्याच्या ओघात त्यांनी सहज विचारले होते, ''चंद्र बोस, तुम्ही रशियाला कशासाठी जाऊ इच्छीत आहात? तो तुम्हाला मदत करील असं

खरोखरंच वाटतं का?''

''मी कोणत्याही भ्रमात नाही. रशियन कदाचित मला मदत करील वा करणारही नाही. पण त्याचं धोरण काय आहे हे तिथं गेल्याशिवाय मला कसं कळणार? तो जास्तीत जास्त काय करील, मला तुरुंगात टाकेल किंवा फाशी देईल. मी त्याला तयार आहे. तो मदत करण्याची शक्यता आहे या अंधुक आशेचा आधार तिथं जायला मला पुरेसा आहे.''

हे इसोदा यांच्याकडून कळले तेव्हाच तेराउचि यांनी ठरवून टाकले होते, सुभाषबाबूंबरोबर त्सुनामासा शिदेई यांच्यासारखा मातब्बर माणूसच द्यायचा.

सुभाषबाबूंच्या या 'अज्ञाताकडच्या उड्डाणा' साठी तेराउचि यांनी वैमानिकही तसेच तोलामोलाचे निवडले. आओयागी हा सायगावमधला सर्वोत्तम वैमानिक. त्याच्या दिमतीला दिलेला मेजर साबुरो ताकिजावा हाही असाच अनुभवी माणूस. लेफ्टनंट कर्नल शिरो नोनोगाकी आणि मेजर तारो कोनो हेही या विमानातून निघाले होते.

दोन तासांनी विमान सायगाव आणि हॅनोई यांच्या दरम्यान तुरेन येथे थांबले. रात्रीचा प्रवास करणे धोक्याचे वाटल्यामुळे आओयागी याने ती रात्र तेथेच काढली. या दोन तासांच्या प्रवासात सुभाषबाबूंची शिदोई यांच्याशी दोस्ती जमली. तुरेनच्या विमानतळावरची ती रात्र दोघांनी गप्पा मारून व्यतीत केली. १८ ऑगस्टला सकाळी पाच वाजता विमानाने तुरेन सोडले आणि ते तैवानमधल्या तैपेइकडे निघाले. दुपारी बाराच्या सुमाराला तैपेई आले.

आओयागी याने सात तासांत बाराशे मैलांचा पल्ला गाठला.

येथे इंधन भरायचे होते. इंजिन ठाकठीक आहे ना, हे पाहायचे होते.

सुभाषबाबूंनी विमानतळालगतच्या उपाहारगृहात जाऊन सँडविचेस आणि केळी खाल्ली. भुकेचा प्रश्न मिटला. मांचुरियातले दैरेन येईपर्यंत वाटेत काहीही मिळणार नव्हते.

हा या प्रवासातला शेवटचा टप्पा– एक हजार मैलांचा. या प्रवासाला सहा तास तरी लागणार होते. अंधार पडायच्या आत तेथे पोहोचायचे म्हणजे लवकर निघायला हवे होते. दोनच्या सुमाराला आओयागीने विमान सुरू केले– सगळे काही व्यवस्थित आहे याची खात्री करून घेतल्यावर.

नऊशे मीटर लांबीच्या धावपट्टीवरून विमान जाऊ लागले. सातशे मीटर गेल्यावर विमानाच्या चाकांनी जमिनीबरोबरचा संबंध सोडला.

एवढ्यात काय झाले हे कोणालाच कळले नाही. विमान एकदम डावीकडे वळले आणि लागलीच खाली येऊन शेतात आदळले. इंजिनाने पेट घेतला. आत असलेली पेट्रोलची टाकी धक्क्याने फुटली आणि पेट्रोल

वाहू लागले. विमान ज्वाळांनी आणि धुराने वेढले गेले. जो तो बाहेर पडण्याची धडपड करू लागला.

हबिबुर रेहमान यांच्या पाठोपाठ सुभाषबाबूंनीही बाहेर उडी टाकली. त्यांचे कपडे मागच्या बाजूला पेट्रोलने ओले असल्यामुळे पेटले. हबिबुर रेहमान यांनी पाहिले, नेताजी दोन्ही हातांनी कपड्यांना लागलेली आग विझविण्याचा निकराचा प्रयत्न करीत आहेत. हबिबुर रेहमान धावत गेले आणि त्यांनी नेताजींचे पेट घेतलेले कपडे ओढून काढले. रेहमान यांचे हात भाजत होते, तरीही त्यांनी सुभाषबाबूंना गवतावर झोपविले आणि त्यांना काय हवे-नको हे पाहू लागले.

सुभाषबाबूंचा मानेपासून कंबरेपर्यंतचा भाग खूपच भाजला होता. उडी मारताना डोक्याला खोक पडली होती. सुभाषबाबूंचा चेहरा रक्ताने माखून गेला.

हबिबुर रेहमान जे जमेल ते करीत होते.

सुभाषबाबूंना असह्य वेदना होत असल्या पाहिजेत हे त्यांच्या चेहऱ्यावरून कळत होते.

त्या तशा अवस्थेतही सुभाषबाबू विचारत होते, ''हबिबुर, तुम्हाला फारसं लागलेलं नाही ना?''

''नाही, नेताजी.''

''मग ठीक आहे.''

सुभाषबाबू कण्हत होते. मधूनच बोलण्याचा प्रयत्न करीत होते.

बोलणे अस्पष्ट होऊ लागल्यामुळे ते काय सांगू इच्छित आहे हे समजणे कठीण झाले. सुभाषबाबूंनी जोराचा श्वास घेतला आणि सारी शक्ती एकवटून ते हबिबुर रेहमान यांना सांगू लागले, ''या अपघातातून मी वाचेन असं वाटत नाही, हबिबुर, तुम्ही हिंदुस्थानात जाल तेव्हा आपल्या लोकांना सांगा, देशासाठी मी शेवटपर्यंत झुंजत होतो. आता कोणतीही शक्ती हिंदुस्थानला फार काळ पारतंत्र्यात ठेवू शकणार नाही– हिंदुस्थान स्वतंत्र होणार– लवकरच.''

हेच सुभाषबाबूंचे अखेरचे उद्‌गार. कारण त्यानंतर त्यांची शुद्ध हरपली.

सुभाषबाबूंप्रमाणे शिदेई, आओयागी आणि ताकिजावा हेही भाजले होते.

त्या चौघांना तैपेइमधल्या लष्करी रुग्णालयात हलविण्यात आले. रुग्णवाहिका पंधरा मिनिटांत तेथे पोहोचली आणि वैद्यकीय उपचार सुरू झाले.

डॉक्टर जखमींना वाचविण्याचा पराकाष्ठेचा प्रयत्न करू लागले.

१८ वी आवृत्ती

सखी



लेखक

व. पु. काळे

किंमत : १८०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.

स्त्रीच्या विविध रूपांतून
सर्वांत हवंहवंसं वाटणारं
कुठलं रूप असेल,
तर ते असतं 'सखी'चं.
वेगवेगळ्या 'अँगल'नं
वपुंना भेटलेली ही सखी... तिचं अस्तित्व, तिची भावुकता, वैचारिक उंची, तिची दु:खं, उत्कटता प्रत्येक कथेतून वेगळं रूप घेऊन अवतरते.
देहातीत आनंदाच्या विश्वात घेऊन जाणारी ही सखी... तुम्हाला आम्हालाही भेटेल?

असह्य वेदनांनी सारा देह तडफडत असानाही सुभाषबाबूंना एक समाधान लाभले– अखेरच्या क्षणापर्यंत आपण शपथेला जागलो, याचे.

शिदेई, आआयोगी आणि ताकिजावा यांचे लगेचच निधन झाले.

सुभाषबाबूंवर डॉ. योशिमी उपचार करीत होते.

भाजलेल्या माणसाचे रक्त घट्ट होऊ लागते आणि मग त्याच्या हृदयावरचा ताण वाढतो. श्वास घेणे कठीण होऊन जाते.

सुभाषबाबूंचे पहिले साकळलेले रक्त काढून टाकण्यात आले आणि त्याच्या जागी नवे रक्त भरण्यात आले.

दर अर्ध्या तासाने सुभाषबाबूंना व्हीटा कॉम्फरचे इंजेक्शन देण्यात येई.

मधूनच ते पाणी मागत. त्यांची तडफड डॉक्टरांनादेखील पाहवेना.

संध्याकाळी सातच्या सुमाराला सुभाषबाबूंची नाडी हाताला लागेनाशी झाली.

रात्री साडेआठ वाजता सुभाषबाबूंची प्राणज्योत मालवली.

डॉ. योशिमी यांनी हबिबुर रेहमान यांना सुभाषबाबूंच्या मृत्यूचा दाखला दिला. त्याच्यावर निधनाचे कारण नमूद करण्यात आले होते : 'शरीर कमालीचे भाजल्यामुळे.' वीस तारखेला सुभाषबाबूंच्या पार्थिव देहावर तैपेइ येथेच अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचा रक्षाकलश विमानाने ५ सप्टेंबरला टोकियोला नेण्यात येऊन तिथल्या रेनकोजी या प्रसिद्ध बौद्ध मंदिरात त्याची विधिपूर्वक प्रतिष्ठापना करण्यात आली.

२२ ऑगस्टला टोकियो नभोवाणीवरून सुभाषबाबूंच्या अपघाती निधनाची वार्ता सांगण्यात आली. तिच्यावर कोणाचाच विश्वास बसला नाही. लोकांचाच कशाला, खुद्द व्हॉईसरॉय लॉर्ड वेव्हेल यांचाही. ते म्हणाले, ''सुभाषचंद्र बोस यांना अज्ञातवासात जाणं सुकरं व्हावं म्हणून ही खोटी बातमी मुद्दामच पसरविण्यात आली असली पाहिजे.''

त्याच दिवशी त्यांनी गृह विभागाचे प्रमुख आर. एफ. मुडी यांना सुभाषचंद्र बोस कोठे गेले असावेत यासंबंधी शोध करण्याचा आदेश दिला.

दुसऱ्या दिवशी म्हणजे तेवीस तारखेला मुडी यांनी व्हॉईसरॉयना कळविले :

'सुभाषचंद्र बोस यांचा आझाद हिंद फौजेवर विलक्षण प्रभाव आहे. आपण आतापर्यंत फक्त बारा हजार आझाद हिंद सैनिकांना ताब्यात घेतले आहे. अजून पंधरा हजार जणांना अटक करायची आहे, हे विसरून चालणार नाही. सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद फौजेमध्ये सर्व वंशाचे, सर्व जातींचे आणि सर्व धर्माचे लोक असून, एक अत्यंत नि:स्वार्थी आणि प्रामाणिक

देशभक्त म्हणून त्या सर्वांना बोस यांच्यासंबंधी कमालीचा आदर आणि आत्मीयता वाटते. हिंदुस्थानातही बोस यांना फार मानले जाते. बंगालमध्ये तर एक गांधीजी सोडले तर बोस यांच्याइतकी लोकप्रियता दुसऱ्या कोणाही नेत्याला लाभलेली नाही. आपण त्यांना हिंदुस्थानात आणले तर आपल्यावर लोकमताचे एवढे दडपण येईल, की त्यांना फाशी देणे अशक्य होऊन जाईल. ती जबाबदारी घ्यायला ब्रह्मदेशचे सरकारही तयार होणार नाही. आपण बोस यांच्यावर सिंगापूर येथे किंवा दुसऱ्या एखाद्या ठिकाणी खटला भरला तर वेगळेच प्रश्न उपस्थित होतील.

सुभाषचंद्र बोस यांना लष्करी न्यायालयापुढे उभे करून देहान्ताची सजा फर्माविता येईल; परंतु आपण एवढी तातडी का केली, याचे समर्थन करणे जड जाईल. शिवाय आपल्याला वाईटपणा पत्करावा लागू नये म्हणून सरकार हे प्रकरण आपल्याकडे सोपवीत आहे, अशी लष्कराकडून तक्रार केली जायची शक्यता आहे. सुभाषचंद्र बोस यांना आपण फाशी न देता, नुसती तुरुंगवासाची शिक्षा दिली तरीही लोकांना ते सहन होणार नाही. बोस यांच्या सुटकेची मागणी करणारे आंदोलन देशभर पेटेल. म्हणून सर्व गोष्टींचा विचार करता, सुभाषचंद्र बोस जेथे कोठे असतील तेथेच त्यांना राहू देणे आपल्याला अनेक दृष्टीने सोयीचे ठरणार आहे.' सुभाषचंद्र बोस म्हणजे संपूर्ण हिंदुस्थान हे समीकरण सार्थ ठरावे, असेच तेव्हाचे वातावरण होते.

म्हणूनच वेव्हेल यांना मुडी यांचा सल्ला मानावा लागला.

तरी ते पुढे बरेच दिवस म्हणत, ''हा माणूस कुठं गेला आहे हे कळायलाच हवं.'' सुभाषबाबू जिवंत असावेत, असे गांधीजींनाही वाटत होते.

अलीकडे 'हरिजन'मध्ये लिहिताना गांधीजी 'सुभाषबाबू' असा उल्लेख करीत नसत; 'नेताजी' म्हणत असत.

त्यांनी लिहिले :

'आझाद हिंद फौजेने साऱ्या हिंदुस्थानला भारावून टाकले आहे. आझाद हिंद फौज म्हटली की डोळ्यासमोर येतात ते नेताजीच. त्यांची देशभक्ती इतर कोणाहीपेक्षा किंचितही कमी नाही. (मी मुद्दामच वर्तमानकाळातील क्रियापद वापरत आहे.) नेताजींचे सारे जीवन म्हणजे अतुलनीय शौर्याचे तेजस्वी दर्शन.'

१५ ऑगस्ट १९४५ रोजी सुभाषबाबूंनी आपल्या अंतिम आदेशात आझाद हिंद सैनिकांना ग्वाही दिली होती : 'हिंदुस्थान स्वतंत्र होणार– लवकरच.'

तसेच झाले. बरोबर दोन वर्षांनी त्याच तारखेला भारत स्वतंत्र झाला.

१५ ऑगस्ट १९४७ या दिवसावर इतर कोणाहीपेक्षा अधिक अधिकार होता तो अर्थात सुभाषबाबूंचाच.

हाऊस ऑफ कॉमन्समध्ये सत्तांतराचे विधेयक मांडले ते इंग्लंडचे तेव्हाचे पंतप्रधान क्लेमंट ॲटली यांनी. 'हिंदुस्थानला स्वातंत्र्य बहाल करण्याची तुम्हाला एवढी घाई का झालेली आहे,' या कॉंझर्व्हेटिव्ह पक्षाच्या आक्षेपाला उत्तर देताना ॲटली उद्‌गारले, ''हिंदुस्थानात आज आपण ज्वालामुखीच्या तोंडावर बसलो आहोत म्हणून.''

हा ज्वालामुखी म्हणजे सुभाषबाबूंची आझाद हिंद फौज. पंतप्रधानपदावरून पाच वर्षांनंतर दूर झाल्यावर ॲटली भारतात आले होते. कलकत्त्यात त्यांचा दोन दिवस मुक्काम होता– तिथल्या राजभवनामध्ये. कलकत्ता उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश पी. बी. चक्रवर्ती तेव्हा पश्चिम बंगालचे हंगामी राज्यपाल होते.

त्यांनी ॲटली यांना सरळच विचारले, ''गांधीजींचं 'छोडो भारत' आंदोलन १९४७च्या किती तरी अगोदर विरून गेलं होतं. इंग्रजांनी इथून ताबडतोब निघून जावं, अशी काही तेव्हाची परिस्थिती नव्हती. तरीही तुम्ही तसं का ठरवलं?''

''अनेक कारणं होती; पण त्यातलं सर्वांत महत्त्वाचं कारण म्हणजे सुभाषचंद्र बोस आणि त्यांची सेना. हिंदी सैनिकांसंबंधी खात्री देता येऊ नये, अशी परिस्थिती निर्माण झाल्याचं आढळून आल्यावर आम्हाला दुसरा काही मार्गच राहिला नव्हता.''

''भारत सोडून जाण्याच्या तुमच्या निर्णयावर गांधीजींच्या आंदोलनाचा कितपत परिणाम झाला होता?'' ॲटली एकेक अक्षर संथपणे उच्चारत होते. ''फा र च क मी.''

१५ ऑगस्ट १९४७ या दिवशी लाल किल्ल्यावर स्वतंत्र भारताचा तिरंगा फडकला.

सुभाषबाबूंचे स्वप्न साकार झाले.

राजधानीत 'पंडित जवाहरलाल नेहरू की जय' च्या बरोबरीने 'पंडित माऊंटबॅटन की जय' च्या घोषणा दुमदुमू लागल्या.

सुभाषबाबूंचा जयजयकार कोठेच ऐकू येईना. गांधीजी त्या दिवशी दिल्लीत नव्हते; ते अगोदरच कलकत्त्याला गेलेले होते. त्यांनी तेथून दिल्लीकडे साधा अभिनंदनपर संदेशदेखील धाडला नाही. संध्याकाळच्या वेळी शरदबाबू त्यांना भेटायला आले. गांधीजी उद्‌गारले, ''आज सुभाष हवा

होता. तोच केवळ देशाला वाचवू शकला असता.''

विभाजनाच्या पार्श्वभूमीवर पंजाबपासून बंगालपर्यंत उफाळून आलेल्या धार्मिक विद्वेषाच्या संदर्भात गांधीजी हे म्हणत होते. जे इतरांना जमू शकत नाही ते सुभाषबाबू साध्य करू शकले असते, या गांधीजींच्या विश्वासात सर्व काही आले.

नवभारताच्या निर्मात्याची नेताजींना हीच आंतरिक आदरांजली. सुभाषबाबूंना जे जीवनाने नाकारले ते मृत्यूने दिले. एखाद्याचे भागधेय उफराटे असते, त्याला कोण काय करणार? सुभाषबाबू जिवंत असावेत, असे सुरुवातीला वाटणे स्वाभाविक होते.

भारत सरकारने दोन चौकशी आयोग नेमले. दोघांचाही अभिप्राय एकच पडला : 'सुभाषबाबूंचे १८ ऑगस्ट १९४५ रोजी विमान अपघातात निधन झाले, ही वस्तुस्थिती मान्य करायलाच हवी.'

तरीही काही जण प्रतिज्ञेवर सांगू लागले, ''सुभाषबाबू जिवंत असून योग्य वेळ येताच ते इथे प्रकट होतील.''

हा निव्वळ भाबडा भरवसा होता.

त्याला पुराव्याचा पाया नव्हता.

सुभाषबाबूंच्या जिवंतपणाची ग्वाही देऊन आपण त्यांच्या अभिजित आत्मतेचा अश्लाघ्य अवमान करीत आहोत, याचेही या अहंमन्यांना भान उरले नाही.

किट्टी कुर्टी हिला या निरर्थक वादात स्वारस्य नव्हते. ती चेक महिला सुभाषबाबूंना बर्लिनमध्ये भेटली होती. दोघांनी मनोविश्लेषणासंबंधी चर्चा केली होती. 'नाझी जर्मनी सोडून तू अमेरिकेत राहायला जा', असे सुभाषबाबूंनीच तिला आग्रहाने बजावले होते. तिच्या स्त्रीसुलभ वत्सलतेची आस वेगळीच होती.

'हे बंधो, तू आता कोठे आहेस?

जपानच्या भूमीशी तुझी रक्षा एकरूप होऊन गेली आहे का?

का काही जण म्हणतात त्याप्रमाणे, एखाद्या उत्तुंग शिखराच्या दुर्गम मठामध्ये बसून तू ब्रह्मानंदाचा आस्वाद घेत आहेस?

परिव्राजकाचा कषायवेष धारण करून दीनदुबळ्यांचे अश्रू पुसत तू परिक्रमा करीत आहेस, असे दुसरे काही सांगतात ते खरे आहे काय?

तुझे काहीही झालेले असो, तू या जगात असो वा नसो, तू जेथे कोठे असशील तेथे तुला माझे अभिवादन.

सृष्टीच्या सूत्रधारापाशी तुझ्यासंबंधी माझी एकच प्रार्थना आहे– देवा, या

आत्मचरित्र

‘अशी ही बनवाबनवी’

(सचिन पिळगांवकर यांच्या ‘हाच माझा मार्ग’ या आत्मचरित्रातून)

सचिन पिळगांवकरांनी जे चित्रपट दिग्दर्शित केले, त्या चित्रपटांपैकी ‘अशी ही बनवाबनवी’ हा एक उल्लेखनीय चित्रपट. व्ही. शांताराम प्रॉडक्शन्सने या चित्रपटाची निर्मिती केली होती आणि खुद्द व्ही. शांताराम यांनी दिग्दर्शनाची जबाबदारी सचिन यांच्यावर सोपवली होती. या चित्रपटाची जन्मकहाणी, चित्रपटाच्या शूटिंग दरम्यानचे अनुभव, या चित्रपटाला मिळालेलं यश याबद्दल वाचायला मिळतं ते त्यांच्या ‘हाच माझा मार्ग’ या आत्मचरित्रातील ‘अशी ही बनवाबनवी’ या प्रकरणातून...

एके दिवशी चित्रमहर्षी व्ही. शांताराम यांचे पुत्र किरण शांताराम यांचा मला फोन आला की, अण्णांना (व्ही. शांताराम) तुला भेटायचंय. मी भेटायला गेलो.

‘‘सचिन, माझी अशी इच्छा आहे की, आमच्या कंपनीसाठी तू एक फिल्म ‘डिरेक्ट’ करावीस.’’ ते म्हणाले. साक्षात व्ही. शांताराम यांनी दिलेली ती ऑफर मी नाकारणं शक्यच नव्हतं. माझ्याकडे ‘आत्मविश्वास’ची कथा तयार होती. मी त्यांना ती ऐकवली. त्यांना तो विषय खूप आवडला. ‘‘सचिन, चांगली स्टोरी आहे; पण आपल्याला एखादा विनोदी चित्रपट करायचाय.’’

मग मी त्यांना ‘आमच्यासारखे आम्हीच’ची गोष्ट ऐकवली. दोन हिरोंची ती गोष्ट होती.

ते म्हणाले, ‘‘ही चांगली आहे. यात तू आणि सुशांत (रे) दोघांनी काम करा.’’ सुशांत हा त्यांचा सख्खा नातू.

‘‘अण्णा, मी ही गोष्ट मला आणि अशोकला डोक्यात ठेवून

लिहिलेली आहे.'' मी सांगितलं.

''ते ठीक आहे, पण मी सुशांतला प्रॉमिस केलंय. त्यामुळे तो चित्रपटात असणं गरजेचं आहे.''

''या भूमिकेसाठी मी त्याचा विचार नाही करू शकत.'' मी स्पष्टपणे सांगितलं.

''तसं असेल तर मग कठीण होईल.''

''ओके अण्णा. अच्छा!'' असं म्हणून मी तिथून तडक बाहेर पडलो. घरी निघून आलो. पुन्हा दोन दिवसांनी किरणदादाचा फोन आला.

''अशोक आणि सुशांतला घेऊन तू काही करू शकतोस का?''

''नाही. तुम्ही अटी मांडणार असाल, तर मला पिक्चर करायचा नाहीये.'' मला कुठलीही तडजोड करण्याची इच्छा नव्हती.

अण्णांकडून बाहेर पडल्यानंतर दुसऱ्याच दिवशी मी हृषिकेश मुखर्जींना भेटायला गेलो. त्यांना म्हटलं, ''तुम्ही मला एक गोष्ट ऐकवली होतीत, ती मला फार आवडली होती. त्यावर तुम्ही चित्रपट केलात, तो मला नाही आवडला, कारण तुम्ही तो तुमच्या पद्धतीनं केला होतात. पण मला त्याच कथेवर मराठीत चित्रपट करायचा आहे. मी करू का?''

''नको रे. मी बनवला, तर 'फ्लॉप' झाला. तू केलास तरी फ्लॉपच होईल. कशाला हात दाखवून अवलक्षण?''

''नाही हृषिदा. मला माझ्या पद्धतीनं बनवून पाहू द्या.'' मी त्यांना विनंती केली.

''अच्छा, आता तू मला सिनेमा कसा बनवायचा ते शिकवणारेस?'' ते गमतीनं म्हणाले.

''तसं नाही हो. मी तुम्हाला फक्त सांगतोय की, त्यावरून चांगला चित्रपट होऊ शकेल. तुम्ही फक्त परवानगी द्या.'' त्यांनी होकार दिला.

दरम्यान, चार दिवसांनी किरणदादाचा फोन आला.

''अण्णांना तुला भेटायची इच्छा आहे.'' मी गेलो.

''अरे, तू माझ्यावर रागावलास!'' अण्णा समजुतीच्या सुरात म्हणाले.

''नाही हो अण्णा. रागावलो नाहीये. तुमची काही तत्त्वं आहेत, माझीही काही आहेत. ती जमली, तर एकत्र काम करू. पण एकत्र काम केलं नाही, तरी तुमच्याबद्दल माझ्या मनात असलेला आदर नक्कीच कमी होणार नाही.'' मी माझ्या मनातलं त्यांना सांगितलं.

''पण माझी इच्छा आहे रे, तुझ्याबरोबर काम करायची.''

''माझीपण आहे अण्णा!''

''तू, अशोक आणि सुशांत अशा तिघांचा सिनेमा नाही का करता येणार

तुला?''

''हां. हे जमेल. पण मग तिघंच का? चौघं का नको?''

''चौथं कोण?'' अण्णांना प्रश्न पडला.

''लक्ष्मीकांत बेर्डेनंही माझ्याबरोबर कधी काम नाही केलेलं. त्याला करायचंय!''

''चालेल. तुझ्याकडे गोष्ट आहे कुठली?''

मी तयारीतच होतो. मी त्यांना चार मित्रांची एक गोष्ट ऐकवली. त्यावरून चित्रपट करायचं माझ्या डोक्यात बरेच दिवस घोळत होतं. चित्रपटाचं नावही माझ्या डोक्यात पक्कं होतं – 'बनवाबनवी'.

माझ्याकडे पटकथा तयार नव्हती; पण कथेबरोबर दोन सीन्स मी अण्णांना आवर्जून ऐकवले. ते म्हणजे बालगंधर्व रंगमंदिरात घडणारा सीन आणि दुसरा लक्ष्याच्या डोहाळजेवणाचा. अण्णांनी हात वर करून उत्स्फूर्तपणे टाळ्या वाजवून मला दाद दिली.

''हेच कर, हेच कर!'' त्यांनी जाहीर केलं.

''ठीक आहे. आणखी एक गोष्ट सांगतो अण्णा. तुम्ही मला इथे बोलावलंत, ते माझं काम पाहूनच बोलावलं असणार. माझ्यावर भरवसा असणार तुमचा.'' मी प्रस्तावना केली.

''हो. म्हणजे काय!''

''मग तो भरवसा पूर्णपणे ठेवा. अर्धवट नको.''

''म्हणजे?''

''सेन्सॉरकडे जायच्या आधी मी तुम्हाला चित्रपट दाखवणार. त्याआधी एक फ्रेमसुद्धा बघायची नाही.''

''म्हणजे तू 'मॅरिड प्रिंट' दाखवणार की 'रश प्रिंट'?''

''मॅरिड प्रिंट दाखवणार!'' (चित्रपट तयार करण्याची सर्वसाधारण पद्धत अशी की, 'शूटिंग' पूर्ण झाल्यानंतर 'डबिंग' केलं जातं. मग 'साउंड इफेक्ट्स रेकॉर्ड' केले जातात, पार्श्वसंगीत दिलं जातं. या सर्व ऑडिओचं मिक्सिंग केलं जातं. आणि ते 'व्हिज्युअल'ला जोडलं जातं. अशा प्रकारे चित्रपट प्रदर्शनासाठी तयार होतो. त्याला 'मॅरिड प्रिंट' म्हणतात.)

अण्णा काही क्षण शांत राहिले. मग म्हणाले, ''ओके!''

आणि अशा रीतीनं चित्रपटाला सुरुवात झाली. अर्थात, त्याआधी मी अण्णांना संपूर्ण पटकथा ऐकवली. त्यात आवश्यक वाटल्यास काही सुधारणा सुचवा, असंही सांगितलं. अण्णांच्या अफाट अनुभवाचा आणि कल्पकतेचा लाभ मला हवाच होता! त्यांनी क्लायमॅक्समध्ये काही बदल सुचवले. हे चौघंही शेवटी जास्त अडचणीत आले पाहिजेत, असं त्यांना

वाटत होतं. वसंत सबनीसही माझ्यासोबत होते. मी म्हटलं, ''ठीक आहे अण्णा. तुम्हाला काय म्हणायचंय ते लक्षात आलंय माझ्या.''

''कळलंय ना? चला! विषय संपला! सिनेमाला सुरुवात करा!!'' अण्णांनी होकार देऊन टाकला.

अण्णांनी दिलेला शब्द पाळला. राजकमल स्टुडिओत सेट लागला होता. त्याच स्टुडिओत अण्णांचं ऑफिस होतं. ते रोज तिथे यायचे; पण सेटवर कधी त्यांनी पाऊल ठेवलं नाही. किरणदादा त्यांना म्हणाला, ''अण्णा, चला ना, सेटवर तुमच्याबरोबर एखादा फोटो काढू.''

''नको. ते प्रकरण वेगळं आहे. मी तिथे जाणार नाही!'' त्यांनी जाहीर केलं.

''का हो अण्णा?''

''माझ्या सेटवर दुसऱ्या दिग्दर्शकानं आलेलं कधी मला चालायचं का?''

''नाही.''

''मग? तो पोरगा माझ्यासारखाच आहे!'' अण्णांनी किरणदादाला समजावलं.

'हृदयी वसंत फुलताना...' गाण्याचं शूटिंग झालं, त्यानंतर मी ते किरणदादाला दाखवलं. तो उत्साहानं अण्णांकडे गेला.

''अण्णा, काय गाणं केलंय सचिननं. बघा ना!''

''एक मिनिट. त्यानं मला गाणं दाखवायला सांगितलंय का?''

''नाही.''

''मग मी नाही बघणार!'' अण्णासुद्धा माझ्यापेक्षा जास्त हट्टी. अर्थात, त्यांनी मला दिलेला शब्द ते पाळत होते. आम्हाला दोघांनाही एकमेकांबद्दल आदर होता आणि तोच आम्ही व्यक्त करत होतो. अशक्य गोष्ट कल्पकतेतून कशी साध्य करायची, हे अण्णांकडून मला शिकायला मिळालं.

लक्ष्याच्या डोहाळ-जेवणाच्या वेळच्या 'कुणीतरी येणार, येणार गं...' या गाण्याचं शूटिंग आम्हाला गच्चीत करायचं होतं. त्यासाठी चांगली गच्चीच मिळत नव्हती. मला एकदम आठवलं की, 'राजकमल'च्या इमारतीलाही गच्ची आहे. मग मी आणि किरणदादा ती बघून आलो. ती छान होती. तिथे शूटिंग करू या का, असं मी त्याला विचारलं. अडचण एकच होती की, त्याच गच्चीच्या बरोबर खाली अण्णांची बेडरूम होती आणि मला तीन रात्रभर तिथे शूटिंग करायचं होतं. अण्णांकडे परवानगी मागितली गेली.

''अण्णा, गाण्याचं शूटिंग सचिनला आपल्या गच्चीत करायचं आहे.''

''करू दे ना मग!''

''तीन रात्र शूटिंग चालेल. त्यातून गाण्याचे स्पीकर्स. तुमच्या झोपेचं काय?''

''तीनच रात्रींचा प्रश्न आहे ना? मी नाही झोपणार! त्यात काय एवढं?'' ते म्हणाले. मग आम्ही तीन रात्रींत ते शूटिंग पूर्ण केलं. त्यानंतर पुन्हा संकलनाच्या ठिकाणी अण्णा भेटले. मी नमस्कार केला.

''काय, माझ्या डोक्यावरच नाचलास? आनंद मिळाला ना तुला?'' त्यांनी विचारलं. ''काय अण्णा!'' मी हसलो.

''गंमत केली रे. कर, कर! चांगलं गाणं केलंयस म्हणे. कळलंय मला!''

मी नम्रपणे हसलो. तरीही 'तुम्ही एकदा गाणं बघा', असं अण्णांना चुकूनही म्हटलं नाही.

...आणि अखेर तो दिवस उजाडला. चित्रपटाची 'मॅरिड प्रिंट' तयार झाली. आता अण्णांना चित्रपट दाखवायचा होता. मी एक चॅलेंज स्वीकारून, अण्णांना अटी घालून स्वत:च्या हिमतीवर चित्रपट तयार केला होता; पण अण्णांची प्रतिक्रिया काय असेल, याची कुणालाच कल्पना नव्हती. माझा हा आत्मविश्वास माझ्या अंगाशी तर येणार नाही ना, अशी धाकधूक मनात होती; पण कुठेतरी भट्टी जमलेय, असं मात्र माझ्यासकट युनिटमधल्या प्रत्येकाला वाटत होतं.

राजकमल स्टुडिओमध्येच ट्रायल होणार होती. मी ट्रायलला अन्य काही लोकांनाही निमंत्रण दिलं. कॉमेडी चित्रपट होता, त्यामुळे वातावरणनिर्मिती आवश्यक होती.

ट्रायल सुरू झाली. माझे कुटुंबीय होते, सुप्रियाचे आई-वडीलही आले होते. मी सगळ्यात मागच्या सीटवर बसलो होतो. चित्रपट सुरू झाला. पहिला पंच गेला, दुसरा पंच गेला... कुणी हसायलाच तयार नाही. अण्णा थिएटरमध्ये असल्याचं दडपण असावं. शेवटी 'धनंजय माने इथेच राहतात का...', या दृश्याच्या वेळी अण्णा हसून सीटवरून अक्षरश: खाली पडले. त्यानंतर थिएटरमध्ये जो काही हशा सुरू झाला, तो शेवटपर्यंत थांबलाच नाही.

चित्रपट संपल्यावर थिएटरमध्ये लाइट लावले गेले. सगळे जण अण्णांच्या प्रतिक्रियेसाठी थांबले होते. अण्णांनी दोन्ही हात वर घेऊन टाळ्या वाजवून चित्रपटाला दाद दिली. त्यानंतर सगळ्यांनीच टाळ्यांचा कडकडाट केला. अण्णा थेट माझ्या आईकडे गेले. तिला म्हणाले, ''बघितलंत, तुमचा मुलगा काय-काय करू शकतो ते? काय 'एडिटिंग' आहे सिनेमाचं. चित्रपटाला एवढा वेग असूनसुद्धा कुठेही घाई-गडबड केलेली वाटत नाही.''

स्वत: एक उत्तम संकलक असलेले अण्णा माझी प्रशंसा करत होते. मग

माझ्याकडे वळून म्हणाले, ''एकच सांगतो सचिन. यू आर ॲन ॲसेट टू फिल्म इंडस्ट्री.''

मी म्हटलं, ''अण्णा, तुम्ही हे बोललात, मला सगळं मिळालं. आता यानंतर एकही पुरस्कार मिळाला नाही तरी चालेल.''.

'बनवाबनवी'मध्ये ॲक्शन कॉमेडी लक्ष्याला दिली आणि फक्त डायलॉग कॉमेडी आपल्याला दिली, अशी अशोकची तक्रार होती. त्यानं त्याबद्दल माझ्याकडे नाही, पण वसंत सबनीसांकडे तक्रार केली. 'ॲक्शन कॉमेडी फक्त लक्ष्यालाच नाही, तर सचिनलाही आहे,' असं सबनीसांनी त्याला सांगितलं होतं.

आपली दृश्यं भरपूर असली, तरी प्रत्यक्ष चित्रपटात त्यातली किती राहणार, अशी शंका लक्ष्याच्या मनात होती. अशोक सराफ हा माझा आवडता असल्यानं त्याच्या भूमिकेला जास्त महत्त्व मिळेल, अशी त्याला भीती होती. प्रत्यक्षात तसं काहीच झालं नाही. कारण मी कलाकारापेक्षाही व्यक्तिरेखेवर जास्त प्रेम करणारा दिग्दर्शक आहे. 'मी महेशचा (कोठारे) कपिल देव आहे, तर अशोक हा सचिनचा जावेद मियाँदाद आहे,' असं लक्ष्या नेहमी म्हणायचा. तेव्हा मी त्याला सांगितलं, 'लक्ष्या, क्रिकेटमध्ये कुणीतरी जिंकण्यासाठी कुणीतरी हरावं लागतं. पण आपल्या क्षेत्रात कुणी न हरताही आपण जिंकू शकतो.'

या चित्रपटाचा ऑडिओ रिलीज सुधीर फडके यांच्या हस्ते झाला होता. ऑडिओ कॅसेट्सचा विक्रमी खप झाला आणि त्याबद्दल मिळालेली डबल प्लॅटिनम डिस्क दिलीपकुमार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. हृषिदांनी 'बनवाबनवी' पाहिला आणि त्यांना तो आवडला. त्यांनी माझं तोंड भरून कौतुक केलं.

चित्रपटाला पुरस्कार मिळाला, माझं चौफेर कौतुक झालं. त्या वेळी मी जुहू अपार्टमेंट्समध्ये राहत होतो. त्या वेळी आमच्या बाथरूममधला शॉवर बिघडला होता. त्यामुळे नळाने बादली भरून अंघोळ करावी लागत होती. बादली पूर्ण भरल्याशिवाय अंघोळ सुरू करायची नाही, ही माझी सवय. मी बादली भरायला लावली आणि डोक्यात लोकांनी काढलेले प्रशंसापर उद्‌गार घुमायला लागले. मी त्याच कौतुकभरल्या दुनियेत हरवून गेलो. बादली भरल्याचं जाणवल्यावर मी एकदम भानावर आलो. घाईघाईनं नळ बंद करायला लागलो, पण तो बंदच होईना. ही झटापट दहा मिनिटं सुरू होती. मी हवालदिल झालो. काय करावं, काही कळत नव्हतं. त्याच क्षणाला माझ्या लक्षात आलं की, मी त्या धुंदीत असल्यामुळे नळ नेमका उलट्या दिशेनं फिरवत होतो. मी शांत झालो आणि नळ व्यवस्थित बंद केला. लहानपणी

वाचलेल्या 'भीमाचे गर्वहरण' या गोष्टीची आठवण झाली. आपल्या गुणांचा अभिमान असावा, गर्व नसावा, याची जाणीव मला त्या क्षणी झाली.

या चित्रपटात स्त्री भूमिका करताना मी सुंदर दिसलो, असं प्रेक्षकांचं म्हणणं आहे. त्याला कारण आहे; माझी आई. माझ्या मते, माझी आई ही जगातली सगळ्यात सुंदर स्त्री आहे. ती कशी बोलते, वागते, कशी चालते, कशी कामं करते, हे मी लहानपणापासूनच बघत आलो आहे. ही भूमिका करताना मी त्या निरीक्षणांचा उपयोग केला. आईप्रमाणेच सुलोचनाबाईंच्या लकबीही मी या अभिनयात वापरल्या. त्या चित्रपटात मी साडी नेसण्यापेक्षाही साडी सांभाळली जास्त. पुरुष कलाकाराने स्त्रीची भूमिका करताना केवळ हसवणं हा उद्देश न ठेवता, त्याच्याकडे जबाबदारी म्हणून पाहायला हवं. स्त्रीबद्दलच्या जेवढ्या आदरानं आपण ती भूमिका सादर करू, तेवढं प्रेक्षकांना ते भावतं. कॉमेडीसाठी चित्रपटांत स्त्रीच्या वेषभूषेचा झालेला वापर अनेकदा अश्लीलतेकडे झुकणारा होतो. मला तसं करण्याची कधी गरज वाटली नाही आणि यापुढे वाटणार नाही. मी खट्याळ आहे, पण अश्लील नाही. माझ्या चित्रपटात चावटपणा असू शकतो, पण अश्लीलतेला थारा नसतो. 'बनवाबनवी'मधली माझी ती भूमिका मी तेवढ्याच जबाबदारीनं सादर केली, म्हणूनच ती लोकांच्या अजूनही लक्षात आहे.

'बनवाबनवी' प्रदर्शित झाल्यानंतरची गोष्ट. कुठल्यातरी एका चित्रपटाच्या ध्वनिफितीचं माझ्या हस्ते प्रकाशन होतं. कार्यक्रम व्यवस्थित झाला. त्या वेळी बॉम्बे पब्लिसिटीचे एम. बी. सामंत यांच्या पत्नी (अरविंद सामंत यांच्या मातु:श्री) माझ्याजवळ आल्या. त्यांच्यासोबत त्यांची नात म्हणजे एक लहान मुलगी होती. त्यांनी मला त्यांची ओळख सांगितली. मी त्यांना ओळखत होतोच. मी नमस्कार केला.

''अरे, मला हिला तुझ्याशी ओळख करून द्यायची होती. हिनं बालगंधर्वांना कधी पाहिलं नाहीये ना!'' त्या म्हणाल्या. मला काय बोलावं कळेना. मी बालगंधर्व नाही किंवा होऊ शकत नाही, याची मला कल्पना आहे. परंतु त्या बाईंच्या भावनेचा आदर करायलाच हवा होता. एक कलाकार म्हणून अशा प्रसंगात काय बोलायचं, याची आधी कितीही तयारी केली असली, तरी समोरच्या व्यक्तीच्या भावनांपुढे ती फिकी पडते. बालगंधर्वांच्या उंचीला पोहोचण्याची आपली क्षमता नाही, असं सांगणं हाही त्या चाहत्याच्या भावनांचा अपमान ठरू शकतो. मी काहीच बोललो नाही. त्या मुलीनं मला नमस्कार केला. चाहत्यांचं प्रेम हे असं असतं.

❖

१६ वी आवृत्ती

तप्तपदी



लेखक

व. पु. काळे

किंमत : १५०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.

वधूने शालू नेसलेला असतो.
वराने उपरणं पांघरलेलं असतं.
त्यामुळे ते उपरणं तो केव्हाही उतरवू शकतो.
वधूला ते उपरणं गाठीसकट सांभाळावं लागतं.
ते उपरण्याचं ओझं झटकून टाकायचं तिने ठरवलं
तर अजूनही ह्या समाजात तिला
जबर किंमत मोजावी लागते.

'सखा सप्तपदी भव'- एका ओळीच्या ह्या
अष्टाक्षरी कवितेतल्या 'सखा' ह्या शब्दाचा अर्थ
ज्या ज्या पुरुषांना समजला,
त्या त्या संसारांच्या बाबतीत
सात पावलांनी स्वर्ग पृथ्वीवर अवतरतो.
उरलेल्या संसारांची ती
तप्तपदीच!

पुस्तक परिचय

निर्विकार काळाची कहाणी...

कालपुरुष

सत्कृत्य काय किंवा दुष्कृत्य काय, माणसानं स्वतःला केंद्रस्थानी ठेवून रचलेल्या केवळ व्याख्या आहेत सगळ्या. जे तुला सत्कृत्य वाटतं त्यालाच दुसरा कोणी दुष्कृत्य म्हणेल. स्वाभाविक आहे ते. प्रत्येक जण आपापल्या समजुती-नुसार आपापले हित लक्षात घेऊन एखाद्या गोष्टीला त्या त्या वेळी सत्कृत्य किंवा दुष्कृत्य ठरवत असतो. कालपुरुष म्हणजे केवळ वर्तमान नव्हे. म्हणूनच तुमच्या समजुतीनुसार आणि तुमच्या हिताच्या दृष्टीने केलेल्या कृत्याची तो दखल घेत नसतो. तो पराकोटीचा निर्विकार असतो. त्याच्या वाट्याला आलेलं कर्म एकच- कशाचीही दखल घेतल्याविना आपल्या प्रवाहाच्या तटावर जे कोणतं दृश्य निर्माण होईल त्याचं प्रतिबिंब झेलत राहायचं. सरोवरात केवळ सूर्य-चंद्राचंच प्रतिबिंब पडत नसतं. किनाऱ्यावरची घाणेरडी कुत्री-डुकरंसुद्धा तोंड घालून प्रतिबिंब पाडू शकतात. काळाला त्याची मुळीच पर्वा नसते.

मूळ गुजराती लेखक
दिनकर जोषी

अनुवाद
सुषमा शाळिग्राम

साहित्याची भाषा सार्वत्रिक असते

यमुना एकदा का गंगेला मिळाली की ती यमुना उरत नाही, ती गंगाच होते. ही गंगा पुढे सागराला जाऊन मिळाली की सागर होऊन जाते. साहित्याचा प्राथमिक परिचय भाषेद्वारा होत असला तरी वास्तवात साहित्य हे निखळ साहित्य असते. माणूस भारतीय असतो, अमेरिकन असतो... त्या भूभागावरचा त्याचा निवारा हा एक प्रकारे अपघात असतो; तो पूर्वनिर्धारित नसतो. मुळात खऱ्या अर्थाने 'माणूस' असेल तर तो असेल तिथे, जाईल तिथे संस्कृतीची नवनवीन उद्याने फुलवू शकतो.

साहित्याचेही तसेच आहे. वि. स. खांडेकर जन्माने मराठी असतील; परंतु एकदा गुजरातीत अनुवादित झाल्यानंतर कोणाही गुजराती भाषक वाचकाला ते मराठी आहेत असे आठवतसुद्धा नसेल. मर्मज्ञ वाचकाचा संबंध भाषेशी नसतो, त्याचे नाते असते साहित्याशी... आणि साहित्याची भाषा सार्वत्रिक असते. 'प्रकाशाची सावली' (मूळ गुजराती - प्रकाशनो पडछायो) ही माझी कादंबरी १९९३ मध्ये मराठीत प्रकाशित झाली. त्यानंतरच्या या दोन दशकांत माझी पंधरा एक पुस्तके मराठीत अनुवादित झाली आहेत. मराठी वाचकांच्या स्वीकृतीविना प्रकाशकांनी ती प्रकाशित केली नसती, हे

सांगायची गरज नाही. मराठी वाचकांना भाषेचा अडसर कधीच नसतो; त्यांच्या संवेदना साहित्याशी जुळलेल्या असतात, याची प्रचिती मराठी वाचकांनी मला करून दिली आहे. त्यांच्या या सद्‌भावाचे ऋण मी मान्य करतो.

'कालपुरुष' ही कादंबरी पुस्तकरूपाने प्रकाशित झाली १९९५ मध्ये. त्याआधी गुजराती दैनिकाच्या साप्ताहिक पुरवणीत ती क्रमशः प्रसिद्ध होत होती. आज ही कादंबरी मराठीत प्रकाशित होत असताना मी सर्वप्रथम अनुवादक सुषमा शाळिग्राम यांचे आभार मानतो. याआधीही माझे साहित्य मराठी वाचकांपुढे सादर करताना त्यांनी स्नेहपूर्वक केलेले सहकार्य कसे विसरता येईल?

मराठीतील आघाडीच्या 'मेहता पब्लिशिंग हाऊस'नी यापूर्वी माझी पुस्तके प्रकाशित केली आहेत.

– दिनकर जोशी

पुरता एक दिवसही उलटला नव्हता अजून, अन् गजाबापांचा गौतम तेवढ्यात मौनीबाबा झाला होता! त्याचं हवं नको बघायला, त्याच्याकडे लक्ष पुरवायला एका पायावर तयार असणारा एक जथासुद्धा एव्हाना त्याच्याभोवती जमला होता. गौतमच्या आश्चर्याला आणि त्याहूनही अधिक आनंदाला पारावार उरला नाही. शब्दांचा महिमा त्याला माहीत होता. गोपालस्वामींच्या शब्दांनीच तो ओढला गेला होता; पुष्करधामला जायला निघाला होता; पण अनुच्चारित शब्दांतसुद्धा एवढं सामर्थ्य असतं याची त्यानं कधी कल्पनाही केली नव्हती. वाणीच्या अस्खलित प्रवाहानं मंत्रमुग्ध झालेले शेकडो लोक त्यानं पाहिले होते. स्वत: अनुभव घेतला होता; परंतु एक शब्दही उच्चारला नसताना एवढा मोठा जमाव त्या नि:शब्द मौनाची पूजा करायला निघतो, हा अनुभव त्याला अत्यंत रोमांचक वाटत होता. घर सोडून निघाल्यावर पहिल्याच दिवशी असा अद्‌भुत रोमांचक अनुभव यावा ही आपल्या निर्णयाच्या सच्चेपणाची प्रचिती आहे असं त्यानं मानून घेतलं. आपण खरोखरच भाग्यवान आहोत याची त्याला खात्री वाटू लागली.

शरीराचा सगळा थकवा दूर करणारे, मन तृप्त करणारे पदार्थ आणि त्याहून विशेष असा आग्रह! त्याची भूक तर भागलीच, भरीला गाडी

''मौनीबाबा की जय!'' कोणीतरी आरोळी ठोकली.

सुदैवानं तेवढ्यावरच भागलं.

गडबड, गोंधळ, कोलाहल हळूहळू शांत होऊ लागला. सगळे झोपायच्या तयारीला लागले. गाडी एका लयीत वेगानं पुढे धावत होती.

भल्या पहाटेच अजमेर येईल असा अंदाज होता. सगळे जण सरत्या रात्रीच्या साखरझोपेत असतील तेव्हा आपण शांतपणे उतरून जावं असा गौतमनं विचार केला. कावळ्याच्या झोपेसारख्या किंचित डुलक्या घेतल्या तेवढ्याच. बाकी तो रात्रभर जागा होता. अजमेर यायला खूप अवकाश होता तेव्हापासूनच त्याची झोप उडाली होती. अर्ध्या मिटल्या डोळ्यांनी तो खिडकीजवळच्या जागेवर शांतपणे बसून राहिला.

''जय सीयाराम बापू!'' वरच्या बर्थवरून कोणीतरी मान उंचावून म्हटलं, ''इतक्या लवकर उठलात म्हनायचं!''

''रातभर झोपलेच न्हाही बघा,'' गौतमच्या समोरच्या बर्थवर झोपलेल्या त्या म्हाताऱ्याशा माणसानं कुशीवर वळत म्हटलं. ''रातभरातनं मला दोन-तीन वेळा जावं लागतंय बाथरूमला. परतेक वेळी मी पायलं तं बापू जागेच!''

''आवं, बापूंना रात काय न् दिस काय सगळं सारखंच आसतं. साधू मानूस सदा जागा असतो.'' तिसऱ्या कोणी वेदवाणी उच्चारावी तसं ठामपणे म्हटलं.

गौतम उठला. त्यानं आळोखेपिळोखे देऊन आळस झटकला. वर ठेवलेली आपली पिशवी काढून हातात घेतली. गाडीची गती अगदी संथ झाली होती. स्टेशन जवळ आल्याची सगळी चिन्हं दिसू लागली होती. बाहेर फटफटलं होतं. अंधार मावळून उजेडाचं साम्राज्य पसरू लागलं होतं.

''आरं उठा, उठा. आजमेर आलं, आजमेर आलं. बापू निघाले.''

जागे झालेले झोपलेल्यांना उठवू लागले. सगळे पटापटा उठले. गाडी प्लॅटफॉर्मवर पोहोचण्याआधी त्यांनी गौतमला चारी बाजूंनी वेढून टाकले.

गौतम दाराकडे निघाला. पाठोपाठ लोकही दाराच्या दिशेनं सरकले. गाडी थांबली. गौतम खाली उतरला. मागे वळून त्यानं लोकांकडे नजर टाकली आणि हात जोडले.

''तुमचा सत्संग लाभला बापू, मागच्या जल्माचं पुण्य आमचं. यवढी दक्षिणा ठेवून घ्या बापू...'' एका म्हाताऱ्या बाईनं पाच रुपयांची नोट

प्लॅटफॉर्मवर शिरते न् शिरते तोच एका बाकावर त्याची बसायची खास सोयही झाली. गाडीत बेसुमार गर्दी होती. इंचन् इंच जागा व्यापली गेली होती. हातपायदेखील हलवता येऊ नयेत अशा प्रकारे माणसं आडवीतिडवी ठासून भरली गेली होती. गोकुळ-मथुरेच्या यात्रेला निघालेली ती मंडळी घटकेत 'राम' तर घटकेत 'कृष्ण', घटकेत 'बमबम भोले' तर घटकेत 'जय बजरंग' असा गजर करत रिझर्व्हेशन असलेल्या डब्यात चढली. मौनीबाबा गौतमची बसायची खास सोय त्यांनी आपल्यासोबतच केली.

गाडी निघाली. सगळे आपापल्या जागी स्थिरस्थावर झाले. डहुळलेल्या गढूळ पाण्यातली माती हळूहळू तळाशी जाऊन स्थिर व्हावी, तसा एवढा वेळ चाललेला गोंधळ शमला. सगळे शांत झाले. रात्र झाली होती, पण झोपेनं डोळे जड व्हावेत अशी स्थिती झाली नव्हती. गौतमला एकाच गोष्टीची चिंता होती. तोंडानं काही बोलायची आता संधी उरली नव्हती. त्यामुळे थोडी सोय झाली होती; परंतु हे लोक रात्री उशिरापर्यंत जागत बसले, उगाच तऱ्हेतऱ्हेचे प्रश्न विचारत सुटले आणि नुसतं 'हो-नाही' म्हणता म्हणता घोटाळा झाला तर...असा काही गुंता गौतमला नको होता.

''बापू, आता आमच्याबरोबर यातरेला चला तुमी.'' कोणीतरी सुचवलं.

''हा, हा बापू! एवाना तुमच्या सऽऽऽगळ्या यात्रा करून झाल्या असतील. म्हंजे त्याचा आमाला पण लाभ हुईल बघा.''

''गोकुळ, मथुरा, बिंद्रावन, झालंच तर...ते आपलं काशी, प्रयाग, चित्रकूट...वा...वा...काय आमचं भाग्य! बापू यातराभर तुमी आमच्या संगती म्हटल्यावर आमची नाव लागनार पैलतीराला म्हनायची.'' एक प्रौढमाणूस बोलता बोलता उत्साहाच्या भरात उठून उभा राहिला.

गौतमला हसू आलं. त्यानं या भागात कधी पाऊलही टाकलं नव्हतं. फार कशाला, या तीर्थस्थानांची त्याला माहितीदेखील नव्हती. अहमदाबादच्या पलीकडे कुठल्याही ठिकाणाची माहिती फक्त शाळेतल्या भूगोलाच्या पुस्तकातल्या नकाशापुरती मर्यादित होती. नाही म्हणायला रामायण, भागवत पुराण, गीता, हरिवंश असलं बरंचसं त्यानं वाचलं होतं. त्यातल्या कथा, त्यातले विचार, त्यातली ठिकाणं थोडीफार परिचित होती पण ते पोथीतलं पुराण! आज प्रथमच त्या पोथ्या- पुराणांच्या बाहेर

निघायचं होतं.

''आरं, पन बापू सोता कुटं जायला निघाल्येत त्ये तर विचारून घ्या म्हन्तो मी.''

''ते बी खरंच! हां, तर बापू तुमचं तिकीट कुठवरचं? पाहू बरं!''

गौतमनं झब्ब्याच्या खिशातून तिकीट काढून त्या माणसापुढे धरलं. त्यानं डोळे बारीक करत तिकिटावरची अक्षरं वाचायचा प्रयत्न केला.

''ह्ये बघा राव! बापूंचं तिकीट अजमेरपर्यंतच हाये!''

''त्येचं काय नाय. आपण तिकीटमास्तरला सांगून बापूंचं तिकीट फुडे लांबपर्यंतचं करून घेऊ.''

हे सगळं आणखी जास्त लांबत जायच्या आधीच त्याला आवर घातला पाहिजे, असं गौतमला तीव्रतेनं वाटू लागलं. तिकीट स्वत:कडे घेऊन त्यानं ते खिशात नीट ठेवलं. किंचितसं हसून मान डोलावली.

''तुमाला कसला तरास होऊ देनार नाही. तुमची काय खास अडचन नसंल तर आमच्याबरोबर राहा. एका पैशाचा खर्च पडू देनार नाही.'' एका व्यवहारी माणसानं व्यवहारी लालूच दाखवून पाहिली.

गौतमनं स्मित करत हात जोडले. ओठ घट्ट मिटून घेतले. चुकून एखादा शब्द तोंडातून निघून जाईल की काय अशी त्याला सारखी भीती वाटत होती. उत्साही यात्रेकरूंच्या चेहऱ्यावर थोडीशी निराशा पसरली. गौतमला स्वत:ची लाज वाटली. त्या सगळ्यांना वाटत होतं, तसा तो मौनीबाबा होता का? तो कोणी संतही नव्हता. एक सामान्य साधू तरी तो अजून कुठे झाला होता? केवळ भगवी वस्त्रं अंगावर चढवली होती एवढंच काय ते! सगळा प्रताप होता या भगव्या रंगाचा! शेकडो वर्षांपासून कोट्यवधी माणसांच्या मनावर श्रद्धेच्या रूपात पसरलेल्या त्या भगव्या रंगाच्या प्रतापाचा हा साक्षात्कार त्याला आतल्या आत अस्वस्थ करत होता. पुन्हा पुन्हा त्याच्या मनात एकच विचार येत होता- संन्यासाच्या वाटेनं निघाला असताना नवप्रयाणाच्या आरंभीच तो कळत नकळत या सगळ्यांना फसवत तर नव्हता? या फसवणुकीबद्दल तो स्वत:ला अपराधी मानत होता. अपराधीपणाच्या एका विचित्र भावनेनं त्याला वेढून टाकलं.

''बरं चला, जाऊ द्या. आमचं नशीब आसेल तसं! आमाला आशीर्वाद द्या बापू. आमची यात्रा निर्विघ्नपणे पार पडू द्या,'' एक म्हातारासा माणूस जणू गौतमच्या मदतीला धावून आला.

गौतमनं दोन्ही हात उचलून आकाशाच्या दिशेनं तळवे पसरले.

गौतमच्या पायाशी ठेवली. गौतम दोन पावलं मागे सरला. हे फारच अनपेक्षित होतं!

''व्हय, व्हय बापू...न्हाई म्हनू नका...'' असं म्हणत इतर दोन-चार जणांनी जमतील तशी नोटा- नाणी त्याच्या पायाशी ठेवली. ''आमी यातरेला निघालोय, दान-धर्म करायलाच निघालोय. तुमच्यासारक्या म्हाराजानं दिलं तं पुण्य लागतंय.''

गौतमनं 'हो-नाही' म्हणायच्या आत, पाहता पाहता प्लॅटफॉर्मवर त्याच्या पायाशी पैशांचा लहानसा ढीग निर्माण झाला. आपलं नाणं, आपली नोट गौतम स्वत: केव्हा उचलून घेतो याची सगळे जण मोठ्या श्रद्धेनं आणि भक्तिभावानं वाट बघत होते. गाडी सुटली आणि न जाणो, स्वत:च्या हातानं घेण्याऐवजी दुसऱ्या कोणाच्या हातून बापूंनी पैसे घेतले तर आपल्या पदरी पुण्य पडायचं राहून जाईल अशा भावनेनं ''घ्या बापू, ते तिथलं घ्या बापू...'' असं म्हणत सगळे नकळत धक्काबुक्की करू लागले. त्यांच्यात जणू स्पर्धा लागली.

गौतमला गोपालस्वामींची आठवण झाली. आपल्या गुरुस्थानी त्यानं गोपालस्वामींची मनोमन स्थापना कधीच करून टाकली होती. गोपालस्वामी प्रवचन करायचे, श्रोत्यांना कथापान करवायचे तेव्हा व्यासपीठावर त्यांच्या पायाशी नोटांचा असाच ढीग जमलेला त्यानं पाहिला होता. गोपालस्वामी त्या ढिगाकडे बघायचेही नाही. या सगळ्यापासून ते अगदी अलिप्त राहत. गोपालस्वामी पैशाला हातही लावत नाहीत, असं त्यानं ऐकलं होतं. त्यांच्या वाणीमध्ये अद्‌भुत जादू होती. ऐकणारा अगदी मुग्ध होऊन जाई. ते म्हणत- 'सगळ्या अनर्थाचं मूळ आहे संपत्ती! धनाप्रती वीतराग बाणला तर अर्धी लढाई जिंकली म्हणून समजा! धनाचा स्पर्श सगळं दूषित करून टाकतो...'

गोपालस्वामी पैशाला स्पर्शही करत नव्हते. गौतम स्वत:ला आता गोपालस्वामींचा शिष्य मानत होता. गोपालस्वामींच्या आश्रमाच्या हवेतच तो जगत होता. त्यानं धनाला स्पर्श करणं ही शक्यता उरली नव्हती. दोन्ही हातांनी 'नाही नाही' म्हणत तो दोन पावलं मागे हटला.

''येवढं आमचं म्हननं ऐका बापू. या पैशाचा उपयोग तुमच्या हातानं ज्यास्त चांगला होईल...बापू...'' गौतम दोन पावलं मागे हटला तर ते टोळकं तिन्ही बाजूंनी तीन पावलं पुढे चालून आले. दहा-वीस हात एकदम त्याच्यासमोर आले. गाडी सुटण्याची सूचना देणारा घंटानाद प्लॅटफॉर्मवर

भरून उरला.

''आरं बाबानुं कसं समजंना तुमाला! आरं मौनीबाबा पैशाला हातच लावत नसतील. पैसा त्यांच्या हातात ठेवायचा नसतो. आसा त्यांच्या झोळीतच टाकायचा असतो.'' अचानक कोणीतरी मार्ग काढला.

गाडीनं शिटी दिली. एकच घाई उडाली. गौतमला कळायच्या आत, आत्तापर्यंत नोटा घेऊन त्याच्यासमोर आलेले हात एकदम त्याच्या पिशवीकडे वळले. नोटांचं पुडकं त्याच्या पिशवीत कोंबलं गेलं. गाडी सुटली.

''मौनीबाबा की जय''- एकच मोठा आवाज घुमला आणि सगळे धावपळ करत गाडीत चढू लागले. गौतम थक्क होऊन पाहत राहिला. हळूहळू गाडी प्लॅटफॉर्मच्या बाहेर निघून गेली. लोक घाईघाईनं प्लॅटफॉर्मच्या बाहेर पडले होते. गर्दी पांगली होती. त्यानं आपल्या पिशवीकडे पाहिलं. मोठी रक्कम पिशवीत जमा झाली होती.

तो स्टेशनच्या बाहेर आला तेव्हा दिवसाच्या प्रकाशानं आसमंत उजळून निघाला होता. त्याला थोडं हलकं वाटू लागलं. थोडी चौकशी करून त्यानं पुष्करकडे जाणाऱ्या बसचा स्टँड शोधून काढला. सकाळच्या आल्हाददायक गारव्यात बस हळूहळू डोंगरवाट चढून जात होती. त्या नव्या वातावरणाला गौतम प्रसन्न चित्तानं स्वत:मध्ये सामावून घेत होता.

इतका दूरचा प्रवास आणि सर्वस्वी अनोळखी वातावरण! गौतमला हे सगळं अगदी नवं होतं आणि तरीही त्याला ते अनोळखी, परकं वाटत नव्हतं. तो स्वस्थचित्त, निवांत झाला. हृदयात अनेक भाव उफाळून आले. ओठ हलकेच गुणगुणू लागले.

'ईशावास्यमिदं सर्वं यत्किञ्च जगत्यां जगत् ।
तेन त्यक्तेन भुञ्जीथा मा गृध: कस्य स्विद् धनम् ।।
असतो मा सद्गमय, तमसो मा ज्योतिर्गमय
मृत्योर्मा अमृतंगमय ।।'

पुष्करधामच्या बस स्टँडवर एक गचका देऊन बस थांबली तेव्हा गौतमची तंद्री भंगली. थोडे लोक उतरले. गौतम सर्वांत शेवटी उतरला. गोपालस्वामींच्या आश्रमाचा पत्ता लिहिलेलं चिटोरं त्यानं बाहेर काढलं. पत्त्याची चौकशी करून एका बारीकशा पायवाटेनं तो निघाला. थोडंसं

चालला न चालला तोच, पुष्करचं प्राचीन पवित्र सरोवर त्याच्या दृष्टीस पडलं. यात्रेकरू, साधू असे काही लोक तिथे स्नान करत होते. गौतम थांबला. त्या विशाल सरोवराचं निर्मळ जल त्याचं मन आकर्षून घेत होतं. त्यालाही स्नान करावंसं वाटू लागलं. एका घाटावर त्यानं आपली पिशवी ठेवली. अंगावरची भगवी वस्त्रं उतरवली. एक पांढरं वस्त्र गुंडाळून घेतलं आणि तो पाण्यात उतरला. थंड पाण्याच्या स्पर्शानं त्याला ताजंतवानं वाटू लागलं, तो पोहू लागला. मग पाण्यातच उभं राहून तो मंत्रोच्चार करू लागला. उगवत्या सूर्याला त्यानं अर्घ्य दिलं. प्रात: संध्या केली. बाहेर येऊन पुन्हा एकदा त्यानं तीच भगवी वस्त्रं धारण केली.

पुन्हा एकदा गोपालस्वामींच्या आश्रमाबद्दल चौकशी करून तो त्या दिशेनं झपझप चालू लागला. उन्हं तापू लागली होती. रस्त्यावर रहदारी अगदी तुरळक होती. थोडे यात्रेकरू, काही देशी पर्यटक, काही थोडे परदेशी पर्यटक आणि थोडेफार साधू. अधेमधे रस्त्याच्या दोन्ही बाजूंना धार्मिक कार्यासाठी, पूजाविधींसाठी आवश्यक वस्तू, पुस्तकं असं काहीबाही विकणारी छोटी छोटी दुकानं होती. सुरुवातीला एकमेकांना लागून असणारी घरं पुढे विरळ होत गेली होती.

कुठे झोपडीवजा घरं तर कुठे दुमजली इमारती.

पत्त्यात लिहिलेल्या ठिकाणी गौतम पोहोचला तेव्हा आसपासच्या झोपड्या आणि लहानमोठी घरं यांमध्ये एखाद्या महाराजासारखी दिमाखात उभी असलेली तीन मजली भव्य इमारत त्याला दिसली. इमारतीभोवती मोटारींचा ताफा उभा होता. शेकडो माणसं मावतील एवढ्या मैदानाभोवती चौफेर भिंत बांधलेली होती. आत चाललेल्या प्रार्थनेचा नाद बाहेरपर्यंत गुंजत होता. गौतम भारावून गेला. प्रवेशद्वाराशी दोन मोठे कोरीव गजराज होते. काळ्या आरसपानाचे असावेत. त्यांच्या उंचावलेल्या सोंडेतून सुवासिक जल वाहत होतं. तिथेच दोन रखवालदार उभे होते.

गौतम पाहत राहिला.

हा...हा गोपालस्वामींचा आश्रम? आश्रम?

आश्रमाबद्दलच्या त्याच्या कल्पनेला हलकासा धक्का बसला.

❖

३ री आवृत्ती

विमुक्ती

लेखक

दिपा महानवर

किंमत : २५०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.

न्यायाची चाड बाळगायची
तर केवळ चर्चा करून,
सोयीस्करपणे गप्प बसून
भागत नसते.
दुष्प्रवृत्तीविरुद्ध कधी ना कधी
लढा पुकारावाच लागतो.
आणि लढाई झाली की
वार होणारच!
ते झेलण्याची,
प्रसंगी होणाऱ्या जखमा
सहन करण्याची
तयारी ठेवावीच लागते.
प्रासंगिक फायद्यावर नजर ठेवून
सर्वांनी वागायचे ठरवल्यास
सत्य कधीच प्रस्थापित होणार नाही!

गणपा

(शिवाजी सावंत लिखित
अशी मने असे नमुने' या पुस्तकातून)

जीवनाच्या एखाद्या वळणावर गतस्मृतींची पाने चाळताना जीवनात आलेल्या काही व्यक्ती मनात रुंजी घालायला लागतात. अशाच मनात रुंजी घालणाऱ्या व्यक्तींची शब्दरूपी रेखाटनं शिवाजी सावंतांनी वाचकांच्या भेटीला आणली आहेत, 'अशी मने, असे नमुने' या व्यक्तिचित्रात्मक संग्रहातून. वैशिष्ट्यपूर्ण भाषेतून साकारलेली आणि व्यामिश्रतेचा प्रत्यय देणारी ही व्यक्तिचित्रे आहेत. त्यातीलच एक व्यक्तिचित्र आहे 'गणपा'... मनमुराद हसवणारं...

'जग ही एक रंगभूमी आहे.' - शेक्सपियरचं साहित्याच्या रंगमंचावर उदंड यश संपादन केलेलं हे एक विधान आहे. मला मात्र नेहमीच जाणवत गेलं आहे की, 'रंगभूमीचंही एक वेगळं जग असतं.' त्याला कारणही तसंच गमतीदार घडलं आहे. 'नाट्य' या विषयाशी माझा बालपणी अतिशय 'नाट्यमय रीतीनं' संबंध आला. त्या 'वेगळ्या जगात' अगदी 'जगावेगळ्या' पद्धतीनं मी त्या वेळी प्रवेश केला.

अंघोळ, चहा, जेवण, शाळा, व्यायाम, अभ्यास आणि परीक्षा या त्याच त्या रटाळ जीवनातून काही आगळं घडावं असं वाटणं हा बालस्वभाव आहे. (निदान माझ्या बालपणी तरी तसा तो होता - किमान माझा तरी होताच होता.)

या बालस्वभावाला 'नाटक' हा प्रकार त्या दृष्टीनं फार फार जवळचा. स्टेजवरून रंगमाखल्या तोंडानं पल्लेदार वाक्यं फेकणारा 'नट' आम्हाला भावंडाइतकाच जवळकीचा वाटायचा. रंगमंचाचा लाकडी चौथरा आम्हाला गावदेवाच्या लाकडी ओट्याइतकाच पवित्र वाटायचा. समुद्रकाठाला वाळूचे किल्ले रचणाऱ्या पोरानं ताज्या अंड्यासारख्या दिसणाऱ्या, आग्र्यातील ताजमहालाकडे भावविस्फारल्या नजरेनं बघावं त्याच कल्पनेनं आम्ही 'रंगल्या' तोंडानं संवादफेकीत रंगलेली नटमंडळी बघत असू.

दरवर्षी शिवजयंती धरून हमखास एखादं नाटक उभं राहायचं. सारं गाव नाट्यचैतन्यानं उसळू लागायचं. एका शिवजयंतीला असंच एक ऐतिहासिक नाटक अंग धरू लागलं. त्यात मोरया गोसाव्याची एक भूमिका होती. या मोरया गोसाव्याचा एक बालशिष्य गावातील नटमंडळींना हवा होता. कुणीतरी त्यांना माझं नाव सुचविलं. नटमंडळींचा 'म्होरक्या' म्हणून, तालीमखान्यातून मी मेहनत घेऊन परतत असताना गणपत गवळी या नटश्रेष्ठानं मला गावचौकात गाठलं. त्याच्याबरोबर त्याचे चार हौशी साथीदार होते.

एऽ शिवा, काय तालमीतनं आलास?'' गणपानं मला दिललगाव साद घालीत हटकलं. ''काय राजे? काय आज्ञा?'' मी त्याला विचारलं. गणपा 'शिवाजी' ची भूमिका अशी फाकडी उभी करायचा की सगळं गाव त्याला 'राजे' म्हणायचं.

''बाकी काय म्हण हां तू शंकर, शिवासारखं बिजलीच्या अंगानं हुतूतू खेळणारं पॉर नाही हां आमच्या शिवाजीनगरात.'' आपल्या साथीदाराकडं बघत गणपानं मला पाणी लावायला सुरुवात केली.

''व्हय शिवा, - शिवजयंती की रं आली तोंडावर. हुतूतूची झुंबड उठवू या की...'' त्यानं माझ्या आवडीच्या विषयाला हात घातला. मी पाघळलो.

आम्ही हुतूतूच्या सामन्यांची थोडा वेळ चर्चा केली आणि चुचकारत, पाणी मारत कसबी गवळ्यानं गायीच्या कासेला हात घालावा तसा गणपानं आपल्या मनातल्या विषयाला हात घातला, ''आणि नाटकाचं काय करायचं? सगळं जमलंय पर एका बालपार्टीचं काम कराय एक धाडसी पोर पायजे! तू दे की रं दंगा उठवून.''

''ह्यॉऽ! काय तरी काय खुळ्यासारखं राजे, मला नाही जमायचं नाटकात काम.'' मी त्याला झटकून टाकला.

''न जमाय काय झालं? तिथं काय पाट्या टाकायच्या हाओत, काय फेसाटी वढायची हाय? कसली रं तुम्ही डरपोक पोरं? एवडी शिकताय आणि साधं नाटकात काम कराय जमत न्हाई व्हय? हुतूतूच्या ग्रावंडीवर मात्तर नाचशील... त्तूऽ त्तूऽ त्तू!'' गणपानं हात पसरून गावचौकात माझ्या हुतूतूच्या लकबीची सरळसरळ नक्कल केली. शंकर, दत्ता, विष्णू हे त्याचे साथीदार ती बघून खदखदून हसले. त्यानं मी वरमलो. त्याचं बोलणं मला आव्हानाचं वाटलं. मी ते स्वाकारायचं ठरवलं.

''हे बघ गणपा, मी तयार आहे काम करायला. तुझ्यापेक्षा दंगा उठवून देईन नाटकात!'' मी बोलून गेलो. संध्याकाळी माझ्या घरी मोरया गोसाव्याच्या बालशिष्याच्या संवादाची नकललेली वही आली.

समर्थ रामदासांनी शिवाजी महाराजांची वर्णन केलेली, माणसं आपल्या बाजूला वळविण्याची 'सलगी देणे' कैसी असेल कोण जाणे, पण आमच्या 'राजे गणपाची' 'सलगी देणे' ही ऐसी होती.

मोरयाबाबाचा गोसावीशिष्य व्हायचं मी मान्य केलं. नाटकाचं नाव होतं 'चंद्रग्रहण'. त्या नाटकात मला एक गाणंही होतं. 'डायरेक्टर' गणपा ते गाणं कट करायला तयार नव्हता.

या नाटकात शिवाजीची खाशी भूमिका अर्थातच गणपाकडं होती. आता कल्पना करा. 'गणपती' या नावाचा 'गवळी' असणं केवढं नवलाचं होतं! त्यातून तीन तास का होईना, तो 'शिवाजीराजा' होणं हे त्याहून केवढं नवलाचं होतं!

नावानं 'गणपती' असलेला हा आमचा खासा नट व्यवसायानं 'गोपाल' होता. आपल्या नावाइतकीच म्हणजे 'श्रीगणेशाय' एवढीच त्यानं सरस्वतीची आराधना केली होती. गवळी म्हणून अंगापिंडानं तरी भरभक्कम असावा - तर तसंही काही नव्हतं. अटकर पाड्यासारखा जिथल्या तिथं दिसणारा, सावळ्या रंगाचा आणि तरतरीत लांब नाकाचा 'गणपा' शिवाजीच्या भूमिकेत मात्र असा फाकडू दिसायचा की अंग तोलून, उजवा पाय पुढं टाकीत, कानातील चौकडे हिन्कळवीत तो विंगमधून रंगमंचावर घुसला की मिनिटभर नुसता टाळ्यांचा कडकडाट उठायचा.

जमलेल्या प्रेक्षकांत कुजबुज व्हायची ''कोन रं ह्यो? गडी पटावर घुसला मात्तर वागासारखा हां!''

''आरं त्यो 'गनपा' हाय. पुंडलिक गवळ्याचा ल्योक!'' प्रश्नाला

परस्परच उत्तर मिळायचं. गणपा शिवाजीराजांच्या वेषात अंग तोलून, पल्लेदार वाक्यं फेकीत रंगपटावर वावरायचा आणि प्रेक्षक तो 'गवळी' आहे हे विसरून क्षणात त्याच्या रसवंतीबरोबर वाहू लागायचे.

रंगमंचावर जाताना तो न चुकता उजवा पायच पुढं टाकायचा. (शिवाजीच्या भूमिकेत डावा पाय रंगमंचावर कधीच टाकता कामा नये हे कोणाही नाटककाराच्या प्रतिभेला न स्फुरलेलं गणपाचं स्वत:चं असं खास मानसशास्त्र होतं!)

शिवजयंतीचे दिवस आले की गणपा आपलं 'गवळीपण' विसरायचा. नाटकलोभी शाळकरी पोरं गणपाच्या शिवाजीच्या भूमिकेचे संवाद नकलून ती वही सर्वांत प्रथम त्याच्या हाती द्यायचे. सरावानं सफाईचं वाचन शिकलेला गणपा ती वही घोंगडीच्या खोळीत ठेवून ती खोळ खांद्यावर टाकायचा. दिवस उगवायला आपल्या घरामागच्या भल्या मोठ्या गोठ्यातील गायीम्हसरं दाव्यातून मोकळी करून रानात जायला निघायचा. खांद्यावर टाकलेल्या घुंगराच्या आडव्या काठीवर तो घारीच्या पंखासारखे आपले दोन्ही हात चढवायचा. त्याची जाड कुरकुरणारी कोल्हापुरी पायताणं म्हसरांमागून वाजत जायची. म्हशींच्या गळ्यातील घंटा घुमरागोड आवाज उठवायच्या.

एखादी खोडील म्हैस दुसरीला डांगलायला लागली की रस्त्यावरचा दगडी गुंड उचलून तिच्या अंगावर फेकीत गणपा ओरडायचा 'थ्रुईऽ थ्रुई ये भोरीऽ, लई गुणाची म्हणून नावजतो तुला. आन् ही करणी व्हय? तुला खाल्ली वागानं!' आपल्या आवडत्या पांढऱ्या रंगाच्या म्हशीला तो 'भोरी' म्हणायचा.

हिरण्यकेशीच्या काठावर कुरणात गणपाची म्हसरं शेपट्या नाचवीत, गळ्यातील घंटानादाच्या तालात चरत राहायची. हिरण्यकेशीला या कडेपासून त्या कडेपर्यंत अधांतरी पांघरूण घातलेल्या व्हिक्टोरिया पुलाच्या भक्कम दगडी कमानीच्या गर्द छायेत गणपा आपली घोंगडी पसरायचा. कमानीच्या भिंतीला चिकटून असलेल्या मैलाच्या दगडासारख्या एका घडीव चौकोनी दगडावर आपलं डोकं टेकायचा. गांधीटोपी घातलेल्या त्याच्या डोक्यात चक्क 'शिवाजी' दौडू लागायचा.

घोंगडीच्या खोळीतील संवादाची वही काढून गणपा ती डोळ्यांसमोर धरायचा. त्याच्या डोळ्यांतले रंग क्षणाक्षणाला पालटू लागायचे. आपण गवळी आहोत, एका पुलाच्या कमानीखाली बसलो आहोत. रानात जाणारी

चुकारमुकार माणसं कमानीखालून जाताहेत - कशाकशाचं भान त्याला उरायचं नाही.

खणखणीत, मराठमोळ्या, ऐतिहासिक बोलीभाषेचे शब्द कमानीच्या घुमटात घुमू लागायचे - 'जयवंतरायऽऽ, तुम्ही सबूर करा! यशवंतरावऽ, बोला, तुम्ही आमच्या सवालाचा जाब काऽऽ देत नाही?' या संवादातील 'सबूर' हा शब्द उच्चारताना गणपाचा हात वही सोडून पालथा होत (समोर नसलेल्या) जयवंतरावाला गप्प बसवून जायचा! 'जाब काऽऽ देत नाही?' या प्रश्नातील 'काऽऽ' तो असा काही मजेदार ओढून फेकायचा की कमानीच्या आडून गणपाला न बघताच कुणीतरी तो संवाद ऐकला तर त्याला वाटावं की साक्षात शिवाजी महाराजच आपल्या करड्या बोलीत कुण्या सरदाराची, आपल्या भुवया उंचावत झडती घेताहेत.

श्रींच्या स्वराज्याची शपथ घेऊन सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांत दौडलेल्या शिवाजी महाराजांच्या नाट्याविष्काराची तालीम अशी अक्षरशः डोंगरपायथ्याशी नदीकाठी सुरू व्हायची. गणपा स्वत:ला हरवून पुरा शिवमय व्हायचा. खाली अंथरलेल्या घोंगडीवरच तो अंग सावरून सिंहासनावर बसल्याच्या आवेशात घडाघड संवादाची सरबत्ती सुरू करायचा. 'शेषाच्या पाठीवर विराजलेल्या नारायणाऽऽ, या दुर्दैवी महाराष्ट्राची हाक तुझ्या कानी काऽ येत नाही?' गणपाला 'दुर्दैवी' शब्द उच्चारायला जमत नव्हता. तो नेमका 'दुर्धैवी' म्हणायचा! पण गावच्या प्रेक्षकांनी त्याबद्दल कधी तक्रार केली नाही. त्यांना त्या शब्दाचा अर्थ कळायचा. महाराष्ट्र 'दुर्दैवी' आहे याबद्दल त्यांच्या मनात शंका उरायची नाही.

गणपाची तालीम कमानीखाली ऐन रंगात यायची. कमानीच्या दगडी खोबणीत चिरक्या आवाजात कलकलणाऱ्या रानराघूंच्या कल्लोळानं त्याची नाट्यसमाधी कधी भंगायची नाही.

एकदा तो तालमीच्या संवादफेकीत असाच रंगला होता. कोरव्याच्या भट्टीतील तापल्या वाळूवर हरबऱ्याचे पटापट फुलते फुटाणे व्हावेत तसे संवादामागून संवाद तो उच्चारीत होता. कसलातरी 'धप्प' असा आवाज त्याला ऐकू आला पण तिकडं त्याचं लक्षच नव्हतं.

कमानीच्या खोबणीत बेसावध सापडलेल्या एका रानराघूला दीड वाव लांबीच्या काळ्याशार नागानं आपल्या जबड्यात जाम धरलं होतं. त्याला गिळून टाकण्याच्या खटपटीत तो राघूसह कमानीवरून खाली कोसळला

होता. गणपाची 'रेसल' चालूच होती - 'शेषाच्या पाठीवर विराजलेल्या नारायणाऽ, ...'

समोर त्या 'शेषाचा' एक खतरनाक 'वंशज' धुळीत पडला होता याची गणपाला काहीच कल्पना नव्हती. भेदरलेला राघू क्षणभर गप्प होता. पण आपण कसल्या 'दुर्दैवात' फसलो आहोत याची जाणीव होताच तो 'चिर्रर्र, चिर्रर्र' करीत भयानक चित्कारू लागला.

त्या आवाजाकडं गणपाचं लक्ष गेलं आणि 'राजे - गणपत' घोंगडीच्या सिंहासनावरून ताडकन वर उठले. हातात संवादाची वही, डोक्यावर गांधी टोपी, अंगात गवळी कुडतं, कमरेला धोतर - अशा थाटात! क्षणभर गणपाला काय करावं ते कळेना. या खतरनाक वक्ताला गणपाराजेंना मसलत द्यायलाही कुणी नव्हतं.

एकाएकी गणपाचं लक्ष घोंगडीजवळ ठेवलेल्या, घुंगर बसविलेल्या आपल्या गवळी काठीकडं गेलं. हातातील संवादाची वही खाली ठेवायला तयार नसलेल्या गणपानं वहीची सुरळी करून त्याच हातानं काठी उचलली.

शिवाजीराजांच्या तोंडीच शोभतील असे 'नमकहरामऽ, दगलबाज!' असे करडे बोल कमानीखाली घुमवीत गणपा हातातील काठीचे बळजोर वार त्या नागाच्या वेटोळ्यावर उतरवू लागला. दोन-चार तडाख्यांतच नागानं आपल्या तोंडातील राघू सोडून दिला. भेदरलेलं ते पाखरू तसंच दोन-चार उड्या घेत बाजूला झालं. गणपानं नागाचं डोकं ठेचून, चेचून टाकलं, काठीवर ते वेटोळं घेऊन एका कुंपणावर फेकलं. आणि मग त्याच्या लक्षात आलं की आपली गवळी काठी 'ईखारी' झालेली असणार.

'च्यायला! घोळच झाला की. राजे, राजे हत्यार इखारी झालं. काय केलंत हे?' असं स्वत:लाच बजावीत गणपानं हातातील काठीही कुंपणापलीकडं फेकून दिली. (संवादाची वही तशीच हातात ठेवून!)

घोंगडीची एक दशी काढून गणपानं भेदरलेल्या पोपटाला पकडून त्याचे दोन्ही पाय बांधले. आणि त्याला पुरा जखडबंद करून बाजूला ठेवलं. संवादाची वही उघडून गणपाची 'रेसल' पुन्हा सुरू झाली - 'शेषाच्या पाठीवर विराजलेल्या नारायणाऽऽ, ... (शेष कायमचा निद्रिस्त करून, त्याच्या पाठीवर नारायणाला बसवून गणपा त्याला विचारीत होता.) या 'दुर्धैवी महाराष्ट्राची हाक तुझ्या कानी काऽऽ येत नाही?'

पाय बांधलेला राघू मधूनच भेदरून चीत्कारत होता- 'चिर्रर्र' ते कानांवर

पडताच त्याच्याकडं न बघता गणपा हाताचा पंजा उचलून त्याला ऐतिहासिक इशारत करीत होती - 'सबूरऽ, सबूरऽ!'

गणपानं त्या राघूला आपल्या घरी आणलं. त्याच्यासाठी एक शानदार पिंजरा केला. त्याला आपले ऐतिहासिक संवाद शीळ घालीत शिकवायला सुरुवात केली. पोपट इमानी निघाला. गणपा दिसताच लाडिक आवाजात 'राजे, राजे' म्हणत, पिंजऱ्याच्या तारांना फडफडते पंख आपटीत, मान डोलवीत थयथय नाचू लागला. रतिबाच्या दुधाच्या हिशेबात काही घोळ झाला आणि कुणी गणपाच्या घरी येऊन हुज्जत घालू लागलं की मान वाकडी करून तिरक्या नजरेनं त्याच्याकडं बघत बजावू लागला, 'सबूरऽ! सबूरऽ!'

असाच शिवजयंतीच्या एका वर्षीच्या ऐतिहासिक नाटकाच्या वेळी कहर झाला. त्या वर्षी नाटक होतं 'समर-झुंजार.'

शिवाजीची भूमिका नेहमीप्रमाणं गणपाकडंच होती. त्यानं एक नरम मेसकाठी तोडून तिची पातळ बेळं काढली. आपल्या डोक्याच्या मापाचा 'टोप' गणपा स्वत: बनवायचा. इतर कुणी तयार केलेला टोप त्याला कधीच पसंत पडायचा नाही. मेसकाठीच्या बेळांचा त्यानं टोप तयार केला. तो घरात कुणाला दिसू नये म्हणून बाहेरच्या खोलीतील बैठकीच्या चौपाळ्याखाली ठेवला.

नाटकाच्या तालमी नेहमीप्रमाणं चालू होत्या. गोठ्यातील म्हशींची रात्रीची धार काढल्याशिवाय गणपाची सुटका होत नव्हती. वेळेवर तालमीला येणं त्याला जमत नव्हतं. गणपाचा बाप पुंडलिक गवळी एक करडा म्हातारा होता. चक्री लाल डेरेदार पागोटं घालून, भरदार चंचीतील पान, सुपारी, कात या वस्तूंचा मेळ घालत बाहेरच्या खोलीला लागून असलेल्या एका छोटेखानी खोलीत तो घोंगडीवर बसलेला असायचा. त्याला गणपाचं हे नाटकाचं वेड मुळीच 'फास' नव्हतं.

मी गणपाला तालमीला बोलवायला त्याच्या घरी गेलो. नाटकाच्या तालमीला बोलवायला आलोय हे मला गणपाच्या 'आबासाहेबांना' कळू द्यायचं नव्हतं. तो म्हातारा म्हणजे आग होती.

मी दरवाजातून हळूच डोकावीत विचारलं, ''राजे आहेत?''

''कोन राजं? कोन न्हाअी हतं.'' पलीकडच्या खोलीतून करडा घोगरा आवाज आला. मी सटपटलो.

''गणपा हाय कायं? दूध पायजे.'' मी चाचरत म्हणालो.

‘गणपा न्हाई आन् दूदबी न्हाई. व्हट पिळलं तर दूद निगायचं न्हाय; आन् ह्यो शिकवतूया मला. नाटकी भडवं.... नाटकं करत्यात!’’ पुंडलिक गवळ्यानं मलाच धारेवर धरलं.

मी दारातून सटकायच्या बेतात होतो. इतक्यात धारा उरकून राजे गणपतच खासे बाहेरच्या सोप्यात आले. हातानं खूण करून त्यांनी मला आत बोलावलं.

जमिनीबरोबर झुकतं होऊन गणपानं चौपाळ्याखाली हात घातला. त्याला आपला टोप मला कौतुकानं दाखवायचा होता.

टोपासह वर उठत गणपानं शिवाजीराजांच्यासारख्या भुवया चढवीत टोप आपल्या डोक्याकडं नेण्यासाठी सुलटा केला आणि एक पांढरंशुभ्र टपटपीत अंडं टोपाच्या खळगीतून घरंगळलं आणि पायगतीच्या जमिनीवर पडून फटकन् फुटलं. पांढरा-पिवळा, गिळगिळीत बलक जमिनीवर पसरला.

मला मोठ्यानं हसता येईना. कारण पलीकडच्या खोलीत गणपाचे करडे ‘आबासाहेब’ जातिनिशी होते. पालथं मनगट दाताखाली दाबत मी खुसपुसू लागलो.

वार केला तरी सलामात सुटलेल्या, शास्ताखानानं झेप घेतलेल्या खिडकीकडं शिवाजीराजांनी जसं बघितलं असेल तसा गणपा भुवया चढवून फुटल्या अंड्याकडं बघतच राहिला.

टोपात घुसखोरी करणाऱ्या त्या धाडसी अंड्याला गणपाच्या भुवया जणू विचारीत होत्या, ‘ही मजाल! आमच्या टोपात बैठक घ्यावया कोण धजेल?’ अंडं टोपात कसं आलं याचं कोडं गणपा उकलीत होता. मग स्वत:शीच बोलल्यासारखा पुटपुटला. ‘च्यायला या बायकांस्नी म्हशींच्या दावणीला पेंढी टाकाय जमायचं न्हाअी वक्तावर, पर कोंबड्या पाळायची लई हौस! दम खावा सटव्यांनो, ह्यो नाटकाचा बार एकदा पार हूं दे. फडशाच पाडतो समद्या कोंबड्यांचा.’

घरच्या बायकांनी पाळलेल्या कोंबड्यांपैकी एकीनं करकरत टोपात उतरून बैठक घेण्याचं धाडस केलं होतं. गणपाच्या टोपात झक्कासपैकी अंडं घातलं होतं.

तो शास्ताखान शिवाजीमहाराजांच्या पुण्यातील लालमहालात घुसला असेल, पण एक गावठी कोंबडी ‘गणपाराजेंच्या’ सीधे टोपातच घुसली होती.

या टोपानंच त्या वर्षीच्या नाटकात गणपाची पार धमाल उडवून दिली.

नाटकाच्या दिवशी एका मराठा सरदाराची भूमिका करणारा 'दत्ता' नावाचा नट आपला प्रवेश येताच गडबडीत गणपाचा शिवाजीराजांचा टोप घालून रंगपटावर गेला.

प्रेक्षक क्षणभर घोटाळले. पण त्यांची काहीच तक्रार नव्हती. दत्ता डोक्यावर राजांचा टोप आणि ओठांत त्यांच्याबद्दलचे इमानदार संवाद अशा थाटात रंगमंचावर वावरत होता. कथाभाग नाटककाराचे शब्द पेरत पुढं सरकत होता. इतक्यात गणपाचा प्रवेश आला.

प्रॉम्पटर दबक्या आवाजात मागं वळून म्हणाला, 'गणप्या एंट्री आली!'

हातातील चहाचा कप आणि पेटती बिडी बाजूला ठेवून गणपाराजे उठले रंगपटावर जायला.

एकीकडं गणपा स्टेजवर गेल्यावर फेकायचे संवाद मनोमन आठवत होता, दुसरीकडं आपला टोप गरगरत्या डोळ्यांनी शोधीत होता... टोप काही सापडत नव्हता. सापडणार कसा? राजे कोंडीत सापडले. सगळ्यांच्यावर संतापलेली नजर फिरवीत कडाडले, 'भडव्यान्‌ माजीं पार्टी पटावर मार खावी म्हून डाव टाकताय? कुनी पशार क्येला माजा टोप? गुमान हजर करताय का वादडू एकेकाला?' गणपाचा हात कमरेला लटकावलेल्या तलवारीच्या मुठीकडं वारंवार जात होता.

सगळ्यांची वाचा बसायची वेळ आली होती. गणपाची एंट्री काही होत नव्हती. स्टेजवर 'दत्ता' हा मराठा सरदार नाटककाराचे शिलकीचे सगळे संवाद फेकून मोकळा झाला होता. पुढच्या अंकातलेही काही संवाद त्यानं 'स्वगता' सारखे म्हणून टाकले होते. जेव्हा संवादच आठवेनात तेव्हा त्यानं 'ॲक्शन' म्हणून काही चाळे सुरू केले होते. मधूनच तो डोक्यावरचा टोप उगीच ठाकठूक करीत होता. पाठीवर हात बांधून स्टेजवर गंभीर फेऱ्या घेत होता. आपल्या डोक्यावर साक्षात राजांचा टोप आहे याची त्याला काही कल्पना नव्हती. प्रेक्षक शांत होते. (पैज मारून लिहायचं म्हटलं तरी कुठल्याही पट्टीच्या नाटककाराला लिहिता येणार नाही असं अफलातून नाटक स्टेजवर चाललं होतं.)

दत्ताला राजे स्टेजवर का येत नाहीत ते कळत नव्हतं. गणपाला टोप कुठं गायब झालाय ते कळत नव्हतं. प्रॉम्पटरलाही या अवस्थेत काय करावं हे कळत नव्हतं. दत्ताबरोबर प्रेक्षकही गणपाच्या प्रवेशाची वाट बघत होते. तो काही होत नव्हता.

शेवटी तोड निघाली. कुणीतरी गणपाला सुचविलं, 'गणपा, जा तस्साच पटावर आता. कनच्या लेकाच्यानं तिकीट काडलंय नाटक बघाय?'

गणपाला ही मसलत पटली. टोपाशिवाय बोडक्या डोक्यानं गणपा रंगमंचावर घुसला. त्याला बघताच राजांच्या दर्शनासाठी आतुर झालेल्या प्रेक्षकांनी टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला. प्रॉम्पटरचा जीव भांड्यात पडला.

गणपा भुंड्या डोक्यानं स्टेजवर आला खरा, पण समोर मावळ्या सरदाराच्या डोक्यावर आपला टोप बघताच त्याच्या अंगाची संतापानं लाहीलाही झाली. काही केल्या त्याला संवाद आठवेना.

आपल्या भुवया एकसारख्या वर उडवीत तो दत्ताला सांगू बघत होता की, 'तुझ्या डोक्यावर माझा टोप कसा? काय केलंस हे हरामखोरा?' दत्ताला त्याच्या भुवया उडविण्याच्या अनपेक्षित ॲक्शन्स कळेनात. त्याला वाटलं, आपलं काम मार खावं म्हणून हा गवळी पदरच्या 'ॲक्शन्स' घुसडायला लागलाय. त्यानंही प्रत्युतर म्हणून आपल्या भुवया उडवायला सुरू केल्या.

हा 'भ्रुकुटी-अभिनय' थोडा वेळ तसाच चालला. प्रेक्षकांना वाटलं हा नाटकातील एक अपरिहार्य भाग आहे. स्टेजवरचे ते दोघे नटश्रेष्ठ पुनः पुन्हा आणि प्रेक्षकांना ऐकू जातील एवढ्या मोठ्यानं सांगितले तरी संवाद का म्हणत नाहीत हे बिचाऱ्या प्रॉम्पटरला कळेना. त्यानं चक्क विंगमधून डोकावून स्टेजवर काय चाललंय ते बघितलं. सगळा प्रकार लक्षात येताच कपाळावर हात मारून घेत तो दबक्या आवाजात म्हणाला, 'बोंबला! गणपाचा टोप दत्त्याच्या डोक्यावर.'

त्यानं लगबगीनं पडद्याच्या मागं जाऊन दत्ता या मराठा सरदाराला हळूच दबल्या आवाजात सूचना दिली, 'दत्ता, तुझ्या डोक्यावर राजांचा टोप आहे.' बराच वेळ संवाद काय फेकावा म्हणून तटून राहिलेल्या दत्तानं मागचा-पुढचा काहीच विचार न करता प्रॉम्पटरने कानांवर टाकलेले शब्द ऐतिहासिक थाटात तसेच स्टेजवर उच्चारले, 'दत्ताऽ राजांचा टोप तुझ्या डोक्यावर आहे.' प्रेक्षक नाटकात रंगलेले होते.

मिनिटभर तसंच गेलं. गणपाला तालमीत कधीच न ऐकायला मिळालेलं वाक्य आपल्या सरदाराकडून ऐकायला मिळालं. तरीही आपलं राजेपण न विसरता तो दत्ताच्या डोक्यावरच्या टोपाकडं खिळत्या नजरेनं बघतच होता.

आता प्रेक्षकांपैकी कुणीतरी स्टेजवर येऊन किंवा प्रॉम्पटरनं स्टेजवर घुसून दत्ताच्या डोक्यावरचा टोप उतरवून गणपाराजेंना पेश करायचं - एवढंच

बाकी उरलं होतं.

पडद्यामागून, या विंगकडून त्या विंगकडं थयथय नाचून दमगीर झालेला प्रॉम्पटर शेवटी साक्षात नाटककारालाही ऐकू जाईल एवढ्या मोठ्यानं ओरडला, 'दत्त्याऽऽ डोक्यावरचा टोप ठेव खाली काढून.'

दत्ताच्या टोपाखालच्या सुपीक डोक्यात आता प्रकाश पडला. भवानी मातेच्या हातून ज्या पोजमध्ये राजांनी तलवार घेतल्याचं चित्र आहे, तशी पोज घेत आपल्या डोक्यावरचा टोप उतरून तो दोन्ही हातांनी गणपाकडं देताना त्यानं सुचतील तशी वाक्यं म्हटली, 'महाराज, चाकराला माफी असावी. कसूर झाला.'

गणपानं त्याच्या हातातून तो टोप राजांच्या दिमाखदार ऐटीत घेतला आणि आपल्या डोक्यावर चढविला. ते बघताच प्रेक्षकांनी पुन्हा टाळ्यांचा कडकडाट केला.

स्टेजवर चाललेल्या या अजब प्रकाराचा नाटकाशी सुतराम संबंध नव्हता. बिचारं कथानक गणपतराजांच्या आज्ञेची वाट बघत पुस्तकात पडून होतं. त्या नाटकाचा प्रयोग बघायला नाटककार हजर असता तर? सरळ स्टेजवर चढून त्यानं गणपाच्या कमरेची तलवार उपसली असती आणि त्याची व नटश्रेष्ठ दत्तोपंतांची गर्दन एकाच फटक्यात उतरून ठेवली असती.

ते ऐतिहासिक नाटक गणपा-दत्ता आणि मंडळींच्या तडाख्यातून तेवढ्यावरच सहीसलामत सुटलं नाही. कसातरी पहिल्या अंकाचा पडदा पडला. दमलेले ऐतिहासिक तगडे पुरुष चहापानासाठी मेकअप रूममध्ये आले.

चिडलेल्या गणपानं टोप उतरून एका बाकावर ठेवला आणि त्यानं अगोदर चहाचा कप उचलला. 'भिकनिशी हाईस बघ दत्त्या!' दत्ताला शिव्या मोजत गणपानं चहा संपविला. त्याचे सगळे मित्र त्याला सांगत होते, 'राजे, संतापू नका. अजून दोन अंक आहेत. द्या दणका उडवून.'

हे सगळं सावरणं चाललं आहे इतक्यात गणपाला बघावं म्हणून आत आलेलं एक शाळकरी पोर, गणपाच्या झगमगत्या पोषाखाकडं बघतबघत बाकावर बसलं. गणपाचा विक्रमी टोप त्याच्या बुडाखाली सापडून चेपला!! त्या आवाजानं गणपाचं काळीज चरकलं.

त्या पोराला दंडाला धरून त्यानं खसकन् बाकावरून पुढं ओढलं. ऐतिहासिक टोपाची चक्क ग्रामीण दामटी झाली होती! पोर भेदरून उभं होतं.

आता त्याचा गाल रंगणार असंच आम्हाला वाटलं. पण राजांच्या वेषातील गणपाच्या शरीरातला जातिवंत गवळी म्हशीला बोलावं तसा बोलून गेला. 'तुला खाल्ला वागानं! कुनाचा रं तू बांबलीच्या?' ते ऐकून पोरगं रडायलाच लागलं.

'आरं, तू कशाला रडतूस. रडाया पायजे मला.' हातातली टोपीची दामटी आरतीसारखी त्या पोराच्या तोंडाभोवती फिरवीत गणपा म्हणाला. कुणीतरी त्या पोराला बाहेर नेलं. त्या नाटकाचे पुढचे दोनही अंक गणपा शिवाजीच्या वेषात बिगरटोपानं वावरला. प्रेक्षकांनी त्यासाठी कुणालाच जाब विचारला नाही. त्यांना माहीत होतं की, शिवाजीच्या पोषाखात काही नसून आहे ते त्याच्या विचारांत!

असा हा गणपा. त्याचं 'भजन' हा एक औरच अनुभव होता. टाळ्यांच्या ठेक्यावर तो अभंगाचे बोल आपल्या गळ्यातून जिवंत उभे करायचा.

'देखो रे यारो!' हा कबिराचा दोहा तो मान वाकडी करीत असा गायचा की कबिरांनी दोह्यात वर्णन केलेली ज्ञानराजांची पालखीच शब्दाचं बंधन फोडून प्रत्यक्ष समोर उभी राहावी.

'यशोधा घुसळीत-तन मागे भगवंत' या गवळणीतील 'यशोदा' या शब्दाचा उच्चार तो 'यश्वदा' असा करायचा. पण त्या 'यश्वदात' त्याच्या गवळी मनाचा लगाव असा उतरलेला असायचा की, माझ्या डोळ्यांसमोर मोठ्या रांजणाचा, ताक ओघळता काठ उभा राहायचा. त्या रांजणात मोठी रवी घालून 'घुसळण' करणारी पाठमोरी यशोदामाता दिसायची. तिच्या पाठीशी अंग घुसळीत उभा राहिलेला नागडा, सावळा श्रीकृष्ण असायचा...

मी गाव सोडलं आणि हा सगळा जिवंत गवळटी कुणबावा माझ्यापासून खूप खूप दूर गेला. आता गावात नाटकं होत नाहीत. झाली तरी ऐतिहासिक होत नाहीत. गणपाच्या शिवाजीनगर नाट्यमंडळानं केली तशी होणं शक्यच नाही.

कधीतरी वर्षातून एकदा गावी गेलो की गणपा मला सायकलवरून येताना दिसतो. त्याच्यातील राजेपणाची ती ऐटदार शान उन्हाळ्यात आटणाऱ्या म्हशीसारखी आटून गेली आहे.

त्याची गांधी टोपी, गवळी कुडतं, धोतर बदललं आहे. एक साधी पट्ट्यापट्ट्याची अर्धी पँट व एक मळकट शर्ट त्याच्या अंगावर दिसतो. चेहऱ्यावर परिस्थितीच्या सटवाईनं ओरखडलेल्या नखांचे ओरखडे दिसतात.

राजांच्या वेडानं झपाटलेला तो तरतरीत गणपा हरवलेला आहे.

मला बघताच तो सायकलीवरून खाली उतरतो. आजही त्याच शब्दांत साद घालतो, 'शिवाऽ कवा आलास कोल्हापुरास्नं?'

आम्ही दोघंही कुठल्यातरी हॉटेलात चहा घेतो. गणपाला पान खायची सवय असल्यानं पानाच्या ठेल्यासमोर येतो. पानवाला गणपाचं डब्बल चुन्याचं 'मर्दाना' पान जमवू लागतो. मी त्याला विचारतो, 'काय राजे, नाटकंबिटकं नाही उठत गावात?'

पान तोंडात खुपसून तंबाखूची चिमट मान वर करून दाढेखाली सोडीत गणपा म्हणतो, ''काय मज्या राह्यली न्हाई शिवा, कसली पुचाट नाटकं घेत्यात. तींबी कडवर जात न्हाईत.'' एक व्यथा त्याच्या डोळ्यांत तरळून जाते.

''राजे, तुम्हाला तरी आठवतात का तुमची नाटकं?'' मी त्याला डिवचतो.

गणपाचे शेवाळले डोळे पेटून उठतात. तो पुन्हा आपल्या स्वप्नात पोचतो. पानाच्या ठेल्यासमोर गणपाचे खणखणीत संवाद उभे व्हायला लागतात. ''गड फत्ते झाला... पण हिरा हरपला तो हरपलाच ना?'' जाणारे-येणारे लोक आमच्याकडं डोळे ताणून बघतात... एकाएकी गणपाची ती समाधी भंग पावते. तोंडातील रसाची पिंक बाजूला टाकून तो म्हणतो, ''चलतो शिवा, योळ झाला. दूद घालायचं हाय.'' माझा हात क्षणभर दाबून गणपा सायकलवर टांग टाकतो. दुधाच्या घागरी एकमेकींना घासताना खडखडू लागतात. त्याची सायकल करकरत चालू लागते. चक्रे फिरू लागतात. माझ्या डोक्यात त्याचा संवाद फिरू लागतो, 'शेषाच्या पाठीवर विराजलेल्या नारायणाऽ, या दुर्धैवी महाराष्ट्राची हाक तुझ्या कानी काऽ येत नाही?'

त्याला कितीतरी बदललेला, पाठमोरा दूर जाताना पाहून माझ्या मनात एक विचार उगाच रुंजी घालीतच राहतो - 'माणूस प्राचीन काळापासून कसल्या ना कसल्या वेडावर जगत आला आहे आणि जगत राहणार आहे!'

❖

१० वी आवृत्ती

नांगरणी

लेखक

आनंद यादव



किंमत : ३५०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.

कणखर सकसता आणण्यासाठी भूमीनं स्वत:वर धारदार अवजारांनी आडवे उभे घाव घालून घेणे आणि सूर्यभट्टीत अंतर्बाह्य होरपळणे म्हणजे नांगरणी.

उत्तम पिकांच्या समृद्धीसाठी शेत-मळ्यांवर हिरवीगार साय साकळावी;

अंगाखांद्यांवरच्या गाईगुरांना, माणसाकाणसांना, किड्यामुंग्यांना, चिमण्या-पाखरांच्या इवल्या चोचींना मूठमूठ-चिमूटचिमूट चाराचणा मिळावा; म्हणून भूमीनं स्वत:ची सोशिकपणे केलेली उरस्फोड म्हणजे नांगरणी.

इच्छा-आकांक्षांची पूर्तता करणारा पाऊस कृपावंत होऊन पडावा म्हणून

तहानलेल्या पृथ्वीनं वासलेली चोच म्हणजे नांगरणी.

नांगरणी म्हणजे हिरव्या चैतन्याला जन्म देऊ पाहणाऱ्या सर्जनोत्सुक भूमीची घुसमटणारी निर्मितिपूर्व करुणावस्था.

भेट दीप्ती नवलशी...

आय हॅव अ लाईफ ...

‘द मॅड तिबेटियन - गोष्टी तेव्हाच्या आणि आत्ताच्या’ या पुस्तकाच्या मेहता पब्लिशिंग हाऊसनं प्रकाशित केलेल्या मराठी आवृत्तीच्या प्रकाशनाच्या निमित्तानं दीप्ती नवलला जवळून अनुभवता आलं. तेव्हा ती तमाच्या तळाशी तेवत असणाऱ्या नंदादीपासारखी वाटली. दीप्ती नवलच्या पुणे भेटीचा हा वृत्तांत...

डिप्रेशनच्या खोल दरीत दिशाहीन तडफड सुरू असावी. दरीतल्या खडकांवर आपटून आत्मविश्वास वारंवार जखमी होत असावा. सारे मार्ग अंधूक. आशेवर झाकोळ साचलेला. आपल्या माणसांत, परिचित भोवतालातही परकेपण भरून राहिल्याची जाणीव तीव्र झालेली असताना एक आवाज कानावर पडावा...संथ... संयत... प्रगल्भ... आपल्यातल्या आपल्याला साद घालणारा. त्यानं सांगावं... It doesn't matter if I have a role ,but I have a life...

कलासक्त जीवनात येणाऱ्या ब्लॅकसाठीचं हे चपखल उत्तर आहे, दीप्ती नवलचं. दीप्तीचा हा मूलमंत्र फक्त सिनेसृष्टीतल्या मोजक्या लोकांसाठी नाही; पण समाजात, कुटुंबात आपली भूमिका शोधणाऱ्या, ती वठवताना आयुष्य पणाला लावणाऱ्या प्रत्येक माणसासाठी आहे. 'द मॅड तिबेटियन - गोष्टी तेव्हाच्या आणि आत्ताच्या' या पुस्तकाच्या मेहता पब्लिशिंग हाऊसनं प्रकाशित केलेल्या मराठी आवृत्तीच्या प्रकाशनाच्या निमित्तानं दीप्ती नवलला जवळून अनुभवता आलं. तेव्हा ती तमाच्या तळाशी तेवत असणाऱ्या नंदादीपासारखी वाटली. ७० एमएमच्या पडद्यावर दीप्तीची जशी निरनिराळी रूपं दिसतात, तशीच ती तिच्या प्रत्यक्ष आयुष्यात दिसतात. ती अभिनेत्री आहेच; पण डोळ्यांतून उतरणाऱ्या अभिव्यक्तीसोबतच इतर माध्यमांवरही तिची हुकूमत आहे. कधी कॅनव्हास...कधी पेपर...तर कधी रुपेरी पडदा...आत्मकेंद्री मंथनाचे पडदे दूर करून ती आतली खळबळ अभिव्यक्त करते. त्या खळबळीचं स्वरूपच तिचं व्यक्त होण्याचं माध्यम ठरवतं, असं ती स्वतःच स्पष्ट करते.

'चष्मेबद्दूर'मधली नेहा राजन, 'अंगूर'मधली तनू, 'कथा'मधली संध्या सबनीस किंवा कमला..व्यक्तिरेखांच्या भिन्न छटांचं ती पडद्यावर सहजसुंदर आरेखन साकारते. या सहजतेतल्या कौशल्याचे धागे तिच्या विलक्षण निरीक्षण क्षमतेत लपले आहेत. अमृतसरच्या रस्त्यावरची पात्रं असोत की आसपासच्या बायांची देहबोली... पाहता क्षणी तिच्या मनातल्या स्कॅनरवर प्रिंट होतात. ती तिच्यासाठी एखाद्या रोलच्या तयारीची प्रक्रिया असते. कॅमेरा रोलझाला की ही पात्रं उत्स्फूर्तपणे तिच्यात उतरतात. म्हणूनच तिचा रिटेकवर विश्वास नाही. ती उत्स्फूर्तता हरवू नये, यासाठी तिला अभिनयाची तालीमही नकोशी वाटते. तांत्रिक गोष्टींचा सराव शक्य आहे; पण निर्मितीच्या तीव्र भावनिक आविष्कारांना सरावानं तांत्रिक करणं, तिला नकोसं वाटतं. तिला मेथड ॲक्टिंगच्या संकल्पनांपेक्षा स्वतःचे उत्स्फूर्त आविष्कार महत्त्वाचे वाटतात. रोजच्या जगण्यातून भरलेली अनुभवांची पोतडी महत्त्वाची वाटते. अशावेळी गुलजारांचं तिच्याविषयीचं निरीक्षण तंतोतंत वाटतं. ते म्हणतात, 'दीप्ती एक क्षण दोनदा जगते. एकदा ती प्रत्यक्ष जगते तो क्षण आणि दुसऱ्यांदा त्या अनुभवाचं सार

तिच्या कलेतून अभिव्यक्त होतं तो क्षण...' कदाचित म्हणूनच तिचा पहिला टेक कायम दुसरा टेक असतो.

सिनेसृष्टीतल्या प्रवेशाच्या संघर्षाचं उदात्तीकरण नेहमीच पाहायला मिळतं; पण दीप्ती नवलच्या संघर्षाची जातकुळीही अस्सल कलावंताची आहे. निव्वळ बँक बँलन्स वाढवणाऱ्या भूमिकांपेक्षा स्वतःला समृद्ध करणाऱ्या भूमिका कमी झाल्या, तेव्हा तिनं गुणवत्तेतल्या तडजोडीपेक्षा स्वतःच्या गरजांना कात्री लावणं पसंत केलं.

दीप्ती नवलचे वडील लेखक आणि आई चित्रकार. त्यामुळं कलेची गुणसूत्रं तिच्या रक्ततच भिनलेली. डायनिंग टेबलवर बसवून आईनं दिलेले कॅनव्हासचे धडेही ती गिरवते आणि वडिलांच्या शाब्दिक वारशालाही न्याय देते; पण तिचं व्यक्त होणं स्वतंत्र आणि स्वतःच्या अनुभवविश्वाशीच सलगी साधणारं आहे. त्या कलासक्त जगण्याला खतपाणी घालणंच तिच्या आयुष्याचं ध्येय आहे. अगदी मृत्यूच्या कल्पनेतही तिच्या फॅन्टसीतला रोमान्स अचंबित करतो. ती म्हणते,

Will you do something for me?

When I die,

Will you bury the cloud with me?

हीच संवेदनशीलता 'द मॅड तिबेटियन'च्या पानापानांत दिसते. हे पुस्तक जणू तिच्या अनुभवांच्या तुकड्यांचा कोलाज आहे. 'पियानो ट्युनर' कथेतला बाटलीबॉय एकेकाळचा पियानोवादक; पण कालौघात पडलेलं परिस्थितीचं ओझं पेलतानाचा त्याचा संघर्ष असह्य हुरहूर लावून जातो. दीप्ती नवलच्या एका मैत्रिणीनं तिला दोन ओळींत सांगितलेली एक गोष्ट 'दोन बहिणी' कथेत नवं रूप घेऊन भेटते, तेव्हा दीप्तीचं व्यक्तिरेखा जगण्याचं अभिनयातलं कौशल्य तिच्या लेखनासाठीही समर्पक असल्याचं जाणवतं. सिनेमाच्या ओढीनं मुंबई गाठणाऱ्यांना दिसणारं या शहराचं भयाण रूप 'मुंबई सेंट्रल' कथेत दिसतं. मुंबई म्हंटलं की स्वतः दीप्तीलाही 'केयॉस' हाच शब्द आठवतो. अर्थात इथल्या जगण्याच्या नानारंगी छटा ती नाकारत नाही; पण हिमालयाच्या कुशीतली शांतता तिला अधिक प्रिय आहे.

हिमाचल प्रदेशचं नाव उच्चारलं तरी तिच्या डोळ्यांत चमक जाणवते.

११ वी आवृत्ती

जळलेला मोहर

लेखक

वि. स. खांडेकर



किंमत : १५०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.

तरुण स्त्री-पुरुषांनी प्रेमजीवनात शरीरसुखाचा भाग अतिशय महत्त्वाचा मानला पाहिजे, परस्परांच्या आनंदसंवर्धनाकरता आपण एकमेकांचे हात हातात घेतले आहेत, याचा त्यांनी स्वतःला कधीही विसर पडू देऊ नये, आयुष्याच्या प्रवासातली खरीखुरी मौज असल्या सोबतीतच आहे, इत्यादी गोष्टी सांगितल्या जात असल्या, तरी केवळ कामतृप्ती हे संसाराचे कधीच ध्येय होऊ शकत नाही. आकाशातल्या चंद्राला हात लावण्याच्या धडपडीत माणसाचे पृथ्वीवरले पाय सुटले, तर तो तोंडघशी पडतो. तो चंद्र योग्य वेळी अनेकांच्या हाती लागतो; नाही, असे नाही; पण त्याचा लाभ संसाराच्या सुरवातीला होत नाही. दहा-वीस वर्षे संकटे आणि सुखे यांची चव जोडीने घेतल्यावरच त्या चांदण्याची वृष्टी होऊ लागते. त्या दृष्टीने उदात्त प्रीती हा शुक्ल पक्षातला चंद्र नाही; तो वद्य पक्षातला आहे.

जी चमक तिच्या चित्रांमधूनही जाणवते. ती जणू तुम्हाला तिथं येण्याचं आवतान देत असते. अस्तित्वाला आव्हान देणारा आणि असुरक्षिततेच्या झुल्यावर हिंदोळत ठेवणारा हिमालय तिला तिचा सखा वाटतो. रंग आणि शब्दांच्या माध्यमातून त्याच्यासोबत तिचा शृंगार नटतो; पण बर्फाने वेढलेले घाटमाथे तिच्यातल्या ट्रेकरलाही साद घालत राहतात. तिच्या चेहऱ्यावर तिच्या कवितेतले शब्द दिसू लागतात. अन् विजय तेंडुलकरांनी म्हटल्याप्रमाणं दीप्ती शब्दाविना संवाद साधायला लागते.

निर्सगानं त्या-त्या जागी तुमची खास योजना केली असावी, अशा काही घटना आयुष्यात घडत असतात. दीप्ती नवलची पुणे भेट, खरंतर माझ्यासाठीची अशी निसर्गाची खास योजना होती, असं वाटतं आहे. कम्फर्ट झोनमधनं स्वतःला बाहेर काढून प्रगल्भ होण्याच्या वाटा शोधताना मला तिच्यासारखी गुरू मिळाली. जी सततच्या विमान प्रवासानं आलेली गुंगी शरीरात भिनलेली असताना आणि सलग पाच-सहा रात्रींचा झोपेचा बॅकलॉग बाकी असताना १९८६सालच्या पंचवटी सिनेमाची जुनी प्रिंट मिळाली म्हणून रात्री अकराला तीन तासांचा सिनेमा पहायला बसली. राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाचं पूर्ण रिकामं नितांतसुंदर थिएटर..थिएटरच्या मागच्या व्हीआयपी सीटवर बरोबर मध्यभागी आम्ही दोघी. स्क्रिनवर तिच्या लाडक्या बासूदांनी दिग्दर्शित केलेला 'पंचवटी'. कधी तिला रिळच्या दुरवस्थेमुळं भरून यायचं, तर कधी नॉस्टॅल्जियानं गहिवरून यायचं; पण यातल्या दोन्ही भावना निव्वळ तात्पुरता भावनिक आवेग नव्हत्या किंवा वांझ संवेदनेचा आविष्कारही नव्हत्या. थिएटरमधनं बाहेर पडता पडताच तिनं 'पंचवटी' पुन्हा एडिट करण्याचा मनोदय केला होता. सिनेमा कुठे कसा छाटला जायला हवा, त्यातल्या कोणत्या गोष्टी अधोरेखित व्हायला हव्यात, या प्रश्नांनी तिला घेरलं होतं आणि त्या क्षणी तिनं त्या उत्तर शोधाच्या प्रक्रियेला सुरुवातही केली होती. एकीकडं समोरच्या पडद्यावर ती पंचवटीतली वीस-तिशीतली नाजूक नेपाळी पेंटर होती. तर दुसरीकडं ६५ वर्षांची अनुभवसंपन्न दिग्दर्शक होती. पडद्यावरची चाळिशी ओलांडता ओलांडता तिच्यात वस्तीला आलेली कलेची समृद्धी मी अवाक् होऊन पाहत होते. २९ वर्षांच्या दीप्ती नवलला ६५ वर्षांची दीप्ती नवल न्याहाळत असताना मी साक्षीदार होते; पण ते न्याहाळणं हरवलेल्या

तारुण्याचा पाठलाग करण्याच्या प्रकारातलं नव्हतं. तर आपल्या हातात आपलं काम जतन करण्याचं माध्यम आहे आणि त्याचा वापर व्हावा, या तळमळीतून आलेलं होतं.

दीप्ती नवलला अनुभवताना कित्येक समकालीन चेहरे नजरेसमोरून जात राहिले. त्यातले कित्येक चेहरे प्रकाशझोतात राहण्यासाठी उपद्व्याप करणारे होते; पण दीप्ती नवल काजव्यासारखी अंधाऱ्या रात्री स्वतःचा प्रकाश स्वतःसोबत घेऊन फिरणारी आहे. स्वयंप्रेरित आहे. दीप्ती खरंच दीप्ती आहे...

– योजना यादव
९५७९७६०१२३
संपादक, मेहता पब्लिशिंग हाऊस
(दै. 'लोकमत'मधून साभार)

❖

टी बुक क्लब



या योजनेतील सहाही पुस्तके घेणे आवश्यक!

चालू बुक क्लबचे सभासदत्व ₹ ५० भरून घेता येते. या क्लबअंतर्गत दरवर्षी गाजलेल्या सहा इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद प्रकाशित केले जातात. सभासदांना ही पुस्तके निम्म्या किमतीत मिळतात. पुस्तके प्रकाशित होताच आपणांस त्यासंबंधीची माहिती कळवली जाते.

ही सर्व सहाही पुस्तके घेणे आपल्यावर बंधनकारक राहील.

या सहा पुस्तकांपुरती ही सभासद फी मर्यादित राहील. या क्लबच्या सभासदांना आमच्या प्रकाशनाची इतर पुस्तके सवलतीत मिळतील.

टी बुक क्लब योजनेतील'क्लासिक्स'साठी खास सवलत!

₹१०० भरून उपलब्ध असलेल्या कोणतीही ८ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. सर्व पुस्तकांसाठी एकूण पोस्टेज ₹ १३५० राहील किंवा ८ पुस्तकांसाठी पोस्टेज ₹ १२५. इतर कोणत्याही पुस्तकांवर २०% सवलत मिळवा.

शब्द शब्द जपून ठेव...

या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे...

मागच्या भागात आपण सामील झालो होतो पाडगावकरांच्या शब्दयात्रेत. या शब्दयात्रेच्या वाटेवर परत एकदा चालताना सहजपणे समोर आलं ते त्यांचं 'या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे' हे गीत. जगण्यावर प्रेम करायला लावणाऱ्या किंवा जीवनाकडे आकृष्ट करणाऱ्या अनेक मूर्त-अमूर्त गोष्टी आपल्याभोवती असतात. त्यातील काही सौंदर्यपूर्ण गोष्टी अधोरेखित करताना पाडगावकर लिहितात-

रंगांचा उघडुनिया पंखा सांज कुणी ही केली?
काळोखाच्या दारावरती नक्षत्रांच्या वेली
सहा ऋतूंचे सहा सोहळे, येथे भान हरावे

सांध्यरंग, नक्षत्रं, ऋतुचक्र या गोष्टींमधलं सौंदर्य पाडगावकर आपल्या शब्दलावण्यातून तितक्याच सौंदर्यपूर्णतेने, अलगदपणे समोर आणतात. रंगांचा पंखा, नक्षत्रांच्या वेली, ऋतूंचे सोहळे...पाडगावकरांची ही शब्दकळा भान हरावं अशी!

जीवनावर शतदा प्रेम करणाऱ्या आणि दुसऱ्यांनाही ते करायला सांगणाऱ्या पाडगावकरांचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोनच मुळात आनंददायी होता. गाणे (गाणे हा शब्द क्रियापद आणि नाम या दोन्ही अर्थांनी पाडगावकरांनी योजला आहे) हे आनंदाचं परम निधान. 'माझं जगणं म्हणजे गाणं' असाच काहीसा प्रत्यय देणाऱ्या त्यांच्या 'माझे जीवन गाणे...' या गीतात ते म्हणतात-

व्यथा असो आनंद असू दे
प्रकाश किंवा तिमिर असू दे
वाट दिसो अथवा न दिसू दे
गात पुढे मज जाणे

जीवनात सुख येऊ दे किंवा दु:ख, त्याला मी गात गातच सामोरा

जाणार आहे आणि आनंदाने पुढची मार्गक्रमणा करणार आहे, हा भावार्थ पाडगावकर सहजपणे सांगून जातात.

तर अशा या 'आनंदयात्री' पाडगावकरांनी प्रेमभावना अधोरेखित करणारी अनेक भावगीतं रचली आणि प्रेमभावनेतील सौंदर्य, उत्कट ओढ, समर्पण, शृंगार, हुरहुर, विरह, वंचना इ. छटा त्या भावगीतांतून समर्थपणे साकारल्या.

यौवनाची चाहूल आणि प्रेमभावना यांचं नातं फार जवळचं. यौवनात पदार्पण केल्या केल्या लगेच मनात प्रेमभावना उत्पन्न जरी झाली नाही, तरी जीवनातील तो एक स्वप्निल, चैतन्यदायी, रसपूर्ण आणि सौंदर्यपूर्ण कालखंड असतो. एका उमलत्या वयाच्या किशोरीच्या जीवनातील या भारल्या दिवसांचं वर्णन करताना पाडगावकर लिहितात-

दिवस तुझे हे फुलायचे
झोपाळ्यावाचून झुलायचे
मोजावी नभाची खोली
घालावी शपथ ओली
श्वासात चांदणे भरायचे

अपार उत्साह आणि हळुवारपणाने या नवयौवनेचं हे तारुण्य मुसमुसलं आहे, हे पाडगावकर त्यांच्या खास शैलीत सांगतात.

तर अशा उत्साहभरल्या प्रियेचं प्रथम दर्शन आणि तिच्या प्रथम दर्शनाची त्याच्या मनावर पडलेली मोहिनी हा प्रेमातील पहिला अध्याय असतो. तिच्या प्रथम दर्शनाने त्याच्या मनात उठलेले भावतरंग शब्दबद्ध करताना पाडगावकर लिहितात-

शब्दावाचून कळले सारे
शब्दांच्या पलीकडले
प्रथम तुला पाहियले आणिक
घडू नये ते घडले

तिच्या प्रथम दर्शनाने घायाळ होण्यापेक्षा तो अंतर्मुख झालेला दिसतो; कारण तिचं शरीररूपी अस्तित्व हे त्याच्या आकर्षणाचं केवळ एक निमित्त आहे. त्याला भुरळ पडली आहे तिच्या आत्मिक सौंदर्याची. म्हणूनच एक शब्दातीत अनुभूती त्याच्या मनात जागलेली दिसते. या गीतातून पाडगावकरांनी प्रेमभावनेला एका विशिष्ट उंचीवर नेऊन ठेवलं आहे.

तर पहिल्या भेटीचा हा अध्याय 'पहिलीच भेट झाली, पण ओढ ही

युगांची' या गीतातूनही पाडगावकरांनी वर्णिला आहे.

या गीतातून दोघांच्याही मनावर झालेला प्रथम भेटीचा परिणाम पाडगावकरांनी उत्कटतेने व्यक्त केला आहे. ही पहिली नजरभेट आहे. या पहिल्या भेटीचं वर्णन करताना ती म्हणते-

पहिलीच भेट झाली, जडली अपूर्व बाधा
स्वप्नात गुंग झाली जागेपणात राधा
माझी न राहिले मी किमया अशी कुणाची

पहिल्या भेटीतच तिला त्याची बाधा जडली. प्रेमविभोर राधेप्रमाणेच स्वप्न आणि जागृतीच्या झुल्यावर ती झुलायला लागली. त्याच्या भेटीचं संमोहन असं, की ती स्वत:ची राहिली नाही. तिच्या पहिल्या भेटीने त्याच्या मनाची काय अवस्था झाली ते सांगताना पाडगावकर लिहितात-

डोळे मिटून घेता दिसतेस तू समोर
फुलवून पंख स्वप्नी अन् नाचतात मोर
झाली फुले सुगंधी माझ्याही भावनांची

मिटल्या डोळ्यांसमोर तिची मूर्ती दिसते. विलोभनीय स्वप्नं पडतात. भावना सुगंधित झाल्यात. पाडगावकरांची ही शब्दकळा थेट मनात उतरणारी आणि प्रसन्नतेचा शिडकावा करणारी.

त्या दोघांची पहिली भेट होते. नंतरही भेटी होत राहतात. अर्थातच चोरून. अशाच एका भेटीचं वर्णन करताना एक प्रेमिक म्हणतो-

जेव्हा तिची नि माझी चोरून भेट झाली
झाली फुले कळ्यांची झाडे भरात आली
नव्हतेच शब्द तेव्हा मौनात अर्थ सारे
स्पर्शात चंद्र होता स्पर्शात लाख तारे
ओथंबला फुलांनी अवकाश भोवताली

तिची आणि माझी भेट झाली आणि भावना उमलल्या, बहरल्या. स्पर्शाच्या भाषेतून सारं काही व्यक्त झालं. भोवतालचं विश्व फुलांनी ओथंबून गेलं.

त्याच्यासाठी आणि तिच्यासाठी खरं तर प्रत्येक भेट अविस्मरणीय असते; पण एखाद्या पावसाळी रात्री झालेली भेट मनात घर करून राहते. त्या पावसातील भेटीची आठवणही पाडगावकर किती हळुवार शब्दांतून व्यक्त करतात. ते लिहितात-

भेट तुझी माझी स्मरते अजून त्या दिसाची

धुंद वादळाची होती रात्र पावसाची
केस चिंब ओले होते थेंब तुझ्या गाली
ओठावर माझ्या त्यांची किती फुले झाली
श्वासांनी लिहिली गाथा प्रीतीच्या रसाची

पावसाळ्यातील रात्रीच्या भेटीतील शृंगाराचं संयत आणि सूचक वर्णन पाडगावकर करतात. प्रेमभावनेतील नि:शब्द उत्कटतेचा प्रत्यय याही ओळींमधून पाडगावकर देतात आणि प्रेमभावनेची नितांत सुंदरता अधोरेखित करतात.

प्रत्येक भेटीतील आतुरता वेगळी, प्रत्येक भेटीतील रोमांच वेगळा, प्रत्येक भेटीतील भावस्थिती वेगळी; मात्र प्रत्येक भेटीत मनाची समीपता वाढत जाते आणि एखाद्या भेटीत निसर्गाच्या साक्षीने तो तिला आवाहन करतो-

शुक्रतारा मंद वारा चांदणे पाण्यातूनि
चंद्र आहे स्वप्न वाहे धुंद या गाण्यातूनि
आज तू डोळ्यांत माझ्या मिसळूनी डोळे पहा
तू अशी जवळी रहा

शुक्रतारा हे अढळ प्रेमाचं प्रतीक. चंद्र-चादण्यांनी सजलेलं आकाश, एकूण सगळं वातावरण प्रणयानुकुल. म्हणून तो तिला समीप राहायला सांगतो; त्यावर ती सलज्जतेने सांगते-

मी कशी शब्दांत सांगू भावना माझ्या तुला
तू तुझ्या समजून घे रे लाजणाऱ्या या फुला
अंतरीचा गंध माझ्या आज तू पवना वहा
तू असा जवळी रहा

त्याच्या आवाहनाला तिने दिलेलं उत्तर फार मोहक आहे. चंद्र, चांदण्या, वारा, गंध, गाणे या प्रतिमांनी पुलकित झालेलं हे गीतही रसिकांच्या मनात शुक्रताऱ्यासारखं अढळ आहे. तर प्रेमभावनेतील विविध छटा खुलवणाऱ्या पाडगावकरांच्या अनन्यसाधारण शब्दकळेचा आस्वाद पुढच्याही भागात आपण घेणार आहोत.

– अंजली पटवर्धन

❖

सेकंड इनिंग

उद्या रेवतीबाई शाळेतून मुख्याध्यापिका म्हणून निवृत्त होणार होत्या. त्यामुळे आज त्यांच्या मनात हुरहूर दाटून आली होती. शाळेत रुजू झाल्याच्या पहिल्या दिवसापासून ते शाळेतील अनेक सहकारी, असंख्य विद्यार्थी, शाळेची स्नेहसंमेलने, शाळेच्या सहली सगळ्या आठवणींनी मनात फेर धरला होता. रेवतीबाईंचे पती मनोहरही प्राध्यापक म्हणून निवृत्त झाले होते. त्यांचं जीवनही कॉलेजशी बांधलेलं होतं; पण निवृत्तीनंतर कॉलेजमध्ये जायचं नाही, येवढाच काय तो बदल होता. बाकी त्यांचा रोजचा दिनक्रम व्यस्तच होता. सतत वाचन, लेखन, शिवाय विविध कारणांनी भेटायला येणारे लोक, निवृत्तीनंतरही घरी येणारे विद्यार्थी - प्राध्यापक, त्यामुळे माणसांचा घरात सतत राबता. वेळ कसा घालवावा हा प्रश्नच नव्हता. त्यांचा मुलगा, सून आणि नातू परदेशात होते. त्यांच्या निमित्ताने रेवतीबाई आणि मनोहर यांची एकदा परदेशवारीही झाली होती. खरं तर रेवतीबाईंनाही निवृत्तीनंतर वेळ कसा घालवायचा, हा प्रश्न नव्हता; कारण मनोहरांकडे येणाऱ्या माणसांच्या सरबराईत त्यांचा वेळ जाणार होता; पण त्यांचं स्वत:चं विश्व शाळेत सामावलं होतं. त्या विश्वापासून त्या आता दूर होणार होत्या. बघता बघता आयुष्याची सेकंड इनिंग समोर येऊन ठाकली होती; पण त्या इनिंगला सामोरं जाताना रेवतीबाईंच्या मनाची चलबिचल झाली होती.

निवृत्तीचा दिवस उजाडला आणि भावपूर्ण निरोप समारंभानंतर रेवतीबाईंनी शाळेचा जड अंत:करणाने निरोप घेतला. त्या दिवशी घरी आल्यावरही त्यांना उदास वाटत होतं. रात्री झोपताना 'उद्या आपल्याला शाळेत जायचं नाही, शाळेची घंटा आता आपल्याला ऐकू येणार नाही,

विद्यार्थ्यांचे निरागस चेहरे आता आपल्याला दिसणार नाहीत,' या भावना त्यांच्या मनात होत्या. दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्यावरही त्यांना चुकल्याचुकल्यासारखं वाटत होतं.

त्या उठून स्वयंपाकघरात गेल्या. मनोहर आधीच उठले होते आणि फिरायला जाण्याच्या तयारीत होते. रेवतीबाईंना उठलेल्या पाहून ते म्हणाले, 'हे काय, उठलीस? मला वाटलं आज चांगली आठ वाजेपर्यंत झोपशील.' 'अहो, इतक्या वर्षांची सवय एका दिवसात कशी जाईल? ' रेवतीबाई म्हणाल्या. मनोहर म्हणाले, 'तेही खरं म्हणा! चल, तूही येतेस का माझ्याबरोबर फिरायला?' 'अगदी! दहा मिनिटांत आवरते.' असं म्हणून त्या आवरायला लागल्या.

रेवतीबाईंचं आवरून होईपर्यंत मनोहर पेपर वाचत बसले होते. दार उघडंच हातं. तेवढ्यात शेजारच्या फ्लॅटमधला लहान मुलगा पळत पळत त्यांच्या घरात शिरला. शेजारच्या फ्लॅटमध्ये एक तरुण जोडपं आणि त्यांचा चार-पाच वर्षांचा मुलगा असं कुटुंब राहत होतं. रेवतीबाई शाळेत गेल्या, की मनोहर त्यांच्या लेखन-वाचनात, आलेल्या माणसांमध्ये गर्क असायचे. त्यामुळे शेजारी कोण राहतं, हे त्यांना माहिती नव्हतं. शेजारी राहणारे नवरा-बायको दोघंही नोकरी करणारे होते. त्यामुळे दिवसभर त्यांचं घर बंदच असायचं. संध्याकाळी उशिरा ते मुलाला घेऊन घरी यायचे. त्यानंतरही त्यांचं दार बंदच असायचं. रेवतीबाई आणि मनोहरही स्वत:च्या व्यापात मग्न असल्यामुळे शेजार-पाजाऱ्यांकडे त्यांचं लक्ष कधीच गेलं नाही. येता-जाता कधी समोर दिसले तर एकमेकांकडे पाहून हसण्याइतकाच त्यांचा शेजाऱ्यांशी परिचय होता.

आता तो मुलगा धावत आला आणि त्याच्यामागे त्याची आई धावत आली. 'अरे थांब!' तो मुलगा मनोहर बसले होते त्या सोफ्याभोवती गोल गोल फिरायला लागला आणि त्याच्या मागे त्याची आई. आतल्या खोलीतून बाहेर आलेल्या रेवतीबाईंना ते दृश्य बघून हसायला आलं. त्या दबक्या पावलांनी त्या मुलाच्या मागे गेल्या आणि त्याला पकडत म्हणाल्या, 'आता कसं पकडलं!' त्याची आई धापा टाकत म्हणाली, 'थँक्यू!' त्या मुलाचं नाव होतं दीप. आजच्या या खेळकर प्रसंगामुळे रेवतीबाई आणि मनोहर यांची दीपशी आणि त्याच्या आई-बाबांशी ओळख झाली.

हळूहळू बिल्डिंगमधल्या पाचही कुटुंबांशी रेवतीबाईंचा मनमोकळा

संवाद सुरू झाला. या पाचही कुटुंबांमध्ये ज्येष्ठ कुणीच नव्हतं. प्रत्येक कुटुंब त्रिकोणी. नवरा-बायको आणि एक अपत्य. बहुतेकांची मुलं लहान आणि पाळणाघरात राहणारी. कुणाच्या पाळणाघराला कधी सुट्टी असेल तर रेवतीबाई आनंदाने या मुलांची जबाबदारी घेत. संध्याकाळी ही मुलं घरी आल्यानंतर रेवतीबाईंच्या घरातच खेळत असत. त्याही त्या मुलांना गोष्टी सांगत. खाऊ देत. त्यांना स्तोत्रं शिकवत. या मुलांच्या नोकरी करणाऱ्या आयांना रेवतीबाईंचा खूप आधार झाला होता.

रेवतीबाई आणि मनोहर यांचं सहजीवन, त्या दोघांचं माणुसकीनं वागणं, त्यांच्या घरात असलेला माणसांचा राबता या सगळ्याचं या तरुण जोडप्यांना खूप अप्रूप होतं. त्यांच्यामुळे आपल्या मुलांना चांगले संस्कार मिळत आहेत, आजी-आजोबांसारखं प्रेम मिळत आहे, यामुळेही ही जोडपी खूश होती. त्यात जे आई-वडिलांशी भांडून विभक्त झाले होते, ते आता आई-वडिलांना राहायला बोलावू लागले होते. त्यांच्यातील हे परिवर्तन रेवतीबाईंमुळे झालंय, असं त्यांच्या आई-वडिलांनी रेवतीबाईंजवळ बोलून दाखवलं होतं. त्यावर रेवतीबाईंचं उत्तर होतं, 'तुमचे मुलगा-सून गुणीच आहेत; म्हणून त्यांनी आत्मपरीक्षण केलं.'

आता रेवतीबाईंनी गॅलरीत बाग फुलवली होती. त्या बागेची निगा राखतानाही त्यांना खूप आनंद व्हायचा. बागेतील फुलझाडांची हिरवाई त्या डोळ्यांत साठवायच्या. फुलांचा सुगंध मनात भरून घ्यायच्या. आता सासर-माहेरचे नातेवाईक केव्हाही त्यांच्या घरी येत होते. त्या त्यांच्या घरी जात होत्या. मैत्रिणींबरोबर सिनेमा, नाटक, विविध सांस्कृतिक कार्यक्रमांना जात होत्या. जवळचं कोणी हॉस्पिटलमध्ये असेल तर तिथे मदतीला धावत होत्या. त्या निवृत्त झाल्या तरी त्यांचे आजी-माजी विद्यार्थी त्यांना भेटायला येत. निवृत्तीच्या दिवशी त्यांच्या मनाची झालेली चलबिचल केव्हाच थांबली होती. उलट इतक्या वर्षांच्या सांसारिक आणि स्वक्षेत्रातील अनुभवाने समृद्ध झालेल्या जीवनाचा त्या आनंद घेत होत्या आणि परदेशात असलेल्या आपल्या मुलाशी आणि सुनेशी फोनवर बोलताना सांगत होत्या, 'खूप छान चालली आहे माझी सेकंड इनिंग!'

– रचना

❖

६ वी आवृत्ती

'मॅन्स सर्च फॉर मीनिंग'
या इंग्रजी पुस्तकाचा मराठी अनुवाद

अर्थाच्या शोधात



मूळ लेखक
व्हिक्टर फ्रॅन्कल
अनुवाद
डॉ. विजया बापट

किंमत : १५०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.

दररोज, दर तासाला, दर मिनिटाला
स्वत:च्या वागण्यासंबंधी निर्णय घेण्याची
संधी समोर येत असते. तुमच्या अस्मितेचा
नाश करणाऱ्या, तुमचे मनोबल हिरावून
घेऊ पाहणाऱ्या शक्तींना शरण जायचे
की नाही हे पदोपदी ठरवावे लागते.
तुम्ही केवळ नियतीच्या हातातील खेळणे
बनता की नाही हे तुमच्या निर्णयांवर
अवलंबून असते.
आपले मानसिक स्वातंत्र्य घालवून,
आत्मसन्मान गमावून, मेंढरांसारखे मनानेही
कैदी होता की नाही हे ठरविण्याचे
तुमचे स्वातंत्र्य अबाधित असते...

स्मरण

नारायण सुर्वे

नारायण सुर्वे यांच्या समग्र कवितेचा आपण जेव्हा वेध घेतो, तेव्हा एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की, सामाजिक संदर्भाशी निगडित असलेली नारायण सुर्वे यांची अभिव्यक्ती, समकालीन परिस्थितीशी निगडित असूनही, लौकिक जीवनातील जगत असलेल्या एकूणच घटनांशी संबंध ठेवणारी असली तरी, त्यांच्या समग्र कवितांमधून प्रगट झालेला आशय शाश्वत आहे. मानवी जीवनातल्या सुख-दु:खांना काळाचे बंधन पडत नाही हे सत्य शेवटी स्वीकारावेच लागते. नारायण सुर्वे यांच्या आत्मनिष्ठ कवितांना कम्युनिस्ट विचारांची धारा आहे. कष्टकरी जीवनाचा दु:खावेग आहे. महत्त्वाचे म्हणजे सोसलेल्या आयुष्यातील अनुभवांचा जिवंत आधार आहे. सत्य सांगायचे तर नारायण सुर्वे हे कालातीत विद्रोही कवी आहेत. 'ऐसा गा मी ब्रह्म' हा नारायण सुर्वे यांचा पहिला कवितासंग्रह १९६२ साली म्हणजेच पंचावन्न वर्षांपूर्वी प्रसिद्ध झाला होता आणि त्या संग्रहास कुसुमाग्रजांचे आशीर्वाद लाभले होते. कुसुमाग्रजांनी म्हटले होते, 'नारायण सुर्वे यांची कविता लढाऊ वृत्ती, समाजक्रांतीची उपासना करणारी, नव्या आनंदवनभुवनाचे मनोहर स्वप्न पाहणारी आहे. कवी जेव्हा अशा स्वरूपाच्या कविता लिहितो, तेव्हा तो कोणत्या पंथाच्या व विचारप्रणालीच्या जाहिराती वाटायला बसलेला नसतो. तो विचार त्याच्या ठिकाणी भावरूपात पावलेला असतो. त्याच्या व्यक्तित्वाचा तो एक अंगभूत भाव होऊन राहिलेला असतो. प्रेमासंबंधीची, सौंदर्यासंबंधीची व अध्यात्मासंबंधीची भावना जेवढी खरी आणि उत्कट असते तेवढीच ही भावनासुद्धा असते.'

साठोत्तरी मराठी कवितेतला अत्यंत प्रतिभावान आणि सामाजिक संदर्भाशी घट्ट नाते जुळलेला हा श्रेष्ठ कवी. त्यांचे पूर्वायुष्य पाहता

उत्तरायुष्यात त्यांची आश्चर्यवत झालेली प्रगती म्हणजे आश्चर्यालाही आश्चर्य वाटावे, असे काव्येतिहासातील एक अजब तरीही निश्चित असे आश्वासक नाव आहे. स्वत: श्री. नारायण सुर्वे यांनी आपल्या कवितेविषयी भाष्य करताना म्हटले होते की, जे जाणवले, काळजात सलले, तेच शब्दरूप घेऊन बाहेर पडले... एक वेळ मी स्वस्थ बसेन, शरीर स्वस्थ बसेल; पण माझा आत्मा मला स्वस्थ बसूच देईना...शब्द मला ढकलत राहिले. मी ढकलला जाऊ लागलो. विद्यमान मराठी कवितेत आपण कुठे आहोत, असाही मला केव्हा केव्हा भ्रम पडतो; पण का कोण जाणे तरीही मी आपला कविता लिहितोच आहे आणि लिहित राहणार आहे-' नारायण सुर्वे हे एक भन्नाट कवी आहेत. कापडाच्या गिरण्यांनी गजबजून गेलेल्या दक्षिण मुंबईतल्या लालबाग या कामगार विश्वाशी पूर्णपणे रत झालेल्या भागाशी निगडित ज्यांनी एक कामगार म्हणून आपले आयुष्य झोकून दिले होते, ज्या जीवनशैलीपासून अभिजात मराठी कविता कोसो मैल दूर उभी होती, त्या मराठी कवितेला कामगार विश्वाचे दर्शन घडविणाऱ्या श्रेष्ठ कवितांचा निर्माता म्हणजे कवी नारायण सुर्वे.

रोजीचा रोटीचा सवाल रोजचाच आहे
कधी फाटका बाहेर, कधी फाटका आत आहे
कामगार आहे, मी तळपती तलवार आहे
सारस्वतांनो! थोडासा गुन्हा करणार आहे...

'ऐसा गा मी ब्रह्म' ह्या आपल्या पहिल्याच कवितासंग्रहातल्या पहिल्याच कवितेतून आपली सच्ची काव्यओळख करून देणारे कविश्रेष्ठ नारायण सुर्वे यांनी आयुष्यभर आपल्या एकूणच कवितेतून सोसलेले आणि भोगलेले आयुष्य समर्थपणे मांडले. कल्पनेचे पंख लावून त्यांची कविता कधीच स्वप्नभारल्या आकाशात भिरभिरत राहिली नाही. अनुभवाचे सोलीवपण आणि सत्याचे निखळ दर्शन आपल्या कवितेमधून विणणाऱ्या सुर्व्यांना आपली अनुभवाची शिदोरी शब्दाशब्दांतून कथन करायची होती.

कवितेऐवजी रद्दी विकली असती तर बरे झाले असते
निदान देणेकऱ्यांचे तगादे तरी चुकवता आले असते
असे झाले नाही; आम्हीं शब्दांतच इतके नादावलों; बहकलों
असे झाले नसते तर कदाचित इमलेहि बांधले असते...

नारायण सुर्वे यांच्या आयुष्यात कवितेला अनन्यसाधारण महत्त्व होते. त्यांच्या अभिव्यक्तीचे एकमेव प्रभावी साधन म्हणजे त्यांची सक्षम, अत्यंत प्रभावी कविता. एकूणच मराठी कविताविश्वाशी त्यांचे अजोड असे नाते होते. सुर्वे 'नव्या माणसाचे आगमन' या आपल्या कवितासंग्रहाच्या प्रास्ताविकात या संर्दभात आपली भूमिका मांडताना म्हणतात की, एखादी उत्तम कविता जेव्हा मी वाचतो अथवा श्रवण करतो तेव्हा तिच्या जबरदस्त प्रभावाने मी हादरून जातो. अशा सर्वांगसुंदर रचनेला मी शरण जातो. त्या श्रेष्ठ कवितेच्या एकूणच निर्मितिप्रक्रियेविषयी विचार करीत राहतो. अशा कविता मला जगण्याची भाषा शिकवतात, प्रेरणा देतात, हिंमत वाढवतात, संस्कार आणि सामर्थ्य देतात. माझ्या मानसिक कक्षा रुंदावतात. प्रचंड वेटोळे घालून बसलेल्या या भयानक अंधकारात कुणा कवीने, कलाकृतीने, रचनाकाराने लहानसा मिणमिणता दिवा आपल्या हाती ठेवावा, असे मला वाटते. एक आधार मिळतो. हा आधार मित्रासारखा असतो...

केशवसुत, मर्ढेकर यांच्या नंतरचा, अभिव्यक्तीच्या स्वतंत्र वाटा चोखाळणारा कवी म्हणून एकूणच मराठी कवितेत नारायण सुर्वे यांचे नाव नोंदवले गेले. साठोत्तरी सामाजिक भान जपणारी कविता म्हणून नारायण सुर्वे यांचे नाव दुमदुमत राहिले. मराठी कवितेत अनुभवांचे आणि जाणिवांचे क्षेत्र व्यापक करण्यात नारायण सुर्वे यांचा सिंहाचा वाटा आहे.

आकाशाच्या मुद्रेवर अवलंबून राहिलो नाही
उगीच कुणाला सलाम ठोकणे जमलेच नाही...
पैगंबर खूप भेटलेत; हेही काही खोटे नाही
स्वत:लाही उगीचच हात जोडताना पाहिले नाही...
वावरलो हरेकांत, हरेकांना दिसू आलोच नाही...
आम्ही असे कसे? असा प्रश्न स्वत:लाही केला नाही...
कळप करून ब्रह्मांडात हंबरत हिंडलो नाही
स्वत:लाच रचीत गेलो; ही सवय गेलीच नाही...

आत्म्याचा हुंकार जपत माणुसकीची यत्ता कधीही न ओलांडता, वा व्यथेला गोंजारत न बसता, आपली भूमिका सत्यपणे मांडत नारायण सुर्वे ह्यांची कविता आघाडी सांभाळत राहिली. आयुष्यात अनेक रखरखीत उन्हाळे सोसूनही, व्यथेच्या धगधगत्या भट्टीत शेकूनसुद्धा सुर्व्यांच्या कवितेतल्या

व्यथेने आक्रोशी रूप धारण केले नाही. माणूसपण जपत आपल्या कवितेतून त्यांनी आपल्या अनुभवांना शब्दांमधून प्राणपणाने जोपासले. सुर्व्यांच्या कवितेने कुणाच्याही आडोशाला जाण्याचे नाकारले आणि आपले स्वतंत्र विश्व निर्माण केले. कळपातून हिंडण्याचे नाकारणारे सुर्वे हे आपले स्वतंत्रपण आयुष्यभर जोपासत राहिले. सत्यच जर सांगायचे झाले तर सुर्व्यांची कविता आत्मनिवेदनाचा घाट सांभाळत, आपले जगलेले जिवंत अनुभव कथन करीत, मराठी कवितेतले आपले ध्रुवस्थान बळकट करीत राहिली. मुक्त शैली आणि मुक्त मन, सोबत सोसलेले वेदनामय दु:ख ह्यांचा आपल्या कवितेतून शब्दपिसारा फुलवणारी नारायण सुर्वे यांची एकूणच कविता, त्यांची स्वत:ची स्वतंत्र आणि अक्षय नाममुद्रा घेऊन प्रकट झाली आणि साठोत्तरी कवितेचे समृद्ध देखणे अंगण नक्षत्रांकित करून गेली. स्वत:च्या प्रकाशात चालत राहणारी, अनुभवांचे गाणे गुणगुणत स्वत:तच रममाण झालेली, पारंपरिक आविष्काराच्या शृंखलांमधून मुक्त होऊन स्वत:ची स्वतंत्र शैली निर्माण करणारी नारायण सुर्वे यांची कविता केशवसुतांसारखे स्वत:चे घराणे निर्माण करून गेली. नारायण सुर्वे ह्यांच्या अनेक कविता सर्वतोमुखी झाल्या; परंतु 'माझे विद्यापीठ' ही काहीशी दीर्घ कविता सुर्व्यांना नाव देऊन गेली. सामाजिक भान जपणारी, शब्दचित्राच्या अंगाने जाणारी ही कविता, एकूणच विसाव्या शतकातल्या कवितांमधली एक श्रेष्ठ कविता ठरली.

ना घर होते, ना गणगोत, चालेल तेवढी पायाखालची जमीन होती
दुकानांचे आडोसे होते; मोफत नगरपालिकेची फुटपाथ खुलीच होती...

छत्तीस कडव्यांची ही कविता विचारप्रवर्तक आहे. ही एक कविता लिहिली असती तरी नारायण सुर्वे यांचे नाव कवी म्हणून सुवर्णाक्षरांत नोंदवले गेले असते. नारायण सुर्वे यांनी 'माझे विद्यापीठ' ह्या कवितेतून शहरी जीवनातल्या सामान्य माणसाचे मन जागृत केलेले आहे. सुर्व्यांच्या मनात पिंगा घालणाऱ्या, सामाजिक भानाचे वास्तव रूप रेखाटणाऱ्या आणि मुख्य म्हणजे आधाराचे छत हरवून बसलेल्या जिवंत क्षणांचे चित्रण, वास्तवावादी पातळीवर करण्यात नारायण सुर्वे कमालीचे यशस्वी झालेले आहेत.

विचार करतो गतगोष्टींचा, काजळी कुरतडीत जणू जळत राहावा दिवा
एक
उद्ध्वस्त नगरात काहीसे हरवलेले शोधीत हिंडावा परतलेला सैनिक...

किती वाचलेत चेहरे, किती अक्षरांचा अर्थ उतरला मनात
इथे सत्य एक अनुभव, बाकी हजार ग्रंथराज कोलमडून कोसळतात...

नारायण सुर्वे यांचे अवघे काव्यविश्व कामगार जीवनातून प्रथम उदयाला आले आणि अनुवभलेल्या प्रसंगांना कवितांमधून जोजवण्याची विलक्षण प्रतिभा त्यांना जन्मापासूनच प्राप्त झालेली आहे. यंत्रांमध्येसुद्धा जे काळीज असते, त्यातला आर्त स्वर टिपण्याची क्षमता सुर्व्यांपाशी आहे...

नारायण सुर्वे यांचा कालखंड आहे १९२६ ते २००७. मुंबईतल्या म्युनिसिपल शाळेत सुरवातीला किरकोळ कामे करणाऱ्या सुर्व्यांनी पुढे जी आकाशव्यापी झेप घेतली ती मात्र आश्चर्यकारक ठरली. पारंपरिक अर्थाने फारसे शिक्षण न घेतलेल्या सुर्व्यांनी ऐन तारुण्यात राजकीय चळवळीत उडी घेतली आणि या जिवंत अनुभवाच्या शाळेत त्यांना जणू दिव्यदृष्टीचा लाभ झाला. अण्णा भाऊ साठे या श्रेष्ठ शाहिरासोबत त्यांना आपले संवेदनशील आयुष्य वेचता आले. त्याचा दृश्य लोभसवाणा परिणाम म्हणजे ऐन तारुण्यात त्यांच्या कवितेला बहर आला. साठे यांच्या प्रभावाखाली चळवळीत सामील झालेल्या नारायण सुर्वे यांनी चळवळीसाठी अनेक गीते लिहिली. सुर्व्यांची जन्मकहाणी तर विश्वास बसणार नाही अशी आहे. एक पोरका पोर, कामगार म्हणून आयुष्य जगणाऱ्या गंगाराम सुर्वे यांच्या अपार कृपेमुळे 'नारायण' हे नाव धारण करून जगू लागतो. आणि कामगार वस्तीत लहानाचा मोठा होतो. लालबाग परळमधल्या गिरण्यांचे भोंगे ऐकत जागा होणारा हा कवी, त्यानेच तर केशवसुतांसारखी साठोत्तरी कवितेत स्वत: तुतारी फुंकली आणि मराठी कवितेत स्वत:चे राज्य निर्माण केले. १९९५मध्ये परभणी येथे संपन्न झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद प्राप्त करण्याची क्षमता त्यांच्या कवितेत होती. ग्रेस, महानोर यांच्या समकालीन असलेले नारायण सुर्वे यांनी स्वत:च्या कवितेची ओळख मात्र स्वतंत्र ठेवली. आपली स्वतंत्र ओळख स्वत:च प्राणपणाने जपली.

'माझे विद्यापीठ' या कवितासंग्रहाला सार्वत्रिक मान्यतेची सुवर्ण मोहोर लाभली. त्या कवितासंग्रहाच्या अगदी सुरवातीला ज्या चार ओळी आहेत हे खरेतर नारायण सुर्वे यांचे हृद्‌गतच आहे.

यंत्राच्या काळजातील आर्त स्वर

१५वी आवृत्ती

इन्टिमेट

लेखक

व. पु. काळे



किंमत : १३०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.

"... प्रत्येक माणसाला आयुष्यभर कुणाचा ना कुणाचा मत्सर वाटत असतो. ज्या सुखाला आपण लायक आहोत, ते दुसऱ्या कुणालातरी मिळतंय, ह्याचं एक ठसठसणारं दु:ख तो कायम जवळ बाळगून असतो; आणि त्याहीपेक्षा कुचंबणा अशी, की हे कुठं बोलता येत नाही! त्यासाठी मी 'दिलासा मंडळ' स्थापन केलं. मनातली सगळी मळमळ त्यानं इथं ओकायची..... याचे वर्गणीदार वाढण्याचा सीझन म्हणजे साहित्य संमेलनं, नाट्य संमेलनं, साहित्य पुरस्कार जाहीर होतात, तो काळ..... इथं ढोंगी माणसाला प्रवेश नाही. निखळ मत्सरी माणसं हवीत...." माणसानं मनात दडवून ठेवलेल्या अशा बऱ्यावाईट स्वाभाविक भावना उदार अंत:करणानं समजून घेणं आणि आपल्या खास नर्म-मुलायम, मिस्कील शैलीत त्या आविष्कृत करणं, हा श्रेष्ठ कथालेखक वपु काळे यांच्या कथालेखनाचा महत्त्वाचा विशेष. मुळात जीवनाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोनच प्रसन्न, आशावादी व उदार आहे; आणि अवघड विकारांचाही धीटपणे आविष्कार करण्याचं त्यांचं कसब तर वाचकाला विस्मयचकित करतं. 'इन्टिमेट'मधील प्रत्येक कथा याच कारणानं मनाला भिडते.

तुझ्या कंठात आकार घेऊ दे
उडणाऱ्या नाडीचे जागते ठोके
त्यांचा घंटारव अंतरात घुमू दे...

नारायण सुर्वे यांच्या नावावर एकूण १४५ कविता आहेत. 'ऐसा गा मी ब्रह्म', 'जाहीरनामा', 'माझे विद्यापीठ' आणि शेवटचा 'नव्या माणसाचे आगमन' हे चार कवितासंग्रह सुर्वे यांच्या नावावर आहेत. 'सनद' हा त्यांच्या निवडक कवितांचा संग्रहसुद्धा प्रकाशित झाला. आणि नारायण सुर्वे यांच्या मृत्यूनंतर 'सुर्वे : नारायण सुर्वे यांच्या समग्र कविता' हा संग्रह प्रसिद्ध झाला. दलितांच्या, शोषितांच्या तसेच कामगार जीवनातील वेदनांना वाचा फोडणारा हा कवी पुढे अनेक सन्मानांनी गौरवला गेला. त्यांनी थोडेसे गद्य लेखनसुद्धा केले. 'माणूस, कलावंत आणि समाज' या पुस्तकात त्यांचे आत्मपर लेखन समाविष्ट झाले. त्यांच्या काही कविता हिंदी भाषेत अनुवादित झाल्या. 'माझे विद्यापीठ' या गाजलेल्या कवितासंग्रहावर ज्या सार्वत्रिक प्रतिक्रिया, समीक्षा, मतमतांतरे प्रगट झाली, त्यांचासुद्धा 'सुर्वे यांचे विद्यापीठ' या संपादित ग्रंथात समावेश झाला.

मराठी साहित्यातला हा अभिनव प्रयोग प्रा. पुष्पा राजापुरे यांच्या संपादनाखाली 'संदर्भ प्रकाशाना'च्या वतीने प्रसिद्ध झाला. असे भाग्य फार थोड्या कवींना लाभते. ते भाग्य नारायण सुर्वे यांना सहजगत्या लाभले. याच संपादित पुस्तकात नारायण सुर्वे यांची प्रदीर्घ मुलाखत समाविष्ट केलेली आहे. या मुलाखतीत 'त्यांची स्वत:ची आवडती कविता कोणती?' हा प्रश्न विचारला गेला, त्याचे उत्तर खूप महत्त्वाचे आहे. स्वत: सुर्वे म्हणतात, 'माझे विद्यापीठ' ही कविता मला जास्त आवडते; कारण त्यात कथेचा भाग आहे, चिंतनाचा भाग आहे. प्रकटीकरणात ती जास्त उजवी आहे. भाषेचे वैभव म्हणाल तर, असं साध्या, सरळ, सोप्या शब्दांत बोलते. तळागाळातला माणूस या 'विद्यापीठा'त आलाय... एकूणच कवितेच्या जगात किंवा 'सारस्वतां'च्या विद्यापीठात म्हणा, मला मार्क्स चांगले मिळाले. नारायण सुर्वे यांनी 'माझ्या कवितेची स्फूर्तिस्थाने' नावाचा एक लेख लिहिला होता.

त्यात सुर्वे म्हणतात, ''मी अनाथ मुलगा म्हणून जन्माला आलो ही अतिशय दु:खद गोष्ट आहे; भूषणास्पद नाही. मी हा मजकूर लिहित असतानाही शेकडो आया आजही विषण्ण मनाने हॉस्पिटलमध्ये, रस्त्याच्या

कडेला किंवा रानातून अशा हजारो अर्भकांना जन्म देऊन मोकळ्या होत असतील. त्यांना त्यावेळी काय वाटत असेल, ते आपण तर्कानेही जाणू शकतो. ही जन्मदात्री आई तेव्हा माझी नाळ कापून माझ्यापासून अलग झाली असेल, तेव्हा तिच्या डोईवर आकाश फाटले असेल. भीषण वादळात सापडलेल्या ज्योतीसारखी थरथरत, कावरीबावरी होत शरमिंदी झाली असेल. स्त्रीला आपले बाळंतपण जर सुखावह वाटत नसेल तर तिला त्याच्यासारखा मोठा शाप नाही. अशी स्त्री या कुबट जगावर थुंकेल तरी, नाहीतर सारी पोरे माझीच आहेत, अशी माया तरी लावेल. दुसरा तिला पर्याय नाही. तिने पुढे (माझ्या आईने पुढे) काय केले असेल, हे तिचे तिलाच ठाऊक.''

बहुतेक मोठ्या साहित्यिकांनी आपल्या आईविषयी भरभरून लिहिलेले आहे. नारायण सुर्वे यांना आपली आई कोण, वडील कोण हेच माहीत नव्हते. म्हणून आपल्या अनाथ जन्माचा लेखाजोखा मांडताना स्त्री दु:खाला त्यांनी जी वाचा फोडली आहे त्यातून आपल्या आईची वेदना काय असेल, याचे जे चित्रण केले आहे, तीच एक श्रेष्ठ कविता वाटते.

नारायण सुर्वे हे एक श्रेष्ठ कवी तर होतेच, त्याहून काकणभर अधिक ते श्रेष्ठ माणूस होते. इंग्रजीत ज्याला 'Down to Earth' असे म्हणतात, तसे सुर्वे होते. एकदा का मैत्र जुळले की, ते आपला जीव अर्पण करीत असत. सामान्यातल्या सामान्य जीवालासुद्धा आपलेसे करण्याची विलक्षण मायाभारली ताकद नारायण सुर्वे यांच्या एकूणच व्यक्तिमत्त्वात ठासून भरलेली होती. 'माझे शब्द' या कवितेच्या सुरवातीला ते म्हणतात की,

माझे शब्द तुम्हाला आमची कथा सांगतील
याच सोहळ्यासाठी दोन अश्रू जपून ठेवले आहेत...

नारायण सुर्वे यांची अवघी शब्दसृष्टी, त्यांचे प्रत्यक्ष जगणे-बोलणे, त्यांची प्रेम करण्याची विलक्षण शैली आणि एकूणच जगण्यातले मोहवणारे साधेपण अपूर्वच होते. सत्यच सांगायचे तर नारायण सुर्वे हे एक मराठी काव्यविश्वातले अजब रसायनच होते.

– वामन देशपांडे
९३२४६१५०७७

❖

अभिप्राय



आखाडा -
महावीर सिंग फोगाट यांचे जीवनचरित्र

लेखक - सौरभ दुग्गल
अनुवाद - लीना सोहोनी
पृष्ठसंख्या - २०८
किंमत - २२०/-

मुलींना कुस्तीच्या आखाड्यात उतरवणाऱ्या पित्याच्या जिद्दीची कहाणी

आपल्या देशात महिला सक्षमीकरणाची प्रक्रिया गेली दीड-दोन शतके अव्याहतपणे चालू आहे; मात्र ही लढाई अजून अपूर्ण आहे. तरीही महिलांनी एव्हरेस्ट सर केले, अंतराळात झेप घेतली व अनेक क्षेत्रे, शिखरे पादाक्रांत केली. क्रीडा क्षेत्रात बॉक्सिंग, ज्युदो आणि तायक्वांदोसारख्या द्वंद्वात्मक खेळांमध्येही त्यांनी आपली क्षमता सिद्ध केली; मात्र कुस्तीच्या क्षेत्रात येण्यास त्यांना मज्जाव होता. याला प्रथम विरोध केला मास्टर चंदगीराम या आशिया खेळातील सुवर्णपदक विजेत्या मल्लाने आणि कुस्तीगुरूने.

हरियाणासारख्या जाटबहुल आणि खाप पंचायतीच्या बडग्याखाली

दबलेल्या आणि त्यामुळे मागास असलेल्या प्रदेशात मुलींना आखाड्यात उतरविण्याचा गुन्हा मग चंदगीराम यांनी केला. मुली, सोनिका आणि दीपिका कालीरामन या दोघींनी देशाचे प्रतिनिधित्व केले. २००६मध्ये दोहा कतार आशियाई खेळांमध्ये सोनिका ही पहिली भारतीय आंतरराष्ट्रीय महिला कुस्तीपटू ठरली. गेल्या वर्षी साक्षी मलिकने चक्क ऑलिम्पिकमधील कांस्यपदक मिळवत इतिहास घडवला.

या इतिहासाची पहिली पाने लिहिणाऱ्या चंदगीराम यांचे अपूर्ण कार्य मग हाती घेतले महावीर सिंग फोगाट या त्यांच्या शिष्याने! ऑलिम्पिक सुवर्णपदक हे आपले लक्ष्य निर्धारित करत त्यांनी आपल्या आणि भावाच्या मुलींना या क्षेत्रात आणले. आपली पत्नी दया कौरच्या मदतीने तेथील प्रतिगामी, पुरुषवर्चस्व असणाऱ्या समाजाच्या प्रचंड विरोधाचा मुकाबला या अवलियाने मोठ्या हिमतीने केला. या कुस्तीवेड्या, शिस्तप्रिय गुरूने एक प्रकारे समाज परिवर्तनाची ज्योतच जणू पेटवली.

त्यांच्याच जीवनकहाणीवर आधारित आमीर खानची प्रमुख भूमिका असलेला 'दंगल' चित्रपट लोकांनी चक्क डोक्यावर घेतल; मात्र दोन-अडीच तासांमध्ये केवळ या प्रेरणादायी कहाणीची काही ओझरती क्षणचित्रेच काय ती लोकांना पाहता आली. त्याच्यापलीकडे काय? कहाणी अधिक रोचक आहे. ती जाणून घेण्याचे कुतूहल इंग्रतीतील मूळ अर्थात असणार यात शंकाच नाही. ती संधी महावीर सिंग यांचे 'आखाडा' हे अधिकृत जीवनचरित्र मराठीमध्ये अनुवादित झाल्याने उपलब्ध होते आहे.

महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यांमध्ये कुस्ती चांगलीच लोकप्रिय आहे. त्यातच रेश्मा माने या कन्येने राष्ट्रकुल अजिंक्यपद मिळविल्याने हे लोण आता मराठी मुलखातही पसरणार आहे. तेव्हा 'आखाडा' हे पुस्तक क्रीडाप्रेमींसाठी आणि क्रीडापटूंच्या पालकांसाठी अतिशय उपयुक्त ठरावे. क्रीडा क्षेत्रामध्ये यशस्वी होण्यासाठी कराव्या लागणाऱ्या खडतर मेहनतीचे चित्र यातून पाहावयास मिळते. ''घुंघट की आनबान, म्हारे प्रदेशकी पहचान'' असा नारा देणाऱ्या हरियाणात महावीर सिंगना कोणत्या अग्निदिव्यातून जावे लागले हे या प्रेरणादायी कहाणीच्या माध्यमातून अवश्य वाचावे.

– रणजित दळवी, दैनिक लोकमत,
मुंबई २३-७-२०१७

चित्र पाहा आणि चौकटीत योग्य ती नावे लिहा.



प्रकाशन समारंभ...

'सी.ई.ओ.च्या केबिनमधून ...'या डॉ. गिरीश वालावलकर लिखित पुस्तकाचा प्रकाशन सोहळा

मेहता पब्लिशिंग हाऊसच्या 'सी.ई.ओ.च्या केबिनमधून ...' या डॉ. गिरीश वालावलकर लिखित पुस्तकाचा प्रकाशन सोहळा नुकताच फोर सीझन्स हॉटेल, मुंबई येथे संपन्न झाला. पुस्तकाचे प्रकाशन वोखार्ड ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष हबिल खोराकीवाला यांच्या हस्ते करण्यात आले. सारस्वत बँकेचे अध्यक्ष गौतम ठाकूर या समारंभाचे प्रमुख पाहुणे होते. 'ऑर्किड' हॉटेल समूहाचे अध्यक्ष विठ्ठल कामत, 'दिव्य मराठी'चे मुख्य संपादक कुमार केतकर आणि महाराष्ट्र सरकारचे माहिती आणि जनसंपर्क विभागाचे डायरेक्टर जनरल ब्रिजेश सिंग यांची या प्रकाशन सोहळ्यामध्ये विशेष उपस्थिती होती. या प्रसंगी अजित तेंडुलकर, सोनी टी.व्ही.च्या माजी प्रमुख आणि चित्रपट लेखिका रेखा निगम, कोटक प्रायव्हेट इक्विटीचे सी.ई.ओ. नितीन देशमुख, आरेक्स लॅबोरेटरीजचे अध्यक्ष डॉ. अजित गुंजीकर हे मान्यवर उपस्थित होते. स्मिता गवाणकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

RNI NO-MAHMAR/2000/2739
Regd.No.:PCW/086/2015-2017/ Posted at Marketyard Pso, Pune
Publishing Date : 11 August, 2017. Posting Date : 11 August, 2017.

मेहता पब्लिशिंग हाऊस

मेहता पब्लिशिंग हाऊसचा अभिनव उपक्रम !

कमीत कमी १००० रुपये MPH वॉलेटमध्ये भरा व वर्षभर या रकमेची पुस्तके घ्या! तसेच वॉलेटमध्ये पैसे भरल्या भरल्या मिळवा १०० रुपयाचे 'एक' पुस्तक मोफत.

(नियम व अटी लागू*)

अधिक माहितीसाठी संपर्क : ९४२२०४६५७५

Website: www.mehtapublishinghouse.com
Email: sales@mehtapublishinghouse.com
Follow us on
http://www.facebook.com/mehta.publishinghouse

500 Marathi books Available as e-Book | E-book available : play.google.com/store/books | m.dailyhunt.in/Ebooks/marathi | www.amazon.in

मेहता मराठी ग्रंथजगत
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनिल अनिल मेहता हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट २०/१डी /१ अ, सोमवार पेठ,महाराजा लॉज मागे, पुणे ४११ ०११.